MPSC
Prelims
(Marathi)

# Polity Static

## Class Notes



CHAPTER

# 01 ऐतिहासिक पार्श्वभूमी

- १६००: इस्ट इंडिया कंपनीला (EIC) भारतात व्यापार करण्याचे एकाधिकार (सनद) प्राप्त झाले.
- १७६५: इस्ट इंडिया कंपनीला 'दिवानी हक्क' मिळाले.
    - याद्वारे बंगाल, बिहार आणि ओरिसा (ओडिशा) प्रांतांतील महसूल गोळा करण्याचे आणि दिवाणी न्यायाचे अधिकार कंपनीकडे आले.
- १८५७–१९४७: भारतावर ब्रिटिश राजसत्तेचे (British Crown) थेट शासन प्रस्थापित झाले.

## कंपनीचे शासन (१७७३–१८५८)

| | |
|---|---|
| **रेगुलेटिंग ॲक्ट (नियमनकारी कायदा), १७७३** | **उद्देश:**<br>❍ इस्ट इंडिया कंपनीच्या (EIC) कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्याचे नियमन करण्यासाठी ब्रिटीश सरकारने उचललेले हे पहिले पाऊल होते.<br>❍ या कायद्याद्वारे कंपनीच्या राजकीय आणि प्रशासकीय कार्यांना प्रथमच मान्यता मिळाली.<br>❍ भारतात केंद्रीय प्रशासनाचा पाया रचला गेला.<br>**वैशिष्ट्ये:**<br>❍ बंगालचा गव्हर्नर आता 'बंगालचा गव्हर्नर जनरल' बनला.<br>■ त्याच्या मदतीसाठी ४ सदस्यांचे कार्यकारी मंडळ (Executive Council) स्थापन करण्यात आले.<br>■ पहिले गव्हर्नर जनरल: लॉर्ड वॉरन हेस्टिंग्स.<br>❍ मुंबइ आणि मद्रासचे गव्हर्नर आता बंगालच्या गव्हर्नर जनरलच्या अधीन झाले (यापूर्वी ते स्वतंत्र होते).<br>❍ कलकत्ता येथे सर्वोच्च न्यायालयाची स्थापना (१७७४): यामध्ये १ मुख्य न्यायाधीश आणि ३ अन्य न्यायाधीश होते.<br>❍ कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर खालील निर्बंध लादण्यात आले:<br>■ खाजगी व्यापारास बंदी.<br>■ स्थानिक लोकांकडून भेटीदाखल वस्तू किंवा लाच स्वीकारण्यास मनाइ.<br>❍ कोर्ट ऑफ डायरेक्टर्स (CoD): ही कंपनीची नियामक संस्था (Governing body) म्हणून कार्यरत राहिली. |
| **पिट्स इंडिया ॲक्ट, १७८४** | **उद्देश:**<br>❍ रेगुलेटिंग ॲक्टमधील दोष दूर करणे.<br>**वैशिष्ट्ये:**<br>❍ कंपनीची व्यापारी आणि राजकीय कार्ये स्पष्टपणे वेगळी करण्यात आली.<br>❍ द्वि-शासन व्यवस्था (Dual Government):<br>■ कोर्ट ऑफ डायरेक्टर्स (CoD): व्यापारी बाबी हाताळण्यासाठी.<br>■ बोर्ड ऑफ कंट्रोल (BoC): राजकीय बाबींचे व्यवस्थापन करण्यासाठी.<br>❍ 'बोर्ड ऑफ कंट्रोल'ला मुलकी (Civil), लष्करी आणि महसुली बाबींवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार देण्यात आले.<br>**महत्त्व:**<br>❍ भारतातील कंपनीच्या ताब्यातील प्रदेशाला प्रथमच 'ब्रिटीश मालकीचा प्रदेश' असे संबोधण्यात आले.<br>❍ कंपनीच्या प्रशासनावर ब्रिटीश सरकारचे पूर्णतः नियंत्रण प्रस्थापित झाले. |

| | |
|---|---|
| **चार्टर ॲक्ट (सनदी कायदा), १७९३** | ❍ व्यापारी हक्क: इस्ट इंडिया कंपनीचे भारतातील व्यापारी एकाधिकार (Privileges) पुढील २० वर्षांसाठी वाढवण्यात आले.<br>❍ सरकारला देय रक्कम: कंपनीने ब्रिटिश सरकारला दरवर्षी ५ लाख पाउंड देणे अनिवार्य करण्यात आले.<br>❍ राजकीय नेमणुका: उच्च पदावरील नेमणुकांसाठी ब्रिटीश राजसत्तेची (Royal approval) मंजुरी अनिवार्य केली.<br>❍ अधिकाऱ्यांवर निर्बंध: वरिष्ठ अधिकाऱ्यांना परवानगीशिवाय भारत सोडून जाण्यास मनाइ करण्यात आली.<br>❍ व्यापार परवाने: कंपनीला भारतात व्यापारासाठी परवाने (Licences) देण्याचे अधिकार बहाल करण्यात आले. |
| **चार्टर ॲक्ट (सनदी कायदा), १८१३** | ❍ व्यापारी मक्तेदारी संपुष्टात: भारतातील कंपनीची व्यापारी मक्तेदारी संपवण्यात आली.<br>■ अपवाद: चीनसोबतचा व्यापार आणि चहाचा व्यापार यावरील मक्तेदारी कायम ठेवली.<br>❍ लाभांश: भागधारकांना १०.५% लाभांश (Dividend) निश्चित करण्यात आला.<br>❍ घटनात्मक स्थान: भारतातील ब्रिटीश प्रदेशांचे घटनात्मक स्थान प्रथमच स्पष्टपणे परिभाषित करण्यात आले.<br>❍ बोर्ड ऑफ कंट्रोल (BoC): 'बोर्ड ऑफ कंट्रोल'च्या अधिकारांमध्ये वाढ करण्यात आली.<br>❍ शिक्षणासाठी तरतूद: भारतीयांच्या शिक्षण, साहित्य आणि विज्ञानाच्या प्रचारासाठी वर्षाला १ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली.<br>❍ ख्रिश्चन मिशनरी: ख्रिश्चन मिशनऱ्यांना भारतात येऊन धर्मप्रसार करण्याची परवानगी देण्यात आली. |
| **चार्टर ॲक्ट (सनदी कायदा), १८३३** | ❍ भारताचा गव्हर्नर जनरल: बंगालचा गव्हर्नर जनरल आता 'भारताचा गव्हर्नर जनरल' बनला.<br>■ त्याला सर्व मुलकी आणि लष्करी अधिकार देण्यात आले.<br>■ पहिले भारताचे गव्हर्नर जनरल: लॉर्ड विल्यम बेंटिक.<br>❍ कायदेविषयक अधिकार: मुंबइ आणि मद्रासच्या गव्हर्नरांचे कायदे करण्याचे अधिकार काढून घेण्यात आले.<br>❍ कंपनीचे स्वरूप बदलले: इस्ट इंडिया कंपनीचे व्यापारी अस्तित्व संपून ती आता केवळ एक प्रशासकीय संस्था बनली.<br>❍ नागरी सेवा (Civil Services): नागरी सेवांसाठी खुली स्पर्धा सुरू करण्याचा प्रयत्न झाला.<br>■ सैद्धांतिकदृष्ट्या भारतीयांना त्यात प्रवेश देण्याचे ठरले (मात्र 'कोर्ट ऑफ डायरेक्टर्स'च्या विरोधामुळे ते प्रत्यक्षात आले नाही).<br>❍ कायद्यांचे संहितीकरण: भारतीय कायद्यांचे संहितीकरण (Codification) करण्याचे ठरले.<br>❍ पूर्ण मक्तेदारी रद्द: चीनसोबतचा व्यापार आणि चहाच्या व्यापारावरील मक्तेदारीही पूर्णपणे संपली.<br>❍ युरोपीय स्थलांतर: युरोपियनांना भारतात राहण्यावरील आणि मालमत्ता खरेदीवरील निर्बंध हटवण्यात आले.<br>❍ गुलामगिरी नष्ट: या कायद्याने भारतात गुलामगिरीची प्रथा बेकायदेशीर ठरवून ती नष्ट करण्याचे पाऊल उचलले. |
| **चार्टर ॲक्ट (सनदी कायदा), १८५३** | ❍ कार्यांचे विभाजन: गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलची कायदेविषयक आणि कार्यकारी कार्ये प्रथमच वेगळी करण्यात आली.<br>❍ विधान परिषद: कौन्सिलमध्ये ६ नवीन सदस्यांची भर पडली, ज्याला 'गव्हर्नर जनरलची विधान परिषद' (Indian Central Legislative Council) असे म्हटले गेले. याला 'लहान संसद' (Mini Parliament) असेही संबोधले जाते.<br>❍ नागरी सेवा (Open Competition): नागरी सेवांसाठी खुली स्पर्धा पद्धत अधिकृतपणे सुरू झाली.<br>■ या संदर्भात १८५४ मध्ये 'मेकॉले समिती' (Macaulay Committee) नियुक्त करण्यात आली. |
| | ❍ स्थानिक प्रतिनिधित्व: केंद्रीय विधान परिषदेत प्रथमच स्थानिक प्रतिनिधित्व देण्यात आले.<br>■ ६ पैकी ४ सदस्यांची नेमणूक मद्रास, मुंबइ, बंगाल आणि आग्रा या स्थानिक सरकारांमधून केली जाणार होती. |

## ब्रिटीश राजसत्ता (१८५८–१९४७)

| | |
|---|---|
| **भारत सरकार कायदा, १८५८** | **परिणाम:**<br>❍ इस्ट इंडिया कंपनी (EIC) बरखास्त: या कायद्याने कंपनीची राजवट पूर्णपणे संपुष्टात आणली.<br>❍ सत्ता हस्तांतरण: भारतातील प्रदेश, महसूल आणि प्रशासकीय अधिकार ब्रिटीश राजसत्तेकडे (British Crown) हस्तांतरित करण्यात आले. |

| | |
|---|---|
| | **वैशिष्ट्ये:**<br>❍ व्हाइसरॉयची नेमणूक: भारताचा गव्हर्नर जनरल आता 'भारताचा व्हाइसरॉय' म्हणून ओळखला जाऊ लागला.<br>■ व्हाइसरॉय हा ब्रिटीश राजसत्तेचा भारतातील थेट प्रतिनिधी होता.<br>■ भारताचा पहिला व्हाइसरॉय: लॉर्ड कॅनिंग.<br>❍ द्वि-शासन पद्धतीचा अंत: पिट्स इंडिया कायद्याद्वारे सुरू झालेली 'बोर्ड ऑफ कंट्रोल' (BoC) आणि 'कोर्ट ऑफ डायरेक्टर्स' (CoD) ही दोन्ही मंडळे बरखास्त करण्यात आली.<br>❍ नवीन पद - 'भारत मंत्री' (Secretary of State for India):<br>■ हे पद नव्याने निर्माण करण्यात आले.<br>■ भारत मंत्री हे ब्रिटीश मंत्रिमंडळाचे (Cabinet) सदस्य असत.<br>■ ते ब्रिटीश संसदेला जबाबदार होते.<br>■ भारतीय प्रशासनावर त्यांचे पूर्ण नियंत्रण आणि अधिकार होते.<br>❍ भारत परिषद (Council of India): भारत मंत्र्यांच्या मदतीसाठी १५ सदस्यांचे एक 'सल्लागार मंडळ' स्थापन करण्यात आले.<br>■ भारत मंत्री या परिषदेचे अध्यक्ष होते.<br>❍ संविधिक संस्था (Body Corporate): 'सेक्रेटरी ऑफ स्टेट-इन-काउन्सिल' (भारत मंत्री आणि त्यांची परिषद) ही एक संविधिक संस्था म्हणून गठित करण्यात आली, ज्यावर भारतात किंवा इंग्लंडमध्ये खटला भरता येऊ शकत होता.<br>❍ जबाबदार शासन पद्धती: या कायद्यामुळे सत्तेची साखळी खालीलप्रमाणे निश्चित झाली:<br>❍ परिषद → व्हाइसरॉय → भारत मंत्री → ब्रिटीश संसद (यामुळे खऱ्या अर्थाने उत्तरदायी किंवा जबाबदार शासन पद्धतीची सुरुवात झाली.) |
| **इंडियन काउन्सिल ॲक्ट (भारतीय परिषद कायदा), १८६१** | ❍ भारतीयांचा सहभाग: कायद्याच्या निर्मिती प्रक्रियेत भारतीयांना सामावून घेण्यास सुरुवात झाली.<br>■ व्हाइसरॉयने भारतीयांना 'अ-शासकीय' (non-official) सदस्य म्हणून नामनिर्देशित करावे, असे ठरले.<br>■ १८६२ मध्ये लॉर्ड कॅनिंग यांनी ३ भारतीयांना नामनिर्देशित केले: १. बनारसचे राजा २. पतियाळाचे महाराज ३. सर दिनकर राव.<br>❍ विकेंद्रीकरण: मुंबइ आणि मद्रास प्रांतांचे कायदे करण्याचे अधिकार पुन्हा बहाल करण्यात आले (विकेंद्रीकरणाची सुरुवात).<br>❍ नवीन विधान परिषदांची स्थापना:<br>■ बंगाल (१८६२)<br>■ वायव्य सरहद्द प्रांत - NWFP (१८६६)<br>■ पंजाब (१८९७).<br>❍ खातेवाटप पद्धत (Portfolio System): १८५९ मध्ये लॉर्ड कॅनिंग यांनी सुरू केलेल्या खातेवाटप पद्धतीला या कायद्याने वैधानिक मान्यता दिली.<br>❍ अध्यादेश (Ordinance): आणीबाणीच्या काळात विधान परिषदेच्या संमतीशिवाय 'अध्यादेश' काढण्याचे अधिकार व्हाइसरॉयला देण्यात आले (कालावधी: ६ महिने).<br>❍ मर्यादा:<br>■ सरकारच्या मंजुरीशिवाय अर्थसंकल्पावर/वित्तीय बाबींवर चर्चा करण्यास बंदी.<br>■ कार्यकारी मंडळाच्या कृतींवर चर्चा करण्याचा अधिकार नव्हता. |
| **इंडियन काउन्सिल ॲक्ट, १९०९ (मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा)** | ❍ प्रतिनिधीत्व: प्रशासनात प्रातिनिधिक आणि लोकप्रिय घटक समाविष्ट करण्याचा हा पहिला प्रयत्न होता.<br>❍ तरतुदी:<br>❍ विधान परिषदांचा आकार वाढवण्यात आला (१६ वरून ६० सदस्य - केंद्र आणि प्रांतात वेगवेगळे).<br>❍ प्रांतीय विधान परिषदांमध्ये अ-शासकीय सदस्यांचे बहुमत मान्य करण्यात आले.<br>❍ कार्यकारी परिषदेत भारतीयांची नियुक्ती: व्हाइसरॉय आणि गव्हर्नर यांच्या कार्यकारी परिषदेत भारतीयांना स्थान मिळाले.<br>■ पहिले भारतीय विधी सदस्य: सत्येंद्र प्रसाद सिन्हा. |

| | |
|---|---|
| | ❍ स्वतंत्र मतदारसंघ: मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची तरतूद करण्यात आली.<br>■ यामुळे जातीयवादाला कायदेशीर स्वरूप मिळाले.<br>■ लॉर्ड मिंटो यांना 'सांप्रदायिक मतदारसंघाचे जनक' (Father of Communal Electorate) म्हटले जाते. |
| **भारत सरकार कायदा, १९१९ (मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा)** | ❍ ऑगस्ट १९१७ ची घोषणा: ब्रिटीश साम्राज्याचा अविभाज्य भाग म्हणून भारतात टप्प्याटप्प्याने 'जबाबदार शासन पद्धती' लागू करण्याचे घोषित करण्यात आले.<br>❍ वैशिष्ट्ये:<br>■ विषयांची विभागणी: केंद्रीय आणि प्रांतीय विषयांची विभागणी करून केंद्राचे नियंत्रण शिथिल करण्यात आले.<br>■ द्वि-दल शासन पद्धती (Dyarchy): प्रांतीय विषयांचे दोन भाग करण्यात आले: १. सोपिव विषय (Transferred): गव्हर्नर आणि मंत्री (विधान परिषदेला जबाबदार). २. राखीव विषय (Reserved): गव्हर्नर आणि कार्यकारी परिषद (विधान परिषदेला जबाबदार नाहीत).<br>■ द्विगृही कायदेमंडळ: केंद्रात प्रथमच द्विगृही कायदेमंडळ सुरू झाले: १. वरिष्ठ सभागृह (State Council) २. कनिष्ठ सभागृह (Legislative Assembly).<br>■ व्हाइसरॉयच्या कार्यकारी परिषदेतील ६ पैकी ३ सदस्य भारतीय असणे अनिवार्य झाले.<br>■ मतदारसंघांचा विस्तार: शिख, ख्रिश्चन, अँग्लो-इंडियन आणि युरोपियनांसाठी स्वतंत्र मतदारसंघ वाढवण्यात आले.<br>■ मताधिकार: मालमत्ता, कर आणि शिक्षणाच्या आधारावर मर्यादित लोकांना मतदानाचा अधिकार देण्यात आला.<br>■ हाय कमिशनर: लंडनमध्ये भारतासाठी 'उच्चायुक्त' (High Commissioner) हे नवीन पद निर्माण केले गेले.<br>■ लोकसेवा आयोग: १९२६ मध्ये नागरी सेवकांच्या भरतीसाठी 'केंद्रीय लोकसेवा आयोग' (Central PSC) स्थापन करण्यात आला.<br>■ प्रांतीय अर्थसंकल्प केंद्रीय अर्थसंकल्पापासून वेगळा करण्यात आला.<br>■ कायद्याच्या पुनरावलोकनासाठी १० वर्षांनंतर एक 'वैधानिक आयोग' (Statutory Commission) नेमण्याची तरतूद करण्यात आली. |
| **सायमन कमिशन, १९२७** | ❍ १९१९ च्या कायद्यातील तरतुदीनुसार स्थापन झालेला वैधानिक आयोग.<br>❍ अध्यक्ष: सर जॉन सायमन.<br>❍ सर्व सदस्य ब्रिटीश असल्याने भारतीयांनी यावर बहिष्कार टाकला.<br>❍ शिफारसी (१९३० चा अहवाल):<br>■ द्वि-दल शासन पद्धती रद्द करावी.<br>■ प्रांतांमध्ये जबाबदार शासन पद्धतीचा विस्तार करावा.<br>■ भारतीय संघराज्य (Federation) स्थापन करावे.<br>■ सांप्रदायिक मतदारसंघ सुरू ठेवावेत.<br>■ या अहवालावर चर्चा करण्यासाठी 'गोलमेज परिषदा' भरवण्यात आल्या, ज्यातून १९३५ च्या कायद्याचा पाया रचला गेला. |
| **कम्युनल अवॉर्ड (जातीय निवाडा), १९३२** | ❍ ऑगस्ट १९३२ मध्ये ब्रिटीश पंतप्रधान रॅमसे मॅकडोनाल्ड यांनी याची घोषणा केली.<br>❍ अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधित्वाची ही योजना होती.<br>❍ यामध्ये 'दलितांसाठी' (Depressed Classes) स्वतंत्र मतदारसंघ जाहीर करण्यात आले.<br>❍ याला विरोध म्हणून गांधीजींनी उपोषण केले, ज्याचा शेवट 'पुणे करार' (Poona Pact) मध्ये झाला. |
| **भारत सरकार कायदा, १९३५** | ❍ प्रमुख तरतुदी:<br>❍ अखिल भारतीय संघराज्य: भारतात 'अखिल भारतीय संघराज्याची' (All-India Federation) स्थापना करण्यात आली.<br>❍ अधिकारांची विभागणी: अधिकारांची तीन सूचींमध्ये विभागणी करण्यात आली:<br>■ संघीय सूची (Federal List): केंद्र सरकारसाठी.<br>■ प्रांतीय सूची (Provincial List): प्रांतांसाठी.<br>■ समवर्ती सूची (Concurrent List): केंद्र आणि प्रांत दोन्हीसाठी. |

| | |
|---|---|
| | ■ उर्वरित अधिकार (Residuary Powers): हे अधिकार व्हाइसरॉयकडे सोपवण्यात आले.<br>❍ द्वि-दल शासन पद्धती: प्रांतांमधील द्वि-दल शासन पद्धती रद्द करून ती केंद्रात लागू करण्यात आली. प्रांतांना 'स्वायत्तता' (Provincial Autonomy) देण्यात आली.<br>❍ द्विगृही कायदेमंडळ: ११ पैकी ६ प्रांतांमध्ये द्विगृही कायदेमंडळ सुरू करण्यात आले:<br>■ बंगाल, मुंबइ, मद्रास, बिहार, आसाम आणि संयुक्त प्रांत (United Provinces).<br>❍ स्वतंत्र मतदारसंघ: या कायद्याने खालील घटकांसाठी स्वतंत्र मतदारसंघ वाढवले:<br>■ दलित वर्ग (Depressed Classes), महिला आणि कामगार (Labour).<br>❍ भारत परिषद बरखास्त: १८५८ च्या कायद्याने स्थापन केलेली 'भारत परिषद' (Council of India) संपुष्टात आणली.<br>❍ मताधिकार विस्तार: मतदानाचा अधिकार विस्तारून तो एकूण लोकसंख्येच्या सुमारे १०% लोकांपर्यंत पोहोचला.<br>❍ रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI): देशाचे चलन आणि पतपुरवठा नियंत्रित करण्यासाठी आरबीआयची स्थापना करण्यात आली.<br>❍ लोकसेवा आयोग: केवळ केंद्रीयच नव्हे, तर प्रांतीय (Provincial) आणि संयुक्त (Joint) लोकसेवा आयोगांची स्थापना करण्याची तरतूद करण्यात आली.<br>❍ संघीय न्यायालय (Federal Court): १९३७ मध्ये संघीय न्यायालयाची स्थापना झाली. |
| **भारतीय स्वातंत्र्य कायदा, १९४७** | ❍ २० फेब्रुवारी १९४७: ब्रिटीश पंतप्रधान क्लीमेंट ॲटली यांनी घोषणा केली की, ३० जून १९४८ पर्यंत भारताची सत्ता भारतीयांकडे हस्तांतरित केली जाइल.<br>❍ ३ जून १९४७: माउंटबॅटन योजना (फाळणीची योजना) जाहीर करण्यात आली.<br>❍ वैशिष्ट्ये:<br>❍ ब्रिटीश राजवटीचा अंत: १५ ऑगस्ट १९४७ पासून भारत एक स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र म्हणून घोषित झाले.<br>❍ दोन स्वतंत्र डोमिनियन्स: भारत आणि पाकिस्तान या दोन स्वतंत्र राष्ट्रांची निर्मिती करण्यात आली.<br>❍ व्हाइसरॉय पद रद्द: व्हाइसरॉयचे पद रद्द करून त्याएवजी पुन्हा गव्हर्नर जनरल हे पद आणले गेले.<br>❍ संविधान सभांना अधिकार: दोन्ही देशांच्या संविधान सभांना स्वतःची राज्यघटना तयार करण्याचे आणि ब्रिटीश कायदे रद्द करण्याचे पूर्ण अधिकार देण्यात आले.<br>❍ भारत मंत्री पद रद्द: 'सेक्रेटरी ऑफ स्टेट' (SoS) हे पद संपुष्टात आणले गेले.<br>❍ संस्थानांचे स्वातंत्र्य: ब्रिटीश सार्वभौमत्व संपल्यामुळे भारतीय संस्थानांना खालीलपैकी एक पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य दिले: १. भारतात सामील होणे. २. पाकिस्तानात सामील होणे. ३. स्वतंत्र राहणे.<br>❍ लॉर्ड माउंटबॅटन:<br>❍ हे स्वतंत्र भारताचे (Dominion India) पहिले गव्हर्नर जनरल बनले.<br>❍ त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांना भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून शपथ दिली. |

**2016**

72. खालील विधाने विचारात घ्या :

अ. 1935 च्या कायद्यान्वये उर्वरित अधिकार हे भारताच्या गव्हर्नर जनरलकडे होते. – ③ list: Federal list, Provincial list, Concurrent list → Residuary : Centralising nature.

ब. अमेरिकेत उर्वरित अधिकार हे राज्यांकडे देण्यात आले आहेत. (US: States Strong. Ind: Centre Strong.)

क. कॅनडामध्ये उर्वरित अधिकार हे प्रातांना देण्यांत आले आहेत. → ✗

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

(1) अ आणि ब (2) ब आणि क (3) अ आणि क (4) अ, ब आणि क

Consider the following statements :

a. Under the Act of 1935, the residuary powers were given to the Governor General of India.

b. In United States the residuary powers are left to the States.

c. In Canada the residuary powers are vested in the Provinces.

Which of the above statements are correct ?

(1) a and b (2) b and c (3) a and c (4) a, b and c

2017

71. जोड्या जुळवा :

फोडा आणि राज्य करा.

Divide & Rule

| | अधिनियम | | तरतूद |
|---|---|---|---|
| अ. | भारतीय परिषद अधिनियम, 1909 | I. | आता राजा हा अधिकाराचा स्रोत राहिला नाही |
| ब. | भारत सरकार अधिनियम, 1919 | II. | केंद्रामध्ये द्विशासन पद्धती |
| क. | भारत सरकार अधिनियम, 1935 | III. | पहिल्यादांच मुस्लिम समुदायासाठी स्वतंत्र प्रतिनिधीत्व |
| ड. | भारतीय स्वातंत्र्य अधिनियम, 1947 | IV. | प्रांतांमध्ये द्विशासन पद्धती |

Dyarchy in provinces [but only on paper]

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | III | IV | II | I |
| (2) | IV | III | II | I |
| (3) | III | IV | I | II |
| (4) | IV | II | I | III |

Match the pairs :

| | *Act* | | *Provision* |
|---|---|---|---|
| a. | Indian Councils Act, 1909 | I. | The Crown no longer the source of authority |
| b. | Govt. of India Act, 1919 | II. | Dyarchy at the Centre |
| c. | Govt. of India Act, 1935 | III. | First time, separate representation to the Muslim community |
| d. | Indian Independence Act, 1947 | IV. | Dyarchy in the Provinces |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | III | IV | II | I |
| (2) | IV | III | II | I |
| (3) | III | IV | I | II |
| (4) | IV | II | I | III |

CHAPTER

# 02 संविधानाची निर्मिती

- १९३४ – एम. एन. रॉय (M.N. Roy): त्यांनी सर्वप्रथम 'संविधान सभेची' (Constituent Assembly) कल्पना मांडली.
- १९३५ – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (INC): काँग्रेसने अधिकृतपणे संविधान सभेची मागणी केली.
- १९३८ – जवाहरलाल नेहरू यांनी घोषित केले की:
  - भारताची घटना ही भारतीयांनीच तयार केलेल्या संविधान सभेद्वारे बनवली जावी.
  - संविधान सभेची निवड प्रौढ मताधिकार (Adult Franchise) पद्धतीने व्हावी.
- १९४० – ऑगस्ट ऑफर (August Offer): ब्रिटीश सरकारने संविधान सभेची मागणी तत्त्वतः मान्य केली.
- १९४२ – क्रिप्स मिशन (Cripps Mission):
  - घटना निर्मितीसाठी ब्रिटीश सरकारचा मसुदा प्रस्ताव.
  - दुसऱ्या महायुद्धानंतर घटना स्वीकारली जाणार होती.
  - हा प्रस्ताव मुस्लिम लीगने फेटाळून लावला.
- मार्च १९४६ – कॅबिनेट मिशन (Cabinet Mission):
  - ऑगस्ट ऑफरला औपचारिक स्वरूप देण्यासाठी हे मिशन आले.
  - त्यांनी दोन स्वतंत्र संविधान सभांची मागणी फेटाळून लावली.
- नोव्हेंबर १९४६ – संविधान सभेची स्थापना: कॅबिनेट मिशन योजनेअंतर्गत संविधान सभेची प्रत्यक्ष स्थापना करण्यात आली.

<table>
<tr>
<td>संविधान सभेची रचना (Composition of the CA)</td>
<td>
○ १. एकूण जागा: ३८९<br>
■ २९६ – ब्रिटीश भारत (British India)<br>
■ ९३ – संस्थाने (Princely States)<br>
○ २. ब्रिटीश भारताच्या जागांची विभागणी:<br>
■ २९२ – गव्हर्नरचे प्रांत (Governor’s Provinces)<br>
■ ४ – मुख्य आयुक्तांचे प्रांत (Chief Commissioner’s Provinces)<br>
○ ३. जागांचे वाटप:<br>
■ जागांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात निश्चित करण्यात आली होती.<br>
■ ब्रिटीश प्रांतांची विभागणी ३ प्रमुख समुदायांमध्ये केली गेली:<br>
■ मुस्लिम<br>
■ शीख<br>
■ सर्वसाधारण (मुस्लिम आणि शीख वगळून इतर सर्व)<br>
○ ४. मतदान पद्धत: प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धत - एकल संक्रमणीय मताद्वारे (Proportional Representation by Single Transferable Vote - PRSTV).<br>
○ ५. संविधान सभा ही अंशतः निर्वाचित आणि अंशतः नामनिर्देशित संस्था होती:<br>
■ संस्थानांचे प्रतिनिधी: संबंधित संस्थानच्या प्रमुखांकडून नामनिर्देशित (Nominated).<br>
■ ब्रिटीश प्रांत: प्रांतीय कायदेमंडळातील सदस्यांकडून त्यांच्या स्वतःच्या समुदायाद्वारे निवडले गेले (Elected).<br>
○ ६. पहिली निवडणूक – जुलै-ऑगस्ट १९४६:<br>
■ काँग्रेस – २०८ जागा<br>
■ मुस्लिम लीग – ७३ जागा<br>
■ अपक्ष – १५ जागा
</td>
</tr>
</table>

| | |
|---|---|
| **संविधान सभेचे कामकाज (Working of the CA)** | ❍ पहिली बैठक – ९ डिसेंबर १९४६<br>■ २११ सदस्यांची उपस्थिती.<br>■ मुस्लिम लीगने या बैठकीवर बहिष्कार टाकला.<br>❍ डॉ. सच्चिदानंद सिन्हा:<br>■ सर्वात ज्येष्ठ सदस्य.<br>■ त्यांची तात्पुरते अध्यक्ष (Temporary President) म्हणून निवड करण्यात आली.<br>❍ त्यानंतरची निवड:<br>■ डॉ. राजेंद्र प्रसाद – अध्यक्ष (President).<br>■ एच. सी. मुखर्जी – उपाध्यक्ष (Vice-President).<br>■ व्ही. टी. कृष्णम्माचारी – उपाध्यक्ष (Vice-President). |
| **उद्दिष्टांचा ठराव (Objective Resolution)** | ❍ मांडला: १३ डिसेंबर १९४६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी हा ठराव मांडला.<br>❍ महत्त्व: या ठरावाने संविधानाची मूलभूत तत्त्वे आणि तत्त्वज्ञान स्पष्ट केले.<br>❍ स्वीकृती: २२ जानेवारी १९४७ रोजी संविधान सभेने हा ठराव एकमताने मंजूर केला |
| **भारतीय स्वातंत्र्य कायदा, १९४७ मुळे झालेले बदल** | ❍ पूर्ण सार्वभौम संस्था: संविधान सभा ही आता पूर्णपणे सार्वभौम संस्था बनली, जी स्वतःच्या इच्छेनुसार कोणतेही संविधान तयार करू शकत होती.<br>❍ २. कायदेमंडळ म्हणून दर्जा: संविधान सभा ही स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंडळ (संसद) बनली. ३. संविधान सभेची दुहेरी भूमिका:<br>❍ संविधान निर्मिती संस्था: जेव्हा सभा संविधान लिहिण्यासाठी भरत असे, तेव्हा तिचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद असत.<br>❍ कायदेमंडळ संस्था: जेव्हा सभा देशासाठी कायदे करण्यासाठी भरत असे, तेव्हा तिचे अध्यक्ष जी. व्ही. मावळणकर असत. ४. सदस्य संख्येतील बदल (फाळणीनंतर):<br>❍ मूळ संख्या: ३८९ (२९६ ब्रिटीश भारत + ९३ संस्थाने)<br>❍ फाळणीनंतरची संख्या: २९९ (२२९ ब्रिटीश प्रांत + ७० संस्थाने)<br>❍ सर्वाधिक जागा:<br>■ संयुक्त प्रांत (United Provinces) – ५५<br>■ त्रावणकोर-कोचीन – ६ |
| **संविधान सभेने पार पाडलेली इतर कार्ये** | ❍ २२ जुलै १९४७: राष्ट्रीय ध्वज (तिरंगा) स्वीकारला.<br>❍ मे १९४९: भारताच्या राष्ट्रकुल (Commonwealth) सदस्यत्वाला मान्यता दिली.<br>❍ २४ जानेवारी १९५०:<br>■ राष्ट्रगीत (रवींद्रनाथ टागोर लिखित) स्वीकारले.<br>■ राष्ट्रीय गीत (बंकीमचंद्र चटर्जी लिखित 'वंदे मातरम') स्वीकारले.<br>■ डॉ. राजेंद्र प्रसाद यांची भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड केली. |
| **संविधान सभेची सत्रे (Sessions)** | ❍ एकूण सत्रे: ११<br>❍ कालावधी: २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवस.<br>❍ अंतिम (११ वे) सत्र: २४ जानेवारी १९५०. |

**संविधान सभेच्या समित्या (Committees of the Constituent Assembly)**

| COMMITTEES | HEADED BY |
|---|---|
| 1. Union Powers Committee<br>2. Union Constitution Committee<br>3. States Committee<br>4. Special Committee to Examine the Draft Constitution | Jawaharlal Nehru |
| 1. Provincial Constitution Committee<br>2. Advisory Committee on Fundamental Rights, Minorities and Tribal and Excluded Areas | Sardar Patel |
| Drafting Committee | Dr. B.R. Ambedkar |
| 1. Rules of Procedure Committee<br>2. Steering Committee<br>3. Ad-hoc Committee on the National Flag<br>4. Finance and Staff Committee | Dr. Rajendra Prasad |
| Fundamental Rights Sub-Committee | J. B. Kripalani |
| Minorities Sub-Committee | H.C. Mukherjee |
| 1. House Committee<br>2. Committee on Chief Commissioners' Provinces | Pattabhi Sitaramayya |
| Order of Business Committee | Dr. K.M. Munshi |
| Credentials Committee | A K Ayyar |
| Committee on the Functions of the Constituent Assembly | G V Mavalankar |
| 1. Ad-hoc Committee on Supreme Court<br>2. Ad-hoc Committee on Citizenship | S. Varadachari (Not Assembly Member) |
| Expert Committee on Financial Provisions of Union Constitution | Nalini Ranjan Sarkar (Not Assembly Member) |
| Linguistic Provinces Commission | S K Dhar (Not Assembly Member) |
| Press Gallery Committee | Usha Nath Sen |

**मसुदा समिती (Drafting Committee)**

- स्थापना: २९ ऑगस्ट १९४७
- सदस्य: या समितीमध्ये एकूण ७ सदस्य होते:
  - १. डॉ. बी. आर. आंबेडकर – अध्यक्ष
  - २. एन. गोपालस्वामी अय्यंगार

<table>
<tr><td></td><td>
■ ३. अल्लादी कृष्णास्वामी अय्यर<br>
■ ४. डॉ. के. एम. मुन्शी<br>
■ ५. सय्यद मोहम्मद सादुल्ला<br>
■ ६. एन. माधव राव (आजारी असल्याने राजीनामा दिलेल्या बी. एल. मित्तल यांच्या जागी नियुक्ती).<br>
■ ७. टी. टी. कृष्णम्माचारी (१९४८ मध्ये निधन झालेल्या डी. पी. खेतान यांच्या जागी नियुक्ती).
</td></tr>
<tr><td>संविधानाचा स्वीकार आणि अंमलबजावणी (Adoption & Enforcement)</td><td>
❍ २६ नोव्हेंबर १९४९: या दिवशी भारतीय संविधान स्वीकृत आणि अधिनियमित (Adopted/Enacted) करण्यात आले.<br>
■ मूळ संविधानात एक उद्देशिका (Preamble), २२ भाग (Parts), ३९५ कलमे (Articles) आणि ८ परिशिष्टे (Schedules) होती.<br>
■ विशेष टीप: संपूर्ण संविधानाची निर्मिती झाल्यानंतर सर्वात शेवटी 'उद्देशिका' लागू करण्यात आली.<br>
■ काही कलमे जसे की नागरिकत्व, निवडणुका, तात्पुरती संसद, तात्कालिक आणि संक्रमणकालीन तरतुदी २६ नोव्हेंबर १९४९ पासूनच लागू झाल्या (उदा. कलम ५-९, ६०, ३२४, ३६६, ३६७, ३७९–३९३).<br>
❍ २६ जानेवारी १९५०: या दिवशी संविधानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली (हा दिवस आपण 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा करतो).<br>
■ २६ जानेवारीची निवड का? कारण १९३० मध्ये याच दिवशी 'पूर्ण स्वराज्य दिन' साजरा करण्यात आला होता, त्याचे एतिहासिक महत्त्व जपण्यासाठी ही तारीख निवडली गेली.
</td></tr>
<tr><td>संविधान निर्मिती प्रक्रिया: एका दृष्टिक्षेपात</td><td>


</td></tr>
</table>

■ **महत्त्वाची तथ्ये (Important Facts)**

- **हत्ती (Elephant): संविधान सभेचे अधिकृत प्रतीक / मोहोर (Symbol / Seal) म्हणून हत्तीचा स्वीकार करण्यात आला होता.**
- **सर बी. एन. राव (Sir B.N. Rau): त्यांची संविधान सभेचे घटनात्मक आणि कायदेशीर सल्लागार (Constitutional & legal advisor) म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.**
- **एच. व्ही. आर. अय्यंगार (H.V.R. Iyengar): ते संविधान सभेचे सचिव (Secretary) म्हणून कार्यरत होते.**
- **प्रेम बिहारी नारायण रायजादा (Prem Behari Narain Raizada): ते भारतीय संविधानाचे मुख्य हस्तलेखक (Calligrapher) होते. त्यांनी मूळ संविधान प्रवाही इटालिक शैलीमध्ये (Italic style) स्वहस्ते लिहिले आहे.**

2022

**64.** 13 डिसेंबर, 1946 रोजी ________ यांनी भारताच्या घटना समितीमध्ये उद्दीष्टांचा ठराव मांडला.

(1) सुचेता कृपालानी (2) सरोजिनी नायडू
(3) डॉ. राजेंद्र प्रसाद (4) पंडीत जवाहरलाल नेहरू

On $13^{th}$ December, 1946 ________ moved the Objective Resolution in the Constituent Assembly of India.

(1) Sucheta Kripalani (2) Sarojini Naidu
(3) Dr. Rajendra Prasad (4) Pandit Jawaharlal Nehru

2019

**21.** भारतीय स्वातंत्र्य कायदा – 1947 मुळे संविधान सभेच्या स्थानामध्ये झालेल्या बदलाबाबतची खालील विधाने विचारात घ्या :

अ. संविधान सभा पूर्ण सार्वभौम संस्था बनली. → CBM तं est. but तरी पण british control होता.
ब. संविधान सभा ही स्वतंत्र भारताची पहिली संसद बनली. → correct.
क. जेंव्हा संविधान सभा विधिमंडळ संस्था म्हणून भरत असे, तेंव्हा तिच्या अध्यक्षस्थानी डॉ. राजेन्द्र प्रसाद असत.
ड. संविधान सभेची सदस्य संख्या 389 च्या तुलनेने 299 पर्यंत कमी झाली. why? → Muslim league → संस्थानांचे सदस्य.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधाने अ, ब आणि क बरोबर (2) विधाने ब, क आणि ड बरोबर
(3) विधाने अ, ब आणि ड बरोबर (4) विधाने अ, क आणि ड बरोबर

Consider the following statements regarding changes made by the Indian Independence Act of 1947 in the position of Constituent Assembly :

a. The Constituent Assembly was made a fully sovereign body.
b. The Constituent Assembly became the first Parliament of free India.
c. When the Constituent Assembly met as the Legislative body it was chaired by Dr. Rajendra Prasad.
d. The total strength of the Constituent Assembly came down to 299 as against 389.

**Answer Options :**

(1) Statements a, b and c are correct (2) Statements b, c and d are correct
(3) Statements a, b and d are correct (4) Statements a, c and d are correct

2018

To define who are citizens of India right from the begining

To prepare for first general Elections

56. भारतीय राज्यघटनेच्या खालीलपैकी कोणत्या तरतूदी 26 नोव्हेंबर 1949 रोजी लागू झाल्या ?

अ. नागरिकत्व
ब. निवडणूका (कलम-324)
क. तात्पुरती संसद
ड. मूलभूत अधिकार

To avoid legislative vaccume

Can claim only after the constitution was fully enforced.

पर्यायी उत्तरे :

(1) अ, ब आणि क (2) ब, क आणि ड (3) अ आणि क (4) अ आणि ब

On 26th November, 1949, which of the following provisions of the Constitution of India came into effect ?

a. Citizenship
b. Elections (Article-324)
c. Provisional Parliament
d. Fundamental Rights

**Answer Options :**

(1) a, b and c (2) b, c and d (3) a and c (4) a and b

2019

25. खालीलपैकी कोणती बाब जुळत नाही ?

(1) 11 डिसेंबर 1946 : जवाहरलाल नेहरुंनी संविधान सभेत उद्दिष्ठांचा ठराव मांडला.

(2) 29 ऑगस्ट, 1947 : मसुदा समितीची स्थापना

(3) 26 नोव्हेंबर, 1949 : भारतीय जनतेने संविधान स्वीकृत आणि अधिनियमित करुन स्वतः प्रत अर्पण केली.

(4) 24 जानेवारी, 1950 : संविधान सभेच्या सदस्यांनी अंतीमतः संविधानावर स्वाक्षऱ्या केल्या.

Which of the following items is wrongly matched ?

(1) 11th December, 1946 : Jawaharlal Nehru moved the Objective Resolution in the Constituent Assembly.

(2) 29th August, 1947 : Drafting committee was set up

(3) 26th November, 1949 : The people of India adopted, enacted and gave to themselves the Constitution.

(4) 24th January, 1950 : Constitution was finally signed by the members of the Constituent Assembly.

2024

G.V. Mavalankar was Speaker, not Deputy Speaker. The Deputy Speaker was Ananthasayanam Ayyangar.

83. 'पहिल्या लोकसभेच्या' संदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

(A) 25 आक्टोबर 1951 ते 21 फेब्रुवारी 1952 या कालावधित झालेल्या भारताच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर 17 एप्रिल 1952 रोजी पहिल्यांदा लोकसभेची स्थापना करण्यात आली.

(B) पहिल्या लोकसभेचे पहिले अधिवेशन 13 मे 1952 रोजी सुरू झाले.

(C) पहिल्या लोकसभेने आपला कालावधी पूर्ण केला आणि ती 1 एप्रिल 1957 रोजी विसर्जित झाली.

(D) श्री. जी.व्ही. मावळणकर हे पहिल्या लोकसभेचे उप सभापती होते.

वरीलपैकी कोणते विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) केवळ (A) (2) (A) आणि (B) (3) (B), (C) आणि (D) (4) केवळ (D)

Consider the following statements about First Lok Sabha :

(A) The first Lok Sabha was constituted on 17 April 1952 after India's First General Elections were held from 25 October 1951 to 21 February 1952.

(B) The first session of first Lok Sabha commenced on 13 May 1952.

(C) The first Lok Sabha lasted its Full tenure and dissolved on 1 April 1957.

(D) Shri. G.V. Mavalankar was the First Deputy Speaker of First Lok Sabha.

Which of the statements given above is/are **correct** ?

(1) (A) Only (2) (A) and (B) (3) (B), (C) and (D) (4) (D) Only

2024

76. **अयोग्य** जोडी ओळखा :

(1) जुलै 22, 1947 - संविधान सभेद्वारा राष्ट्रध्वजाचा स्वीकार.

(2) जानेवारी 24, 1950 - संविधान सभेद्वारा राष्ट्रगीताचा स्वीकार.

(3) जानेवारी 25, 1950 - शासनाद्वारा राष्ट्रीय दिनदर्शिकेचा स्वीकार.

(4) जानेवारी 26, 1950 - शासनाद्वारा राष्ट्रीय चिन्हाचा स्वीकार.

Identify the **incorrect** pair :

(1) July 22, 1947 - Adoption of National Flag by the Constituent Assembly.

(2) January 24, 1950 - Adoption of National Anthem by the Constituent Assembly.

(3) January 25, 1950 - Adoption of National Calendar by the Government.

(4) January 26, 1950 - Adoption of National Emblem by the Government.

2015

**33.** पुढील दोन विधानांपैकी कोणते ***चुकीचे*** आहे ?

अ. घटना समिती (कॉन्स्टिट्युन्ट असेम्बली) नंतर विधान समिती (लेजिस्लेटिव्ह असेम्बली) बनली जिचे पुढे रूपांतर तात्पुरत्या / हंगामी संसदेत (पार्ल्यामेंट मधे) झाले.

ब. ज्या दिवशी घटनेवर सह्या होत होत्या त्या दिवशी बाहेर पावसाची रिमझिम चालू होती जो एक शकून मानला गेला.

(1) केवल अ

(2) केवल ब

(3) दोन्ही अ व ब

(4) दोन्ही नाहीत

Which one of the following two statements is ***incorrect*** ?

a. The Constituent Assembly turned into Legislative Assembly which got transformed into Provisional Parliament of India.

b. On the day the Constitution was being signed it was drizzling outside and it was interpreted as a sign of good omen.

(1) Only a

(2) Only b

(3) Both a and b

(4) Neither a nor b

**78.** बी. पट्टाभी सीतारामय्या हे खालील समितीचे अध्यक्ष होते.

2025

अ. सभागृह समिती

ब. मुख्य आयुक्तांच्या प्रांताबाबत समिती

क. नागरिकत्वाबाबत तदर्थ समिती

ड. सर्वोच्च न्यायालयाबाबत तदर्थ समिती

(1) फक्त अ, ब

(2) फक्त क, ड

(3) फक्त अ, ड

(4) फक्त ब, क

B. Pattabhi Sitaramayya was a Chairman of the following Committees.

A. House Committee

B. Committee on Chief Commissioner's Provinces

C. Adhoc Committee on Citizenship

D. Adhoc Committee on Supreme Court

(1) Only A, B

(2) Only C, D

(3) Only A, D

(4) Only B, C

2025 38 **E21**

**82.** खालीलपैकी कोणती कार्ये 24 जानेवारी, 1950 रोजी संविधान सभेने केली आहेत ?

अ. राष्ट्र ध्वजाचा स्वीकार

ब. राष्ट्र गीताचा स्वीकार

क. राष्ट्र गानाचा स्वीकार

ड. डॉ. राजेंद्र प्रसाद यांची भारताचे प्रथम राष्ट्रपती म्हणून निवड

(1) फक्त अ, ब, क
(2) फक्त अ, ब, ड
(3) फक्त अ, क, ड
(4) फक्त ब, क, ड

Which of the following functions were performed by Constituent Assembly on January 24, 1950 ?

A. Adopted the National Flag

B. Adopted the National Anthem

C. Adopted the National Song

D. Elected Dr. Rajendra Prasad as a First President of India

(1) Only A, B, C
(2) Only A, B, D
(3) Only A, C, D
(4) Only B, C, D

**83.** खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.

अ. कॅबिनेट मिशन योजनेनुसार नोव्हेंबर, 1946 मध्ये संविधान सभा निर्माण करण्यात आली होती.

ब. कॅबिनेट मिशनने दोन संविधान सभेच्या विचारांना नकार दिला.

क. मुस्लिम लिगने क्रिप्स प्रस्ताव स्वीकारला होता.

2025

(1) फक्त अ, ब (2) फक्त ब, क

(3) फक्त अ, क (4) वरीलपैकी सर्व

Select the correct statements from the following.

A. The Constituent Assembly was constituted in November, 1946 under the Cabinet Mission Plan.

B. Cabinet Mission rejected the idea of two Constituent Assemblies.

C. The Cripps Proposal was accepted by the Muslim League.

(1) Only A, B (2) Only B, C

(3) Only A, C (4) All of the above

CHAPTER

# 03

# संविधान : संकल्पना




2025

39 E21

**84.** आधुनिक संविधानवाद या संकल्पनेची सुरुवात कोणत्या देशात झाली ?

(1) अमेरिका (2) इंग्लंड

(3) फ्रान्स (4) भारत

In which country, the concept of Modern Constitutionalism was started ?

(1) America (2) England

(3) France (4) India

## भारतीय संविधानाची प्रमुख वैशिष्ट्ये SALIENT FEATURES OF THE INDIAN CONSTITUTION

**भारतीय संविधानाची ठळक वैशिष्ट्ये**

- लिखित संविधान (Written Constitution): उदा. अमेरिका (USA), कॅनडा, फ्रान्स, भारत, जपान.
- अलिखित संविधान (Unwritten Constitution): उदा. ब्रिटन (UK), न्यूझीलंड, इस्रायल.
- ताठर/परिवर्तनीय नसलेले संविधान (Rigid Constitution): उदा. अमेरिका (USA), ऑस्ट्रेलिया, स्वित्झर्लंड.
- लवचिक संविधान (Flexible Constitution): उदा. ब्रिटन (UK), न्यूझीलंड.
- संघराज्यीय शासन पद्धती (Federal System): उदा. अमेरिका (USA), स्वित्झर्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, रशिया, ब्राझील.
- एकात्म शासन पद्धती (Unitary System): उदा. ब्रिटन (UK), फ्रान्स, जपान, चीन, इटली, नॉर्वे.

| ठळक वैशिष्ट्ये/SALIENT FEATURES | तपशील/DETAILS |
|---|---|
| सर्वात मोठे लिखित संविधान (Lengthy Written Constitution) | ❍ मूळ संविधान (१९४९): एक उद्देशिका, ३९५ कलमे, २२ भाग आणि ८ परिशिष्टे.<br>❍ वैशिष्ट्य: हे जगातील सर्वात सविस्तर आणि मोठे लिखित संविधान आहे. |
| विविध स्त्रोतांपासून बनवलेले (Drawn from Various Sources) | ♦ डॉ. बी. आर. आंबेडकर: "जगातील सर्व ज्ञात संविधानांचा धांडोळा (Ransacking) घेऊन भारताचे संविधान तयार करण्यात आले आहे."<br>♦ महत्त्वाचे स्त्रोत:<br>❍ संरचनात्मक भाग: भारत सरकार कायदा, १९३५ (बहुतांश प्रशासकीय आराखडा येथून घेतला आहे).<br>❍ दार्शनिक/वैचारिक भाग (Philosophical Part):<br>■ मूलभूत अधिकार: अमेरिकन संविधान.<br>■ मार्गदर्शक तत्वे (DPSPs): आयरिश (आयर्लंड) संविधान.<br>❍ राजकीय भाग:<br>■ कॅबिनेट सरकारचे तत्व.<br>■ कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ यांच्यातील संबंध.<br>■ स्त्रोत: ब्रिटीश संविधान. |
| ताठरता आणि लवचिकता यांचा समन्वय (Blend of Rigidity and Flexibility) | ❍ ताठर संविधान (Rigid): ज्यामध्ये घटनादुरुस्तीसाठी विशेष प्रक्रियेची गरज असते (उदा. अमेरिका).<br>❍ लवचिक संविधान (Flexible): ज्यामध्ये सामान्य कायद्यांप्रमाणे सहज बदल करता येतात (उदा. ब्रिटन).<br>❍ भारतीय संविधान:<br>■ हे ना पूर्णपणे ताठर आहे, ना पूर्णपणे लवचिक.<br>■ हे दोन्हीचा सुवर्णमध्य किंवा समन्वय (Synthesis) आहे.<br>■ काही कलमांमध्ये साध्या बहुमताने, तर काहींमध्ये विशेष बहुमताने बदल करता येतो. |

<table>
<tr>
<td>एकात्मिक झुकवा असलेले संघराज्य (Federal System with Unitary Bias)</td>
<td>कलम १:<br>❍ भारताचे वर्णन "राज्यांचा संघ" (Union of States) असे केले आहे, "राज्यांचे संघराज्य" (Federation of States) असे नाही.
<table>
<tr>
<th>संघराज्यीय वैशिष्ट्ये (Federal Features)</th>
<th>एकात्मिक किंवा बिगर-संघराज्यीय वैशिष्ट्ये (Unitary / Non-federal Features)</th>
</tr>
<tr>
<td>❍ दोन सरकारे: केंद्र आणि राज्य स्तरावर स्वतंत्र सरकारे.<br>❍ अधिकारांची विभागणी: केंद्र आणि राज्यांमध्ये अधिकारांचे स्पष्ट वाटप.<br>❍ लिखित संविधान: शासन व्यवस्थेचे नियम लिखित स्वरूपात आहेत.<br>❍ संविधानाचे सर्वोच्चत्व: देशात संविधान सर्वोच्च आहे.<br>❍ संविधानाची ताठरता: काही महत्त्वाच्या तरतुदी बदलण्यासाठी कठीण प्रक्रिया.<br>❍ स्वतंत्र न्यायव्यवस्था: केंद्र-राज्य वादांच्या सोडवणुकीसाठी निष्पक्ष न्यायमंडळ.<br>❍ द्विगृही कायदेमंडळ: लोक सभा आणि राज्य सभा अशी दोन सभागृहे.</td>
<td>❍ प्रबळ केंद्र: केंद्राकडे राज्यांच्या तुलनेत अधिक अधिकार आहेत.<br>❍ एकच संविधान: संपूर्ण देशासाठी (राज्यांसाठीही) एकच संविधान आहे.<br>❍ एकेरी नागरिकत्व: केवळ भारताचे नागरिकत्व, राज्यांचे स्वतंत्र नागरिकत्व नाही.<br>❍ संविधानाची लवचिकता: संविधानाचा मोठा भाग केंद्र सरकार सहजपणे बदलू शकते.<br>❍ एकात्मिक न्यायव्यवस्था: सर्वोच्च न्यायालयापासून कनिष्ठ न्यायालयांपर्यंत एकच साखळी.<br>❍ राज्यपालाची नियुक्ती: केंद्र सरकारद्वारे राज्यांच्या राज्यपालांची नियुक्ती केली जाते.<br>❍ अखिल भारतीय सेवा: (IAS, IPS इत्यादी) ज्यांच्यावर केंद्राचे नियंत्रण असते.<br>❍ आणीबाणीच्या तरतुदी: आणीबाणीच्या काळात संघराज्य पूर्णपणे एकात्मिक (Unitary) बनते.</td>
</tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>संसदीय शासन पद्धती (Parliamentary Form of Government)</td>
<td>❍ याला 'पंतप्रधान नियंत्रित शासन' (Prime Ministerial Government) असेही संबोधले जाते.<br>❍ जबाबदारी: कार्यकारी मंडळ (Executive) हे आपल्या कृतींसाठी कायदेमंडळाला (Legislature) जबाबदार असते.<br>❍ ब्रिटीश धर्तीवर आधारित असली तरीही भारतीय पद्धतीत काही महत्त्वाचे फरक आहेत:<br>■ भारतीय संसद ब्रिटीश संसदेप्रमाणे पूर्णतः सार्वभौम नाही.<br>■ गणराज्य (Republic): भारताचा राष्ट्रप्रमुख हा लोकनियुक्त (Elected) असतो.<br>■ राजेशाही (Monarchy): ब्रिटनचा राष्ट्रप्रमुख हा वंशपरंपरागत (Hereditary) असतो.</td>
</tr>
<tr>
<td>संसदीय सार्वभौमत्व आणि न्यायालयीन सर्वोच्चता यांचा समन्वय</td>
<td>❍ संसदीय सार्वभौमत्व: हे ब्रिटीश शासन पद्धतीचे वैशिष्ट्य आहे.<br>❍ न्यायालयीन सर्वोच्चता: हे अमेरिकन शासन पद्धतीचे वैशिष्ट्य आहे.<br>❍ भारतीय संविधान: भारतीय संविधानाने या दोन्ही तत्त्वांचा सुयोग्य मेळ घातला आहे.</td>
</tr>
<tr>
<td>एकात्मिक आणि स्वतंत्र न्यायव्यवस्था (Integrated and Independent Judiciary)</td>
<td>❍ एकात्मिक प्रणाली: भारतामध्ये न्यायालयांची एकच साखळी (Single system) आहे.<br>■ ही न्यायालये केंद्रीय कायदे + राज्य कायदे या दोन्हींची अंमलबजावणी करतात.<br>❍ अमेरिकेपेक्षा (USA) भिन्न:<br>■ अमेरिकेत 'दुहेरी न्यायव्यवस्था' (Dual Judiciary) आहे.<br>■ तेथे संघीय कायद्यांसाठी (Federal laws) संघीय न्यायालये आणि राज्यांच्या कायद्यांसाठी राज्य न्यायालये असतात.</td>
</tr>
</table>

| | |
|---|---|
| **एकेरी नागरिकत्व (Single Citizenship)** | **संघराज्यीय रचना आणि केंद्र व राज्य अशी दुहेरी राज्यव्यवस्था (Dual polity) असूनही:**<br>❍ भारतात फक्त एकच नागरिकत्व आहे (राज्यांचे स्वतंत्र नागरिकत्व नाही).<br>❍ अर्थात, प्रत्येक व्यक्ती ही फक्त 'भारताची नागरिक' असते. |

## इतर स्रोतांकडून घेतलेली वैशिष्ट्ये: Features Borrowed from other sources:

| | |
|---|---|
| **भारत सरकार कायदा, Government of India Act**<br>**१९३५ चा कायदा** | ❍ फेडरल योजना Federal scheme<br>❍ राज्यपालाचे पद<br>❍ न्यायव्यवस्था<br>❍ लोकसेवा आयोग<br>❍ आणीबाणीच्या तरतुदी<br>❍ प्रशासकीय तपशील (सर्वसाधारण) |
| **ब्रिटीश संविधान** | ❍ संसदीय शासन पद्धती<br>❍ कायद्याचे राज्य<br>❍ कायदेमंडळाची प्रक्रिया<br>❍ एकेरी नागरिकत्व<br>❍ मंत्रिमंडळ (कॅबिनेट) पद्धत<br>❍ विशेषाधिकार प्रादेशलेख (Writs)<br>❍ संसदीय विशेषाधिकार<br>❍ द्विगृही कायदेमंडळ |
| **अमेरिकन (US) संविधान** | ❍ मूलभूत अधिकार<br>❍ न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य<br>❍ न्यायालयीन पुनर्विलोकन<br>❍ राष्ट्रपतींवरील महाभियोग<br>❍ सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदमुक्त करणे<br>❍ उपराष्ट्रपती पद |
| **आयरिश (Irish) संविधान** | ❍ राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे (DPSPs)<br>❍ राज्यसभेवर सदस्यांचे नामनिर्देशन<br>❍ राष्ट्रपतींच्या निवडीची पद्धत |
| **कॅनडाचे (Canadian) संविधान** | ❍ प्रबळ केंद्र असलेले संघराज्य<br>❍ उर्वरित अधिकार केंद्राकडे असणे<br>❍ केंद्राद्वारे राज्यपालांची नियुक्ती<br>❍ सर्वोच्च न्यायालयाचे सल्लागार अधिकारक्षेत्र |
| **ऑस्ट्रेलियन (Australi-an) संविधान** | ❍ समवर्ती सूची<br>❍ व्यापार, वाणिज्य आणि व्यवहाराचे स्वातंत्र्य<br>❍ संसदेच्या दोन्ही सभागृहांचे संयुक्त अधिवेशन |
| **जर्मनीचे वायमर संविधान** | ❍ आणीबाणीच्या काळात मूलभूत अधिकार स्थगित करण्यासंबंधीच्या तरतुदी |
| **सोव्हिएत संविधान (USSR/रशिया)** | ❍ मूलभूत कर्तव्ये<br>❍ उद्देशिकेतील न्यायाचा आदर्श (सामाजिक, आर्थिक आणि राजकीय) |
| **फ्रेंच (French) संविधान** | ❍ गणराज्य<br>❍ उद्देशिकेतील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे आदर्श |
| **दक्षिण आफ्रिकेचे संविधान** | ❍ राज्यघटना दुरुस्तीची प्रक्रिया<br>❍ राज्यसभेच्या सदस्यांची निवडणूक |

| जपानचे (Japanese) संविधान | ❍ कायद्याने प्रस्थापित केलेली प्रक्रिया |
|---|---|

2013

85. भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये व जगातील इतर राज्यघटनेची उसनवारी यांच्या जोड्या लावा. (योग्य पर्याय निवडा)

| | **यादी क्र. - 1 वैशिष्ट्ये** | | **यादी क्र. - 2 स्रोत** |
|---|---|---|---|
| (a) | राज्यपालांचे पद | (i) | भारत सरकार कायदा 1935 |
| (b) | न्यायालयीन पुनरावलोकन | (ii) | ब्रिटीश घटना |
| (c) | राज्यधोरणांची मार्गदर्शक तत्त्वे | (iii) | आयर्लंडची घटना |
| (d) | संसदीय राज्यपद्धती | (iv) | अमेरिकेची घटना |

**पर्याय :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

Match the features of Indian Constitution with the sources borrowed from different constitutions of the world. (use correct codes)

| | List 1 – Features | | List 2 – Sources |
|---|---|---|---|
| (a) | Office of the Governor | (i) | Government of India Act 1935 |
| (b) | Judicial Review | (ii) | British Constitution |
| (c) | Directive Principles of State policy | (iii) | Ireland Constitution |
| (d) | Parliamentary System of Government | (iv) | American Constitution |

Codes :

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (i) | (iii) | (iv) | (ii) |

2015

**74.** खालील विधाने विचारात घ्या :

अ. ब्रिटिश घटना ही अलिखित आहे.

ब. ब्रिटेन मधे संसद सर्वोच्च आहे.

क. ब्रिटिश घटना सर्वात अधिक लवचिक आहे.

वरीलपैकी कोणते विधान ***चूकीचे*** आहे ?

(1) अ (2) ब

(3) क (4) वरालपैकी कोणतेही नाही

Consider the following statements :

a. The British Constitution is an unwritten constitution.

b. In Britain, the Parliament is supreme.

c. Britain has the most flexible form of constitution.

Which of the above statements is ***not*** correct ?

(1) a (2) b

(3) c (4) None of the above

2018

**66.** भारतीय राज्यघटनेच्या दुसऱ्या परिशिष्टामध्ये काही पदाधिकाऱ्यांचे मानधन, भत्ता, विशेषाधिकार आणि इतर बाबी यांचा समावेश आहे. खालीलपैकी कोणता पदाधिकारी यांत समाविष्ट ***नाही*** ?

(1) विधानसभेचे उपसभापती

(2) विधानपरिषदेचे उपाध्यक्ष

(3) भारताचा महाधिवक्ता → AGI = Adviser to Government, not a salaried official, President decides his pay!

(4) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

The Second Schedule of the Indian Constitution mentions salary, allowances and other privileges of certain officials. Which one of the following is ***not*** amongst those officials ?

(1) The Deputy Speaker of Legislative Assembly

(2) The Deputy Chairman of Legislative Council

(3) The Attorney General of India

(4) The Comptroller and Auditor General of India

CHAPTER 04

# भारतीय संविधानाचे भाग व परिशिष्ट

## भारतीय संविधानाचे भाग PARTS OF INDIAN CONSTITUTION

| भाग | विषय | कलमे |
|---|---|---|
| भाग I | संघराज्य आणि त्याचे क्षेत्र | कलम १ ते ४ |
| भाग II | नागरिकत्व | कलम ५ ते ११ |
| भाग III | मूलभूत अधिकार | कलम १२ ते ३५ |
| भाग IV | मार्गदर्शक तत्वे | कलम ३६ ते ५१ |
| भाग IVA | मूलभूत कर्तव्ये | कलम ५१A |
| भाग V | ❍ केंद्र सरकार (The Union)<br>❍ कार्यकारी मंडळ (कलम ५२ ते ७८)<br>❍ संसद (कलम ७९ ते १२२)<br>❍ राष्ट्रपतींचे कायदेविषयक अधिकार (कलम १२३)<br>❍ केंद्रीय न्यायव्यवस्था (कलम १२४ ते १४७)<br>❍ भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कलम १४८ ते १५१) | कलम ५२ ते १५१ |
| भाग VI | ❍ राज्य सरकारे (The States)<br>❍ सर्वसाधारण (कलम १५२)<br>❍ कार्यकारी मंडळ (कलम १५३ ते १६७)<br>❍ राज्याचे कायदेमंडळ (कलम १६८ ते २१२)<br>❍ राज्यपालाचे कायदेविषयक अधिकार (कलम २१३)<br>❍ उच्च न्यायालये (कलम २१४ ते २३२) | कलम १५२ ते २३७ |
| | ❍ दुय्यम न्यायालये (कलम २३३ ते २३७) | |
| भाग VII | पहिल्या अनुसूचीतील भाग ब मधील राज्ये - १९५६ च्या ७ व्या घटनादुरुस्तीद्वारे रद्द | - |
| भाग VIII | केंद्रशासित प्रदेश | कलम २३९ ते २४२ |
| भाग IX | पंचायती | कलम २४३ ते २४३O |
| भाग IXA | नगरपालिका | कलम २४३P ते २४३ZG |

| | | |
|---|---|---|
| भाग IXB | सहकारी संस्था | कलम २४३H ते २४३ZT |
| भाग X | अनुसूचित आणि जनजातीय क्षेत्रे | कलम २४४ ते २४४A |
| भाग XI | **केंद्र आणि राज्यांमधील संबंध**<br>❍ कायदेविषयक संबंध (कलम २४५ ते २५५)<br>❍ प्रशासकीय संबंध (कलम २५६ ते २६३) | कलम २४५ ते २६३ |
| भाग XII | **वित्त, मालमत्ता, कंत्राटे आणि दावे**<br>❍ वित्त (कलम २६४ ते २९१)<br>❍ कर्ज घेणे (कलम २९२ ते २९३)<br>❍ मालमत्ता, कंत्राटे, अधिकार, दायित्वे आणि दावे (कलम २९४ ते ३००)<br>❍ मालमत्तेचा अधिकार (कलम ३००-A) | कलम २६४ ते ३००A |
| भाग XIII | भारताच्या राज्यक्षेत्रातील व्यापार, वाणिज्य आणि व्यवहार | कलम ३०१ ते ३०७ |
| भाग XIV | केंद्र आणि राज्यांच्या अधिनस्थ सेवा | कलम ३०८ ते ३२३ |
| भाग XIVA | न्यायाधिकरणे (Tribunals) | कलम ३२३A ते ३२३B |
| भाग XV | निवडणुका | कलम ३२४ ते ३२९A |
| भाग XVI | विशिष्ट वर्गांसाठी विशेष तरतुदी | कलम ३३० ते ३४२ |
| Part XVII | **अधिकृत भाषा (Official Language)**<br>❍ संघराज्याची भाषा (कलम ३४३ ते ३४४)<br>❍ प्रादेशिक भाषा (कलम ३४५ ते ३४७)<br>❍ सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालये इत्यादींची भाषा (कलम ३४८ ते ३४९)<br>❍ विशेष निर्देश (कलम ३५० ते ३५१) | कलम ३४३ ते ३५१ |
| Part XVIII | आणीबाणीविषयक तरतुदी | कलम ३५२ ते ३६० |
| Part XIX | संकीर्ण (Miscellaneous) | कलम ३६१ ते ३६७ |
| Part XX | संविधानाची दुरुस्ती | कलम ३६८ |
| Part XXI | तात्पुरत्या, संक्रमणकालीन आणि विशेष तरतुदी | कलम ३६९ ते ३९२ |
| Part XXII | संक्षिप्त नाव, प्रारंभ, हिंदीतील अधिकृत मजकूर आणि निरसने | कलम ३९३ ते ३९५ |

## SCHEDULES OF INDIAN CONSTITUTION

| परिशिष्ट | तपशील |
|---|---|
| परिशिष्ट १ | राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची नावे आणि त्यांच्या प्रादेशिक सीमा. |
| परिशिष्ट २ | राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल, लोकसभा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष, राज्यसभा सभापती आणि उपसभापती, तसेच सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे पगार, भत्ते आणि विशेषाधिकार. |
| परिशिष्ट ३ | घटनात्मक पदाधिकाऱ्यांसाठी शपथा आणि प्रतिज्ञा (राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती वगळून). |

| | |
|---|---|
| परिशिष्ट ४ | राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना राज्यसभेतील जागांचे वाटप. |
| परिशिष्ट ५ | अनुसूचित क्षेत्रे आणि अनुसूचित जमातींचे प्रशासन आणि नियंत्रण (मुख्यतः मध्य आणि द्वीपकल्पीय भारत). |
| परिशिष्ट ६ | आसाम, मेघालय, त्रिपुरा आणि मिझोरममधील आदिवासी क्षेत्रांचे प्रशासन (स्वायत्त जिल्हा परिषदा). |
| परिशिष्ट ७ | केंद्र सूची, राज्य सूची आणि समवर्ती सूचीद्वारे केंद्र आणि राज्यांमधील अधिकारांचे वाटप. |
| परिशिष्ट ८ | भारताच्या अधिकृत भाषा (२२ भाषा). |
| परिशिष्ट ९ | काही कायद्यांचे न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षण (नव्या परिशिष्टात समाविष्ट केलेले कायदे). |
| परिशिष्ट १० | पक्षांतर बंदी कायदा: पक्षांतराच्या कारणावरून खासदार आणि आमदारांना अपात्र ठरवणे. |
| परिशिष्ट ११ | पंचायतींचे अधिकार, प्राधिकार आणि जबाबदाऱ्या (२९ विषय). |
| परिशिष्ट १२ | नगरपालिकांचे अधिकार, प्राधिकार आणि जबाबदाऱ्या (१८ विषय). |

2018

66. भारतीय राज्यघटनेच्या दुसऱ्या परिशिष्टामध्ये काही पदाधिकाऱ्यांचे मानधन, भत्ता, विशेषाधिकार आणि इतर बाबी यांचा समावेश आहे. खालीलपैकी कोणता पदाधिकारी यांत समाविष्ट ***नाही*** ?

(1) विधानसभेचे उपसभापती

(2) विधानपरिषदेचे उपाध्यक्ष

(3) भारताचा महाधिवक्ता → AGI = Adviser to Government, not a salaried official, President decides his pay!

(4) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

The Second Schedule of the Indian Constitution mentions salary, allowances and other privileges of certain officials. Which one of the following is ***not*** amongst those officials ?

(1) The Deputy Speaker of Legislative Assembly

(2) The Deputy Chairman of Legislative Council

(3) The Attorney General of India

(4) The Comptroller and Auditor General of India

2021

83. शपथा किंवा प्रतिज्ञांचे नमुने भारतीय राज्यघटनेच्या ________ अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत.

(1) दहाव्या (2) सहाव्या (3) तिसऱ्या (4) पहिल्या

Forms of Oaths or Affirmations are included in the ________ schedule of the Indian Constitution.

(1) tenth (2) sixth (3) third (4) first

2023

**80.** योग्य जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | भाग – I | i. | मूलभूत हक्क |
| ब. | भाग – III | ii. | पंचायत राज |
| क. | भाग – IX | iii. | नागरिकत्व |
| ड. | भाग – II | iv. | संघराज्य व त्याचे कार्यक्षेत्र |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | ii | iii | i |
| (2) | iii | i | ii | iv |
| (3) | ii | iii | i | iv |
| (4) | iv | i | ii | iii |

Match the pairs correctly.

| | | | |
|---|---|---|---|
| A. | Part – I | i. | Fundamental Rights |
| B. | Part – III | ii. | Panchayat Raj |
| C. | Part – IX | iii. | Citizenship |
| D. | Part – II | iv. | The Union and its territory |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | ii | iii | i |
| (2) | iii | i | ii | iv |
| (3) | ii | iii | i | iv |
| (4) | iv | i | ii | iii |

2025 35 **E21**

**75.** खालीलपैकी कोणते भारताच्या राज्यघटनेतील भाग I मधील कलम 1 ते 4 शी संबंधित आहे/आहेत ?

अ. संघराज्य व त्याच्या राज्यक्षेत्राशी

ब. मूलभूत अधिकाराविषयी

क. न्यायाविषयी

ड. कर्तव्याविषयी

(1) फक्त ब आणि ड (2) फक्त क आणि अ

(3) फक्त अ (4) फक्त अ आणि ब

Which of the following are related to Article 1 to 4 of Part I of the Constitution of India ?

a. The union and its territory

b. About the Fundamental Rights

c. About the Justice

d. Regarding duties

(1) Only b and d (2) Only c and a

(3) Only a (4) Only a and b

2023 ✓

**81.** पाचव्या अनुसूचीमधील अनुसूचित क्षेत्रे आणि अनुसूचित जनजाती यांच्या प्रशासनासंबंधी राज्यघटनेतील तरतूदी

(1) राज्यपाल बदलू शकतात → Regulate करतो बदलू शकत नाही.

(2) राष्ट्रपती बदलू शकतात ↗

(3) विशेष बहुमताने घटनादुरुस्ती करून संसद बदलू शकते → Special Majority ची गरज नाही.

(4) सामान्य कायदा करून संसद बदलू शकते

H

Provisions of the Constitution relating to the administration of Scheduled Areas and Scheduled Tribes in Schedule – V

(1) may be altered by the Governor

(2) may be altered by the President

(3) may be altered by the Parliament by Constitutional Amendment requiring special majority

(4) may be altered by the Parliament by ordinary legislation

2025 ✓ 35 E21

**75.** खालीलपैकी कोणते भारताच्या राज्यघटनेतील भाग I मधील कलम 1 ते 4 शी संबंधित आहे/आहेत ?

अ. संघराज्य व त्याच्या राज्यक्षेत्राशी

ब. मूलभूत अधिकाराविषयी

क. न्यायाविषयी

ड. कर्तव्याविषयी

(1) फक्त ब आणि ड
(2) फक्त क आणि अ
(3) फक्त अ
(4) फक्त अ आणि ब

Which of the following are related to Article 1 to 4 of Part I of the Constitution of India ?

a. The union and its territory

b. About the Fundamental Rights

c. About the Justice

d. Regarding duties

(1) Only b and d
(2) Only c and a
(3) Only a
(4) Only a and b

CHAPTER
05

# भारतीय संविधानाची प्रस्तावना

## भारतीय संविधानाची प्रस्तावना

**THE CONSTITUTION OF INDIA**

**PREAMBLE**

**WE, THE PEOPLE OF INDIA,** having solemnly resolved to constitute India into a [1][**SOVEREIGN SOCIALIST SECULAR DEMOCRATIC REPUBLIC**] and to secure to all its citizens :

**JUSTICE,** social, economic and political;

**LIBERTY** of thought, expression, belief, faith and worship;

**EQUALITY** of status and of opportunity and to promote among them all;

**FRATERNITY** assuring the dignity of the individual and the [2][unity and integrity of the Nation];

**IN OUR CONSTITUENT ASSEMBLY** this twenty-sixth day of November, 1949 do **HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.**

1. Subs. by the Constitution (Forty-second Amendment) Act, 1976, Sec.2, for "Sovereign Democratic Republic" (w.e.f. 3.1.1977)
2. Subs. by the Constitution (Forty-second Amendment) Act, 1976, Sec.2, for "Unity of the Nation" (w.e.f. 3.1.1977)

- एन. ए. पालखीवाला: यांनी उद्देशिकेचे वर्णन "राज्यघटनेचे ओळखपत्र" (Identity card of the Constitution) असे केले आहे.
- पार्श्वभूमी: अमेरिकन राज्यघटना ही जगातली पहिली अशी राज्यघटना होती जिची सुरुवात उद्देशिकेने झाली.
- उद्देश ठराव (Objective Resolution):
  - भारतीय राज्यघटनेची उद्देशिका ही पंडित जवाहरलाल नेहरूंनी मांडलेल्या 'उद्देश ठरावा'वर आधारित आहे.
  - हा ठराव १३ डिसेंबर १९४६ रोजी मांडण्यात आला.
  - संविधान सभेने २२ जानेवारी १९४७ रोजी याचा स्वीकार केला.
- उद्देशिका ही संविधानकर्त्यांच्या विचारांचे आणि स्वप्नांचे प्रतिबिंब आहे.
- ४२ वी घटनादुरुस्ती अधिनियम, १९७६: या एतिहासिक दुरुस्तीद्वारे उद्देशिकेत तीन नवीन शब्दांचा समावेश करण्यात आला:
  - १. समाजवादी (Socialist)
  - २. धर्मनिरपेक्ष (Secular)
  - ३. एकात्मता (Integrity)

## उद्देशिकेचे घटक (Ingredients of the Preamble):

- १. अधिकाराचा स्रोत: राज्यघटनेला अधिकार 'भारताच्या जनते'कडून प्राप्त होतात.
- २. भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरूप: भारत हे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक राज्य आहे.
- ३. राज्यघटनेची उद्दिष्टे: न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता प्रस्थापित करणे ही राज्यघटनेची मुख्य उद्दिष्टे आहेत.
- ४. स्वीकृतीचा दिनांक:
  - २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना स्वीकृत करण्यात आली.
  - (टीप: उद्देश ठरावाचा स्वीकार २२ जानेवारी १९४७ रोजी झाला होता, तर संपूर्ण राज्यघटनेची स्वीकृती २६ नोव्हेंबर १९४९ रोजी झाली.)

## उद्देशिकेतील मुख्य शब्द (Key Words):

| | |
|---|---|
| **सार्वभौम (SOVEREIGN)** | ❍ भारतावर इतर कोणतीही बाह्य सत्ता किंवा अधिकार नाही.<br>❍ भारत कोणत्याही देशाचे 'अधिराज्य' (Dependency) किंवा 'वसाहत' (Dominion) नाही.<br>❍ भारत अंतर्गत आणि बाह्य बाबींमध्ये पूर्णपणे स्वतंत्र आहे.<br>❍ संयुक्त राष्ट्र (UNO) चे सदस्यत्व भारताच्या सार्वभौमत्वावर मर्यादा आणत नाही.<br>❍ राष्ट्रमंडल (Commonwealth) देशांचे सदस्यत्व भारताच्या सार्वभौमत्वावर परिणाम करत नाही. |
| **समाजवादी (SOCIALIST)** | ❍ काँग्रेसने आवडी (Avadi) अधिवेशनात "समाजाचा समाजवादी आराखडा" स्वीकारला होता.<br>❍ भारतीय समाजवाद = लोकशाही समाजवाद:<br>■ हा साम्यवादी (Communistic) किंवा राज्य समाजवाद (State Socialism) नाही.<br>❍ मिश्र अर्थव्यवस्था:<br>■ सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रे दोन्ही एकत्र अस्तित्वात आहेत.<br>❍ मार्क्सवाद आणि गांधीवाद यांचा मेळ:<br>■ भारतीय समाजवादाचा कल गांधीवादी समाजवादाकडे अधिक आहे. |
| **धर्मनिरपेक्ष (SECULAR)** | ❍ हा शब्द ४२ व्या घटनादुरुस्तीने (१९७६) जोडण्यात आला.<br>❍ धर्मनिरपेक्षतेची सकारात्मक संकल्पना:<br>■ सर्व धर्मांना समान दर्जा आहे आणि संख्याबळ कितीही असले तरी सर्वांना राज्याचा (State) समान पाठिंबा मिळतो. |
| **लोकशाही (DEMOCRATIC)** | ❍ हे 'लोकप्रिय सार्वभौमत्व' या सिद्धांतावर आधारित आहे, ज्यामध्ये सर्वोच्च सत्ता लोकांच्या हाती असते.<br>❍ थेट लोकशाही (उदा. स्वित्झर्लंड): थेट लोकशाहीची चार साधने:<br>■ सार्वमत (Referendum): प्रस्तावित कायदा थेट मतदानासाठी जनतेकडे पाठवला जातो.<br>■ उपक्रम (Initiative): लोक स्वतः कायदेमंडळाला एखादे विधेयक मांडण्याचा प्रस्ताव देतात.<br>■ प्रत्यावाहन (Recall): निवडून दिलेल्या प्रतिनिधीला कार्यकाळ संपण्यापूर्वी मतदार परत बोलावू शकतात.<br>■ लोकमताचा कौल (Plebiscite): सार्वजनिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर (सामान्यतः प्रादेशिक वाद) लोकांचे मत आजमावणे.<br>❍ अप्रत्यक्ष लोकशाही:<br>■ लोक आपले प्रतिनिधी निवडतात (उदा. भारत).<br>❍ स्वातंत्र्य, समता आणि बंधुता:<br>■ हे स्वतंत्र नसून एक 'त्रिपुट' (Trinity) आहेत; यांचे विभाजन लोकशाहीचा उद्देश विफल करते. |

| | |
|---|---|
| **गणराज्य (REPUBLIC)** | ❍ राज्याचा प्रमुख (Head of State) हा एका निश्चित कालावधीसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे निवडून दिलेला असतो.<br>❍ भारत:<br>■ राष्ट्रपती हे निवडून दिलेले प्रमुख आहेत.<br>■ निवड अप्रत्यक्ष पद्धतीने होते.<br>■ कार्यकाळ: ५ वर्षे.<br>❍ गणराज्याचा आणखी एक अर्थ:<br>■ राजकीय सार्वभौमत्व हे एखाद्या राजाकडे नसून लोकांकडे असते.<br>■ कोणताही विशेषाधिकार असलेला वर्ग नसतो; सर्व सार्वजनिक पदे सर्व नागरिकांसाठी खुली असतात. |
| **न्याय (JUSTICE)** | ❍ प्रकार: सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय.<br>❍ स्त्रोत: ही संकल्पना १९१७ च्या रशियन क्रांतीतून घेण्यात आली आहे.<br>❍ न्यायाची खात्री: उद्देशिकेएवजी मूलभूत अधिकार (Fundamental Rights) आणि राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे (DPSPs) यांच्या माध्यमातून न्याय सुनिश्चित केला जातो.<br>■ सामाजिक न्याय (Social justice) + आर्थिक न्याय (Economic justice) = वितरणात्मक न्याय (Distributive Justice) ही संकल्पना देखील १९१७ च्या रशियन क्रांतीतून प्रेरित आहे. |
| **स्वातंत्र्य (LIBERTY)** | ❍ अर्थ: स्वातंत्र्य म्हणजे केवळ निर्बंधांचा अभाव (Absence of restraints) नव्हे, तर व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी पुरेशा संधी उपलब्ध असणे होय.<br>❍ उद्देशिकेने दिलेली स्वातंत्र्ये:<br>■ विचार (Thought)<br>■ अभिव्यक्ती (Expression)<br>■ विश्वास (Belief)<br>■ श्रद्धा (Faith)<br>■ उपासना (Worship) |
| **समता (EQUALITY)** | ❍ समाजातील कोणत्याही घटकाला विशेष अधिकार (Special privileges) नसणे.<br>❍ सर्व नागरिकांना विकासाच्या पुरेशा आणि समान संधी उपलब्ध करून देणे.<br>❍ कोणताही भेदभाव न करणे (No discrimination). |
| **बंधुता (FRATERNITY)** | ❍ अर्थ: देशवासीयांमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण करणे.<br>❍ बंधुता या दोन गोष्टींची खात्री देते:<br>■ १. व्यक्तीची प्रतिष्ठा (Dignity of the individual)<br>■ २. राष्ट्राची एकता आणि एकात्मता (Unity and integrity of the nation)<br>❍ महत्त्वाची टीप: 'एकात्मता' (Integrity) हा शब्द ४२ व्या घटनादुरुस्तीने (१९७६) जोडण्यात आला.<br>❍ एकता आणि एकात्मता: यामध्ये मानसशास्त्रीय (Psychological) आणि प्रादेशिक (Territorial) अशा दोन्ही परिमाणांचा समावेश होतो.<br>❍ प्रतिष्ठा: याचा अर्थ असा की प्रत्येक व्यक्ती ही 'पवित्र' (Sacred) आहे, ती केवळ भौतिकदृष्ट्या समान नाही तर तिला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. |

## प्रस्तावना: संविधानाचा एक भाग म्हणून PREAMBLE: AS PART OF CONSTITUTION




- (अविभाज्य भाग → परंतु इतर भागांप्रमाणे याचा स्वतंत्रपणे कोणताही कायदेशीर परिणाम होत नाही)

| | |
|---|---|
| **उद्देशिकेचे स्थान (STATUS OF THE PREAMBLE)** | ❍ संविधान सभेची भूमिका: संविधानाच्या इतर भागांप्रमाणेच, उद्देशिका देखील संविधान सभेने अधिनियमित (Enacted) केली आहे.<br>❍ सत्तेचा स्त्रोत नाही: उद्देशिका कायदेमंडळासाठी सत्तेचा स्त्रोत (Source of power) नाही.<br>❍ सत्तेवर मर्यादा नाही: ती कायदेमंडळाच्या अधिकारांवर कोणतेही निर्बंध किंवा बंदी (Prohibition) घालत नाही.<br>❍ अर्थनिर्णयनास उपयुक्त: संविधानातील एखाद्या कलमाबाबत अस्पष्टता (Ambiguity) असल्यास, त्याचा अर्थ लावण्यासाठी उद्देशिकेचा वापर केला जाऊ शकतो.<br>❍ न्यायप्रविष्ट नाही (Non-justiciable):<br>■ उद्देशिकेतील तरतुदींची न्यायालयात अंमलबजावणी करता येत नाही. |
| **उद्देशिकेची दुरुस्तीक्षमता (AMENDABILITY OF THE PREAMBLE)** | ❍ दुरुस्ती शक्य: उद्देशिकेमध्ये दुरुस्ती केली जाऊ शकते.<br>❍ अट:<br>■ संविधानाच्या 'मूलभूत संरचनेला' (Basic Structure) धक्का न लावता दुरुस्ती करता येते (कलम ३६८ अंतर्गत).<br>❍ आतापर्यंतची दुरुस्ती:<br>■ उद्देशिकेत आतापर्यंत केवळ एकदाच दुरुस्ती करण्यात आली आहे.<br>■ ही दुरुस्ती ४२ वी घटनादुरुस्ती, १९७६ द्वारे करण्यात आली.<br>■ याद्वारे समाजवादी (Socialist), धर्मनिरपेक्ष (Secular) आणि एकात्मता (Integrity) हे तीन शब्द जोडण्यात आले. |

2024

81. भारतीय राज्यघटना धर्मनिरपेक्ष राज्य स्थापित करते म्हणजेच :

(A) राज्य रोजगाराच्या बाबतीत धर्माच्या आधारावर भेदभाव करते.

(B) राज्याने कोणत्याही विशिष्ट धर्माला अग्रक्रमाने वागणूक देण्याचे टाळले आहे.

(C) राज्य सर्व धर्मांना समान समजते.

(D) सर्व जनतेला श्रद्धा आणि पूजा करण्याचे स्वातंत्र्य आहे.

(E) कोणत्याही अपवादाशिवाय, शैक्षणिक संस्था धार्मिक शिक्षण (शिकवण) देण्यास स्वतंत्र आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (A), (B) आणि (C) (2) (B), (C) आणि (D)

(3) (A), (C), (D) आणि (E) (4) (B) आणि (D)

The Indian Constitution establishes a secular state, meaning :

(A) The state makes discrimination on the basis of religion in matters of employment.

(B) The state avoids preferential treatment for any particular religion.

(C) The state treats all religions equally.

(D) Freedom of faith and worship is allowed to all the people.

(E) Educational institutions, without exception, are free to impart religious instructions.

**Answer options :**

(1) (A), (B) and (C) (2) (B), (C) and (D)

(3) (A), (C), (D) and (E) (4) (B) and (D)

**76.** भारतीय निधर्मीपणाला एक 'मोझेक' फ्रेम का म्हटले आहे ?

(a) कारण त्यामध्ये अनेक धर्म व भाषा मानाने व स्वातंत्र्याने राहतात.

(b) कारण त्यामध्ये सर्व गट आपली ओळख नष्ट न करता एक संमिश्र संस्कृतीचा घटक होतात.

(c) सामान्य माणसाला ते एकत्र आणते.

(d) कारण भारतात कोणत्याही धर्माला राज्य धर्माचे (state religion) स्थान नाही.

(1) (a) (2) (b) (3) वरील सर्व (4) (a) आणि (

Why is Indian Secularism called as a mosaic frame ?

(a) Because in it various religions and languages flourish with freedom and dignit

(b) Because in it all groups without losing their identity become a part of the comp culture.

(c) It unites common masses.

(d) There is no state religion in India.

(1) (a) (2) (b) (3) All the above (4) (a) and (c

CHAPTER

# 06 संघ आणि त्याचे राज्यक्षेत्र

## संघ आणि त्याचे राज्यक्षेत्र UNION AND ITS TERRITORY (कलम१-४) (Articles 1–4)

- यावरून घेतले आहे: कॅनेडियन संविधान Borrowed from: Canadian Constitution

| कलमे (Articles) | वर्णन (Description) |
|---|---|
| **कलम १ (Article 1) राज्यांचा संघ (Union of States)** | ❍ भारताचे, म्हणजेच 'भारत'चे वर्णन "राज्यांचा संघ" (Union of States) असे करते, "राज्यांचे महासंघ" (Federation of States) असे नाही.हे दोन गोष्टींशी संबंधित आहे:<br>■ देशाचे नाव – इंडिया, म्हणजेच भारत<br>■ राज्यव्यवस्थेचा प्रकार – राज्यांचा संघ<br>❍ संविधानाचे पहिले परिशिष्ट (First Schedule):<br>■ राज्यांची नावे आणि त्यांच्या प्रादेशिक सीमांची यादी देते.<br>■ (याचा उल्लेख खुद्द कलम १ च्या मजकुरात नाही, तर परिशिष्टाद्वारे संदर्भ दिला आहे).<br>❍ "राज्यांचा संघ" या वाक्यांशाला दोन कारणांमुळे पसंती दिली आहे:<br>■ भारतीय संघराज्य हे अमेरिकन संघराज्याप्रमाणे राज्यांमधील कराराचा परिणाम नाही.<br>■ राज्यांना संघराज्यातून फुटून बाहेर पडण्याचा अधिकार नाही.<br>■ हे संघराज्याच्या अविनाशी स्वरूपाचे दर्शन घडवते.<br>❍ कलम १ नुसार, भारताच्या क्षेत्राचे तीन श्रेणींमध्ये वर्गीकरण केले आहे:<br>■ १. राज्यांची क्षेत्रे<br>■ २. केंद्रशासित प्रदेश<br>■ ३. भारत सरकारद्वारे कोणत्याही वेळी अधिग्रहित केली जाऊ शकणारी क्षेत्रे.<br>❍ भारत घटनात्मक मार्गांनी क्षेत्र अधिग्रहित करू शकतो. अधिग्रहित केलेल्या क्षेत्रांची उदाहरणे:<br>■ दादरा आणि नगर हवेली<br>■ दमण आणि दीव<br>■ गोवा<br>■ पुदुचेरी<br>■ सिक्कीम |
| **कलम २ (Article 2) राज्यांचे प्रवेश आणि स्थापना (Admission & Establishment of States)** | संसदेला खालील अधिकार प्रदान करण्यात आले आहेत:<br>❍ नवीन राज्यांना संघराज्यात समाविष्ट करून घेणे.<br>■ → जी राज्ये आधीच अस्तित्वात आहेत.<br>❍ नवीन राज्ये स्थापन करणे.<br>■ → जी राज्ये पूर्वी अस्तित्वात नव्हती.<br>**मुख्य फरक:**<br>❍ प्रवेश (Admission) = अस्तित्वात असलेली राज्ये<br>❍ स्थापना (Establishment) = नव्याने निर्माण केलेली राज्ये |

| | |
|---|---|
| **कलम ३ (Article 3) राज्यांची निर्मिती आणि फेरबदल (Formation & Alteration of States)** | **संसद कायद्याद्वारे खालील गोष्टी करू शकते:**<br>(a) नवीन राज्याची निर्मिती:<br>❍ कोणत्याही राज्यातून क्षेत्र वेगळे करून, किंवा<br>❍ दोन किंवा अधिक राज्ये एकत्र करून, किंवा<br>❍ राज्यांचे भाग एकत्र करून, किंवा<br>❍ कोणत्याही राज्याच्या भागाशी कोणतेही क्षेत्र जोडून.<br>(b) कोणत्याही राज्याचे क्षेत्र वाढवणे.<br>(c) कोणत्याही राज्याचे क्षेत्र कमी करणे.<br>(d) कोणत्याही राज्याच्या सीमांमध्ये बदल करणे.<br>(e) कोणत्याही राज्याच्या नावामध्ये बदल करणे.<br>**कलम ३ अंतर्गत कार्यपद्धती:**<br>❍ राष्ट्रपतींच्या पूर्व शिफारसीशिवाय संसदेत विधेयक मांडता येत नाही.<br>❍ राष्ट्रपतींनी ते विधेयक संबंधित राज्य विधीमंडळाकडे पाठवले पाहिजे:<br>■ आपली मते मांडण्यासाठी.<br>■ एका ठराविक वेळेच्या मर्यादेत.<br>❍ राज्य विधीमंडळाची मते खालील संस्थांवर बंधनकारक नाहीत:<br>■ राष्ट्रपती<br>■ संसद<br>❍ संसद खालील गोष्टी करू शकते:<br>■ नवीन राज्ये / केंद्रशासित प्रदेश निर्माण करणे.<br>■ राज्यांचे क्षेत्र, सीमा किंवा नावे बदलणे.<br>■ राज्यांच्या संमतीशिवाय.<br>❍ म्हणून, भारताचे वर्णन सार्थपणे असे केले जाते:<br>■ "विनाशकारी राज्यांचा अविनाशी संघ" (An indestructible Union of destructible States). |
| **कलम ४ (Article 4) कलम २ आणि ३ अंतर्गत कायदे (Laws under Articles 2 & 3)** | **खालील कलमांतर्गत केलेले कायदे:**<br>❍ कलम २ (राज्यांचे प्रवेश/स्थापना), आणि<br>❍ कलम ३ (राज्यांची निर्मिती/फेरबदल)<br>❍ हे कलम ३६८ अंतर्गत घटनादुरुस्ती मानले जात नाहीत.<br>❍ असे कायदे मंजूर केले जाऊ शकतात:<br>■ साध्या बहुमताने.<br>■ सामान्य वैधानिक प्रक्रियेद्वारे.<br>❍ कलम २ आणि ३. |

■ **महत्त्वाचे कायदेशीर खटले (Important Case Laws):**

**१. बेरुबारी युनियन खटला (१९६०)**

- कलम ३ मध्ये भारतीय प्रदेश परकीय देशाला बहाल करण्याचा (Cession) समावेश नाही.
- प्रदेश बहाल करण्यासाठी कलम ३६८ अंतर्गत संविधान दुरुस्तीची आवश्यकता असते.
- याची अंमलबजावणी ९ व्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे करण्यात आली.

**२. १९६९ स्पष्टीकरण (सर्वोच्च न्यायालय)**

- जर तो केवळ सीमावादाचा निकाल (Settlement of a boundary dispute) असेल तर:
  - कोणत्याही संविधान दुरुस्तीची आवश्यकता नाही.
  - हे कार्यकारी कृतीद्वारे (Executive action) केले जाऊ शकते.
  - संसदेच्या मान्यतेने.







- फझल अली आयोग (१९५३) → अहवाल (१९५४) → कायदा (१९५६) → पहिल्या परिशिष्टाची निर्मिती (१४ राज्ये + ६ केंद्रशासित प्रदेश)

## राज्य पुनर्रचना कायदा (१९५६)

- १९५६ नंतर निर्माण झालेली नवीन राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश (कलम ३ अंतर्गत संसदेने बनवलेल्या कायद्यांद्वारे)

| वर्ष (Year) | तयार झालेली राज्ये/STATES FORMED |
|---|---|
| |  |
| 1956 | ❍ केरळ → त्रावणकोर + कोचीन + दक्षिण कॅनरा<br>❍ आंध्र प्रदेश = आंध्र + हैदराबाद<br>❍ मध्य प्रदेश = मध्य भारत + विंध्य प्रदेश + भोपाळ<br>❍ नवीन केंद्रशासित प्रदेश:<br>■ लकादीव, मिनिकॉय आणि अमिनीदीवी बेटे<br>■ मद्रास राज्यापासून वेगळे केलेले |
| 1960 | ❍ बॉम्बे (मुंबइ) राज्याचे विभाजन करून महाराष्ट्र आणि गुजरात ची निर्मिती करण्यात आली. |

| | |
|---|---|
| 1961 | ❍ दादरा आणि नगर हवेली<br>■ भारतामध्ये विलीनीकरण<br>■ १० वी घटनादुरुस्ती कायदा |
| 1962 | ❍ गोवा, दमण आणि दीव<br>■ पोर्तुगीज राजवटीतून मुक्त<br>■ १२ वी घटनादुरुस्ती कायदा<br>❍ पुद्दुचेरी<br>■ फ्रेंचांकडून हस्तांतरण<br>■ १४ वी घटनादुरुस्ती कायदा |
| 1963 | ❍ नागालँड राज्य बनले. |
| 1966 | ❍ हरियाणा<br>■ पंजाबमधून वेगळे केले<br>■ १४ वे राज्य बनले<br>■ पंजाबी-हिंदी भाषिक विभागणी<br>❍ चंदिगढ<br>■ केंद्रशासित प्रदेश (UT) |
| 1971 | ❍ हिमाचल प्रदेश<br>■ पूर्ण राज्य बनले<br>❍ मणिपूर, त्रिपुरा, मेघालय – १९७२ |
| 1974 | ❍ सिक्कीम<br>■ पूर्ण राज्य बनले<br>■ ३६ वी घटनादुरुस्ती कायदा<br>■ (३५ वी घटनादुरुस्ती कायदा, १९७४: सहयोगी राज्याचा दर्जा) |
| 1987 | ❍ मिझोराम,<br>❍ अरुणाचल प्रदेश,<br>❍ गोवा |
| 2000 | ❍ छत्तीसगड (मध्य प्रदेशपासून वेगळे)<br>❍ उत्तराखंड (उत्तर प्रदेशपासून वेगळे)<br>❍ झारखंड (बिहारपासून वेगळे) |
| 2014 | ❍ तेलंगणा<br>■ आंध्र प्रदेशपासून वेगळे झाले |
| 2019 | ❍ नवीन केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती:<br>■ जम्मू आणि काश्मीर<br>■ लडाख<br>❍ जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना कायदा, २०१९:<br>■ पूर्वीच्या जम्मू आणि काश्मीर राज्याचे दोन भागात विभाजन:<br>♦ केंद्रशासित प्रदेश जम्मू आणि काश्मीर<br>♦ केंद्रशासित प्रदेश लडाख<br>♦ राष्ट्रपतींच्या आदेशाद्वारे करण्यात आले, २०१९ |

2020

. खालीलपैकी कोणते विधान **बरोबर नाही** ?

(1) राष्ट्रपतीच्या शिफारशीशिवाय नवीन राज्य निर्मितीचे विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडले जावू शकत नाही.

(2) राष्ट्रपतीने असे विधेयक संसदेत मांडण्यापुर्वी विशिष्ट कालावधीमध्ये संबंधित राज्य विधिमंडळाने आपले विचार मांडावेत यासाठी पाठविले पाहिजे.

(3) संसद केवळ विशेष बहुमताने कायदा मंजूर करून नवीन राज्य स्थापन करू शकते.

(4) राज्य विधिमंडळाने व्यक्त केलेले विचार (मत) स्विकारण्याचे बंधन संसदेवर नसते.

Which one of the following statements is **not correct** ?

(1) No bills for the formation of new state shall be introduced in either house of Parliament except on the recommendation of the President.

(2) The President before introducing the bill in the Parliament shall refer it to the concerned State Legislature for its views within a specified time limit.

(3) Parliament can form a new state only by a law passed by a special majority.

(4) The Parliament is not bound to accept the views (opinion) of the State Legislature.

---

Yes, हे absent असलं असतं तर State ला जास्त power मिळाल्या असत्या.

**78.** खालील तरतूदी विचारात घ्या.

(a) शेषाधिकार हे केन्द्र शासनाकडे आहेत. — Unitary character

(b) अधिकारांची विभागणी ही घटक राज्ये आणि केन्द्र शासनामध्ये केली आहे.

(c) राष्ट्रपती घटक राज्याच्या विधेयकांवर निर्णायक (संपूर्ण) नकाराधिकार वापरतात.

(d) केन्द्र शासन हे राज्याच्या संमतीविना राज्याचे नाव, सीमा आणि क्षेत्रामध्ये बदल करू शकते.

म्हणजे State ला Power द्यायच्या

वरीलपैकी कोणत्या तरतूद/तरतूदी नसल्या तर भारतीय राज्यघटना ही अधिक संघराज्यात्मक स्वरूपाची बनली असती ?

(1) फक्त (a) (2) (a), (c) आणि (d)

(3) (b), (c) आणि (d) (4) वरील सर्व

Federal feature

Art (200)

Unitary feature.

Consider the following provisions.

(a) The residuary powers have been left with the centre.

(b) The powers divided between states and the central government. — Division of powers between central and state

(c) President enjoys absolute veto over state bills.

(d) The Union can change the name, area and boundary of a state without its consent.

Which of the above, if absent, would make the Indian Constitution more Federal in nature ?

(1) (a) only (2) (a), (c) and (d)

(3) (b), (c) and (d) (4) All above

2019

33. खालील विधाने विचारात घ्या :

अ. भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद 2 हे भारतीय संघराज्याचा भाग नसलेल्या भू प्रदेशाचा समावेश अथवा त्याची नवीन राज्यांमध्ये स्थापना यासंबंधी आहे.

ब. भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद 3 हे अस्तित्वात असलेल्या केन्द्रशासित प्रदेशासह घटक राज्यांच्या स्थापने संबंधी अथवा त्यातील बदलासंबंधी तरतूदी प्रदान करते.

क. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद 3 खाली असलेले विधेयक हे केवळ लोकसभेतच मांडले जावू शकते.

वरीलपैकी कोणते विधान/ने योग्य आहे/त ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील सर्व (2) अ आणि ब

(3) ब आणि क (4) फक्त क

Consider the following statements :

a. Article 2 of the Indian Constitution relates to admission or establishment of new States which are not part of the Union of India.

b. Article 3 of the Indian Constitution provides for the formation of or changes in the existing States including Union territories.

c. A Bill under Article 3 of the Indian Constitution shall be introduced only in the Lok Sabha.

Which of the above statements is/are correct ?

**Answer Options :**

(1) All of the above (2) a and b

(3) b and c (4) Only c

2019

35. राज्य पुनर्रचना आयोग आणि कायदा या बाबतीत खालील विधाने विचारात घ्या :

अ. आयोगाची नियुक्ती डिसेंबर 1953 मध्ये केली होती.

ब. आयोगाच्या प्रमुखपदी फझल अली हे होते आणि आयोगाचे अन्य दोन सदस्य एच्.व्ही.कामथ आणि गोविंद वल्लभ पंत हे होते.

क. आयोगाने आपला अहवाल 30 सप्टेंबर, 1954 रोजी सादर केला.

ड. राज्य पुनर्रचना अधिनियम 31 ऑगस्ट, 1956 रोजी मंजूर झाला.

ई. राज्य पुनर्रचना अधिनियम 1 जानेवारी, 1957 रोजी अमलात आला.

वरीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ, ब आणि क (2) ब, क आणि ड (3) ब, ड आणि ई (4) अ आणि ड फक्त

Consider the following statements about the States Reorganisation Commission and Act ?

a. The commission was appointed in December, 1953.

b. The commission was headed by Fazal Ali and two members of the commission were H.V. Kamath and Govind Ballabh Pant.

c. The commission submitted its report on September 30, 1954.

d. The States Re-organisation Act was enacted on August 31, 1956.

e. The States Re-organisation Act came into effect on January 1, 1957.

Which of the statements given above are correct ?

**Answer Options :**

(1) a, b and c (2) b, c and d (3) b, d and e (4) a and d only

2018

70. योग्य क्रमानुसार लावा (राज्यांची निर्मिती) :

अ. मिझोरम   ब. नागालॅण्ड

क. मेघालय   ड. महाराष्ट्र

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ, ड, ब, क   (2) ड, ब, क, अ

(3) क, ड, ब, अ   (4) ड, ब, अ, क

Arrange in appropriate order (formation of the States) :

a. Mizoram   b. Nagaland

c. Meghalaya   d. Maharashtra

**Answer Options :**

(1) a, d, b, c   (2) d, b, c, a

(3) c, d, b, a   (4) d, b, a, c

2014

81. खाली नमूद केलेली राज्ये निर्माण केल्याचा किंवा पूर्ण राज्याचा दर्जा दिल्याचा योग्य कालानुक्रम काय आहे ?

(a) नागालँड   (b) आंध्र प्रदेश   (c) हरियाणा   (d) महाराष्ट्र

योग्य पर्याय निवडा :

(1) (a), (b), (c) आणि (d)   (2) (a), (b), (d) आणि (c)

(3) (b), (a), (d) आणि (c)   (4) (b), (d), (a) आणि (c)

What is the correct chronological order in which the following states of the India were created or granted full statehood ?

(a) Nagaland   (b) Andhra Pradesh   (c) Haryana   (d) Maharas

Select the correct answer using the codes given below :

(1) (a), (b), (c) and (d)   (2) (a), (b), (d) and (c)

(3) (b), (a), (d) and (c)   (4) (b), (d), (a) and (c)

2024

W10 34 A

77. भारतातील घटनादुरुस्ती संदर्भात खालील विधान/विधानांची सत्यता तपासा आणि **योग्य** पर्याय निवडा :

(A) 10 व्या घटनादुरुस्तीनुसार दादरा व नगर हवेली हे प्रदेश भारतास जोडण्यात आले.

(B) 11 व्या घटनादुरुस्तीनुसार दीव, दमण व गोवा हे प्रदेश भारतास जोडण्यात आले.

(C) 15 व्या घटनादुरुस्तीनुसार केंद्रशासित प्रदेशांमध्ये विधीमंडळाची स्थापना करण्यात आली.

(D) 22 व्या घटनादुरुस्तीनुसार मेघालय या राज्याची निर्मिती करण्यात आली.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (A) आणि (C) बरोबर (2) (B) आणि (D) बरोबर

(3) (B) आणि (C) बरोबर (4) (A) आणि (D) बरोबर

Consider the following statement/s regarding constitutional amendment/s in India and Choose the **correct** option/s.

(A) Dadra and Nagar Haveli territories were included in India as per the 10th Amendment.

(B) The territories of Diu, Daman and Goa were included in India as per the 11th Amendment.

(C) Legislature was established in Union Territories as per the 15th Amendment.

(D) The state of Meghalaya was created as per the 22nd Amendment.

**Answer options :**

(1) (A) and (C) correct (2) (B) and (D) correct

(3) (B) and (C) correct (4) (A) and (D) correct

CHAPTER

07

# नागरिकत्व

## नागरिकत्व CITIZENSHIP भाग II – कलम ५ ते ११ Part II – Articles 5 to 11

- कलम ५-११ ची व्याप्ती (Scope of Articles 5–11)
- संविधान लागू झाल्याच्या वेळी कोण भारताचे नागरिक बनले हे ओळखणे:
  - → २६ जानेवारी १९५० रोजी.
- या कलमांमध्ये कायमस्वरूपी किंवा सविस्तर तरतुदींचा समावेश नाही.
- संविधान लागू झाल्यानंतर नागरिकत्व मिळवणे (Acquisition) किंवा गमावणे (Loss) या प्रकरणांशी ही कलमे संबंधित नाहीत.
- नागरिकत्वाच्या बाबींवर कायदे करण्याचा अधिकार संसदेला देतात:
  - हाच 'नागरिकत्व कायदा, १९५५' चा आधार आहे.

| कलमे (Articles) | वर्णन (Description) |
|---|---|
| कलम ५ (Article 5) | संविधानाच्या प्रारंभीचे अधिवासाद्वारे नागरिकत्व. |
| कलम ६ (Article 6) | पाकिस्तानातून भारतात आलेल्या स्थलांतरितांचे नागरिकत्व. |
| कलम ७ (Article 7) | पाकिस्तानात गेलेले पण पुन्हा भारतात परतलेल्या स्थलांतरितांचे नागरिकत्व. |
| कलम ८ (Article 8) | परदेशात राहणारे भारतीय (नोंदणीद्वारे नागरिकत्व). |
| कलम ९ (Article 9) | दुहेरी नागरिकत्व नाही (परदेशी नागरिकत्व स्वीकारल्यास भारतीय नागरिकत्व रद्द होइल). |
| कलम १० (Article 10) | नागरिकत्वाच्या हक्कांचे सातत्य. |
| कलम ११ (Article 11) | नागरिकत्वाचे नियमन करण्याचा संसदेचा अधिकार. |

- नागरिकत्व कायदा, १९५५ (CITIZENSHIP ACT, 1955)
- (संविधानाच्या कलम ११ अंतर्गत अधिनियमित)

### Acquisition of Citizenship




**१. जन्माने (By Birth)**

- २६ जानेवारी १९५० रोजी किंवा त्यानंतर पण १ जुलै १९८७ पूर्वी भारतात जन्मलेली व्यक्ती → जन्माने नागरिक.
- १ जुलै १९८७ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेली व्यक्ती → केवळ तेव्हाच नागरिक जेव्हा जन्माच्या वेळी आइ किंवा वडिलांपैकी एक भारतीय नागरिक असेल.
- ३ डिसेंबर २००४ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेली व्यक्ती

### Loss of Citizenship




**१. त्याग केल्याने (By Renunciation)**

- पूर्ण वय आणि क्षमता असलेला कोणताही भारतीय नागरिक घोषणापत्राद्वारे आपल्या नागरिकत्वाचा त्याग करू शकतो.
- जर अशी घोषणा युद्धाच्या काळात केली गेली असेल, तर केंद्र सरकार अशा घोषणापत्राची नोंदणी रोखून धरू शकते.
- नागरिकत्वाचा त्याग केल्यावर:
  - संबंधित व्यक्तीच्या अल्पवयीन मुलाचे नागरिकत्व

→ केवळ तेव्हाच नागरिक जेव्हा दोन्ही पालक भारतीय नागरिक असतील.

- पात्र नाहीत: परदेशी राजनैतिक अधिकारी (Diplomats) आणि शत्रू परकीय (Enemy aliens) यांची मुले.

**२. वंशाने (By Descent)**

- भारताबाहेर जन्म झाल्यास:
  - २६ जानेवारी १९५० - १० डिसेंबर १९९२ → जन्माच्या वेळी वडील भारतीय नागरिक असल्यास नागरिकत्व मिळते.
  - ३ डिसेंबर २००४ पासून पुढे → जोपर्यंत जन्माची नोंदणी (Registration) केली जात नाही, तोपर्यंत वंशाने नागरिकत्व मिळत नाही.

**३. नोंदणीद्वारे (By Registration)**

- (अर्जदार बेकायदेशीर स्थलांतरित नसावा) पात्र श्रेणींमध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो:
- भारतात साधारणपणे ७ वर्षे वास्तव्य असलेला व्यक्ती.
- भारतीय नागरिकाशी विवाह केलेला व्यक्ती आणि भारतात ७ वर्षे वास्तव्य असलेला व्यक्ती.
- OCI कार्डधारक:
  - ५ वर्षांपासून OCI म्हणून नोंदणीकृत असावा, आणि
  - अर्ज करण्यापूर्वी १२ महिने भारतात साधारणपणे रहिवासी असावा.

**स्वीकृतीद्वारे / नैसर्गिककरणाद्वारे (By Naturalisation)**

- (अर्जदार बेकायदेशीर स्थलांतरित नसावा) अटींमध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो:
- अशा देशाचा नागरिक नसावा जिथे भारतीयांना नागरिक होण्यापासून रोखले जाते.
- नागरिकत्व स्वीकारल्यावर आधीचे नागरिकत्व सोडण्याचे वचन देतो.
- विहित कालावधीसाठी भारतात वास्तव्य केले आहे किंवा भारत सरकारची सेवा केली आहे.
- चारित्र्य चांगले असावे.
- आठव्या परिशिष्टातील (Eighth Schedule) भाषेचे पुरेसे ज्ञान असावे.

**५. प्रदेशाच्या विलीनीकरणामुळे** जेव्हा एखादा परकीय प्रदेश भारताचा भाग बनतो.

- उदाहरण: पाँडिचेरी (पुडुचेरी).

**६. विशेष तरतुदी – आसाम करार (Assam Accord)**

- १ जानेवारी १९६६ पूर्वी बांगलादेशातून आसाममध्ये आलेले आणि तिथे साधारणपणे रहिवासी असलेले भारतीय वंशाचे लोक → मानलेले नागरिक (Deemed citizens).
- जे १ जानेवारी १९६६ रोजी किंवा त्यानंतर पण २५ मार्च १९७१ पूर्वी आले आहेत:
  - आसाममध्ये साधारणपणे रहिवासी आहेत, आणि
  - परदेशी म्हणून ओळख पटली आहे → त्यांनी स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे.
  - देखील रद्द होते.
  - मात्र, ते मूल १८ वर्षे पूर्ण झाल्यावर पुन्हा नागरिकत्व मिळवू शकते.

**२. संपुष्टात आल्याने (By Termination)**

- जेव्हा एखादा भारतीय नागरिक स्वेच्छेने दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वीकारतो.
- तेव्हा त्याचे भारतीय नागरिकत्व आपोआप संपुष्टात येते.
- ही तरतूद युद्धाच्या काळात लागू होत नाही.

**३. काढून घेतल्याने/वंचित केल्याने (By Deprivation)**

- (केंद्र सरकारद्वारे सक्तीने नागरिकत्व रद्द केले जाते) जर:
- नागरिकत्व फसवणुकीने मिळवले असेल.
- नागरिकाने भारतीय संविधानाशी द्रोह/अनादर दाखवला असेल.
- युद्धाच्या काळात शत्रूशी बेकायदेशीरपणे व्यापार किंवा संपर्क केला असेल.
- नोंदणी किंवा स्वीकृतीद्वारे नागरिकत्व मिळाल्यानंतर ५ वर्षांच्या आत, कोणत्याही देशात २ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली असेल.
- संबंधित व्यक्ती सलग ७ वर्षे भारताबाहेर राहणारी (साधारणपणे रहिवासी) असेल.

**भारताचे परदेशस्थ नागरिकत्व (Overseas Citizenship of India - OCI)**

- सप्टेंबर २०००: भारतीय डायस्पोरा (Indian Diaspora) वर उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली.
  - → अध्यक्ष: एल. एम. सिंघवी.
- ठराविक देशांतील भारतीय वंशाच्या व्यक्तींना (PIOs) दुहेरी नागरिकत्व देण्याची शिफारस केली.
- नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा, २००५:
  - अटींच्या अधीन राहून, पाकिस्तान आणि बांगलादेश वगळता सर्व देशांतील PIOs साठी OCI चा विस्तार केला.
- OCI हे दुहेरी नागरिकत्व नाही:
  - → भारतीय संविधान दुहेरी नागरिकत्वास मनाइ करते (कलम ९).
- OCI कार्ड योजना सुरू झाली: २ डिसेंबर २००५.
- नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा, २०१५:
  - "ओव्हरसीज सिटीझन ऑफ इंडिया" (Overseas Citizen of India) या संज्ञेएवजी "ओव्हरसीज सिटीझन ऑफ इंडिया कार्डधारक" (OCIC) अशी संज्ञा बदलण्यात आली

**नागरिकत्व कायदा, १९५५ मधील दुरुस्त्या (Amendments to Citizenship Act, 1955):**

**या कायद्यात आतापर्यंत सहा वेळा दुरुस्ती करण्यात आली आहे: १९८६, १९९२, २००३, २००५, २०१५, २०१९**

**2014**

Goa, Sikkim

Born abroad but of Indian blood – still Indian by descent.

82. नागरिकत्व कायदा 1955 अंतर्गत, खालीलपैकी कोणत्या पर्यायाद्वारे एखादी व्यक्ती भारताचा नागरिक बनू शकते ?

(a) भूमी अधिग्रहीत झाल्यामुळे (b) वारसा हक्काने (c) जन्म भारतात झाल्याने → of cause.

(d) राष्ट्रीयीकरणाद्वारे (e) नोंदणी द्वारे → By choice, By application.

Naturalisation

खालीलपैकी योग्य पर्याय निवडा :

Nationalisation industries शी related.

(1) (b), (c), (d) आणि (e) (2) (a), (b), (c) आणि (d)

(3) (a), (c), (d) आणि (e) (4) (a), (b), (c) आणि (e)

Under the Citizenship Act 1955, by which of the following ways can a person become a citizen of India ?

(a) By incorporation of territory (b) By descent (c) By birth

(d) By nationalisation (e) By registration

Select the correct answer using the codes given below :

(1) (b), (c), (d) and (e) (2) (a), (b), (c) and (d)

(3) (a), (c), (d) and (e) (4) (a), (b), (c) and (e)

**2018**

69. योग्य कथन/कथने ओळखा :

अ. नागरिक राज्यामध्ये सर्व नागरी अधिकारांचा उपभोग घेतात.

ब. नागरिक राज्यामध्ये सर्व राजकीय अधिकारांचा उपभोग घेतात.

क. परकीय व्यक्ती राज्यामध्ये सर्व नागरी अधिकारांचा उपभोग घेतात. → उदा. Art(21) = Right to life → Tourist. → British student in India

ड. परकीय व्यक्ती राज्यामध्ये सर्व राजकीय अधिकारांचा उपभोग घेतात. → Cannot vote, contest elections.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त अ, ब आणि क (2) फक्त अ, ब आणि ड

(3) फक्त अ आणि ब (4) फक्त अ, क आणि ड

Select the correct statement/s.

a. A citizen enjoys all the civil rights in the State.

b. A citizen enjoys all the political rights in the State.

c. An alien enjoys all the civil rights in the State.

d. An alien enjoys all the political rights in the State.

**Answer Options :**

(1) Only a, b and c (2) Only a, b and d

(3) Only a and b (4) Only a, c and d

**2024**

79. भारताच्या नागरिकत्वाविषयी खालीलपैकी योग्य विधान/विधाने कोणती ?

(A) भारतामध्ये एकल नागरिकत्व पद्धती आहे.

(B) नागरिकत्व कायदा 1955 साली संमत करण्यात आला.

(C) भारतीय राज्यघटनेच्या भाग 4 मध्ये नागरिकत्वाची तरतूद आहे. → भाग (2) Art (5 to 11)
भाग (4) = DPSP's.

पर्यायी उत्तरे :

(1) फक्त (A) आणि (C) बरोबर (2) फक्त (A) बरोबर

(3) फक्त (A) आणि (B) बरोबर (4) वरील सर्व बरोबर आहेत

Which of the following statement/s is/are **correct** regarding the citizenship of India ?

(A) India has single citizenship system.

(B) Citizenship Act was passed in 1955.

(C) Part 4 of the Indian Constitution provides citizenship.

Answer options :

(1) Only (A) & (C) Correct (2) Only (A) Correct

(3) Only (A) & (B) Correct (4) All of the above are correct

2023

**72.** व्यक्तिचे भारतीय नागरिकत्व संपुष्टात येते जर

अ. व्यक्तिने स्वेच्छेने अन्य देशाचे नागरिकत्व स्विकारले तर.

ब. व्यक्तिस नोंदणीद्वारे नागरिकत्व मिळाल्यावर पांच वर्षांच्या कालावधीत त्यास 18 महिन्यांचा कारावास झाला असेल तर.

क. फसवणूक/गैरप्रकार करून नागरिकत्व मिळवलेले आहे असे भारत सरकारचे समाधान झाले तर.

ड. व्यक्तिने भारतीय राज्यघटनेशी अनिष्ठा दाखविली असेल तर.

(1) अ, ब आणि क
(2) अ, क आणि ड
(3) ब आणि क
(4) अ, ब, क आणि ड

Indian citizenship of a person can be terminated if

A. A person voluntary acquire the citizenship of some other country.

B. A person who has become a citizen through registration is sentenced to imprisonment for 18 months within five years of his registration.

C. The government of India is satisfied that citizenship was obtained by fraud.

D. A person has shown disloyalty to the Constitution of India.

(1) A, B and C
(2) A, C and D
(3) B and C
(4) A, B, C and D

CHAPTER

08

# मूलभूत हक्क

## मूलभूत हक्क FUNDAMENTAL RIGHTS







| हक्क (Right) | वर्णन आणि संबंधित कलमे (Description & Articles) |
|---|---|
| समानतेचा हक्क (Articles 14–18) | ❍ Equality before law (14)<br>❍ No discrimination (15)<br>❍ Equal opportunity in public jobs (16)<br>❍ Abolition of untouchability (17)<br>❍ Abolition of titles (18) |
| स्वातंत्र्याचा हक्क (Articles 19–22) | ❍ ६ स्वातंत्र्य: भाषण, सभा, संस्था, संचार, वास्तव्य, व्यवसाय (१९)<br>❍ गुन्ह्यांच्या दोषासिद्धीबाबत संरक्षण (२०)<br>❍ जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्य (२१)<br>❍ मोफत आणि सक्तीचे शिक्षण (२१A)<br>❍ अटक आणि स्थानबद्धतेविरुद्ध संरक्षण (२२) |
| शोषणाविरुद्ध हक्क (Articles 23–24) | ❍ मानवी व्यापार आणि वेठबिगारीवर बंदी (२३)<br>❍ कारखाने/खाणींमध्ये बालमजुरीवर बंदी (२४) |
| धर्मस्वातंत्र्याचा हक्क (Articles 25–28) | ❍ विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य, धर्माचे पालन, आचरण आणि प्रसार (२५)<br>❍ धार्मिक व्यवहारांचे व्यवस्थापन (२६)<br>❍ धार्मिक कर न भरणे (२७)<br>❍ सरकारी संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण न देणे (२८) |
| सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क (Articles 29–30) | ❍ भाषा, लिपी आणि संस्कृतीचे संरक्षण (२९)<br>❍ अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा अधिकार (३०) |

| | |
|---|---|
| घटनात्मक उपाययोजनेचा हक्क (Article 32) | ❍ मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालयात जाणे<br>❍ प्रादेशलेख (Writs): बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, प्रतिषेध, उत्प्रेषण, अधिकार पृच्छा |

## ■ मूलभूत हक्कांची प्रमुख वैशिष्ट्ये: Key Features of Fundamental Rights:

| | |
|---|---|
| कोणाला उपलब्ध आहेत? | ❍ काही केवळ नागरिकांसाठी → कलमे १५, १६, १९, २९, ३०<br>❍ इतर सर्व व्यक्तींसाठी (नागरिक + परकीय नागरिक + कायदेशीर संस्था) |
| कोणाविरुद्ध उपलब्ध आहेत? | ❍ प्रामुख्याने राज्याविरुद्ध (State) लागू केले जातात<br>❍ काही खाजगी व्यक्तींविरुद्धही उपलब्ध आहेत (कलमे १५, १७, २३) |
| अबाधित नाहीत | ❍ वाजवी निर्बंधांच्या अधीन आहेत (विशेषतः कलम १९) |
| नकारात्मक स्वरूप | ❍ राज्याच्या अधिकारांवर मर्यादा आणतात |
| न्यायप्रविष्ट (Justicia-ble) | ❍ न्यायालयात दाद मागता येते<br>❍ कलम ३२ = मूलभूत हक्कांचा 'हृदय आणि आत्मा' |
| पवित्र किंवा कायमस्वरूपी नाहीत | ❍ त्यात दुरुस्ती किंवा कपात केली जाऊ शकते<br>❍ केवळ घटनादुरुस्तीद्वारे, सामान्य कायद्याद्वारे नाही<br>❍ 'मूलभूत संरचने'चे (Basic Structure) उल्लंघन होऊ नये |
| राष्ट्रीय आणीबाणी दरम्यान | ❍ कलमे २० आणि २१ वगळता सर्व मूलभूत हक्क स्थगित केले जाऊ शकतात<br>❍ कलम १९ केवळ युद्ध किंवा परकीय आक्रमणादरम्यान स्थगित केले जाते |
| लष्करी कायदा (Martial Law) | ❍ मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीवर निर्बंध घातले जाऊ शकतात |

| | |
|---|---|
| कलम १२ (ARTICLE 12) राज्याची व्याख्या<br><br>(राज्य म्हणजे कोण?) | ❍ भाग ३ (मूलभूत हक्क) साठी "राज्य" शब्दाची व्याख्या करते.<br>❍ यात खालील घटकांचा समावेश होतो:<br>■ केंद्र आणि राज्य सरकारे<br>■ संसद आणि राज्य विधिमंडळे<br>■ सर्व स्थानिक प्राधिकरणे (नगरपालिका, पंचायती, मंडळे, ट्रस्ट)<br>■ इतर सर्व प्राधिकरणे – वैधानिक / गैर-वैधानिक (LIC, ONGC, SAIL इत्यादी)<br>❍ व्यापक अर्थ  राज्याचे साधन म्हणून काम करणाऱ्या खाजगी संस्थांचा देखील यात समावेश होतो. |
| कलम १३ (ARTICLE 13) मूलभूत हक्कांशी विसंगत असलेले कायदे<br><br>(राज्याने मूलभूत हक्कांचे उल्लंघन केल्यास काय होते?) | ❍ मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे सर्व कायदे शून्य (VOID) ठरतात.<br>❍ न्यायालयीन पुनर्विलोकनासाठी (Judicial Review) आधार प्रदान करते.<br>❍ "कायदा" (Law) मध्ये खालील बाबींचा समावेश होतो:<br>■ संसद आणि राज्य विधिमंडळांचे कायदे<br>■ वटहुकूम (Ordinances)<br>■ प्रत्यायोजित विधान (Delegated legislation) → नियम, विनियम, उपविधी, आदेश, अधिसूचना |
| | ❍ केशवानंद भारती खटला (१९७३): जर घटनादुरुस्ती 'मूलभूत संरचनेचा' (Basic Structure) भाग असलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करत असेल, तर ती रद्द केली जाऊ शकते. |

## ■ समतेचा अधिकार (कलम१४-१८) RIGHT TO EQUALITY (Articles 14–18)

<table>
<tr><td>समतेचा अधिकार (कलम१४-१८)</td><td>
<ul>
<li>लागू: सर्व व्यक्तींना उपलब्ध → नागरिक, परकीय व्यक्ती आणि कायदेशीर व्यक्ती (Legal persons).</li>
<li>तत्व: राज्य संस्था कोणालाही समानता नाकारू शकत नाही.</li>
</ul>
कलम १४ अंतर्गत दोन संकल्पना:<br>
१. कायद्यासमोर समानता (Equality before Law)
<ul>
<li>उगम: ब्रिटीश (नकारात्मक संकल्पना → अप्रत्यक्ष करासारखी).</li>
<li>स्त्रोत: ए.व्ही. डायसी यांनी मांडलेल्या 'कायद्याचे राज्य' (Rule of Law) या सिद्धांतावरून घेतलेली.</li>
<li>नकारात्मक का?: कारण ही संकल्पना राज्य संस्थेच्या अधिकारांवर निर्बंध आणते.</li>
<li>मुख्य घटक:
<ul>
<li>स्वेच्छाचारी (Arbitrary) अधिकारांचा अभाव.</li>
<li>विशेष अधिकारांचा (Special privileges) अभाव.</li>
<li>सर्व व्यक्ती सामान्य कायद्याला समान रीतीने अधीन असणे.</li>
<li>कोणतीही व्यक्ती कायद्यापेक्षा मोठी नाही.</li>
</ul></li>
<li>भारतीय विरुद्ध ब्रिटीश स्थिती:
<ul>
<li>ब्रिटन: अधिकार हे न्यायालयीन निर्णयांचा निकाल आहेत.</li>
<li>भारत: संविधान हा वैयक्तिक अधिकारांचा स्त्रोत आहे.</li>
</ul></li>
</ul>
२. कायद्याचे समान संरक्षण (Equal Protection of Laws)
<ul>
<li>उगम: अमेरिकन (सकारात्मक संकल्पना → प्रत्यक्ष करासारखी).</li>
<li>सकारात्मक का?: कारण यासाठी राज्य संस्थेच्या कृतीची (Action) आवश्यकता असते.</li>
<li>अर्थ:
<ul>
<li>याचा अर्थ सर्वांना सरसकट एकसमान वागणूक देणे असा होत नाही.</li>
<li>समान परिस्थितीत समान वागणूक देणे.</li>
<li>'समानांना समान' वागणूक दिली पाहिजे.</li>
<li>'असमानांना' वेगळी वागणूक दिली जाऊ शकते.</li>
</ul></li>
<li>परिणाम: ही संकल्पना 'वाजवी वर्गीकरणास' (Reasonable classification) परवानगी देते, ज्यामुळे कल्याणकारी कायदे, आरक्षण आणि विशेष कायदे करणे शक्य होते.</li>
<li>कलम १४ आणि स्वेच्छाचारिता (Arbitrariness):</li>
<li>स्वेच्छाचारिता = असमानता.</li>
<li>राज्य संस्थेची कोणतीही स्वेच्छाचारी कृती आपोआप कलम १४ चे उल्लंघन ठरते.</li>
<li>हे तत्व पुढे 'मनेका गांधी' सिद्धांतामध्ये अधिक विस्तारित करण्यात आले.</li>
</ul>
</td></tr>
<tr><td></td><td>
समानतेचे अपवाद (घटनात्मक आणि कायदेशीर अपवाद):
<ul>
<li>राष्ट्रपती आणि राज्यपाल:
<ul>
<li>अधिकृत कामांसाठी न्यायालयाला उत्तरदायी नाहीत.</li>
<li>कार्यकाळादरम्यान कोणतीही फौजदारी (Criminal) कार्यवाही करता येत नाही.</li>
<li>दिवाणी (Civil) कार्यवाहीसाठी २ महिन्यांची पूर्वसूचना आवश्यक असते.</li>
</ul></li>
<li>खासदार आणि आमदार:
<ul>
<li>संसदीय विशेषाधिकार.</li>
</ul></li>
<li>परदेशी मुत्सद्दी (Foreign Diplomats):
<ul>
<li>आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार राजनैतिक संरक्षण (Diplomatic immunity).</li>
</ul></li>
</ul>
</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | ❍ हे 'वाजवी अपवाद' आहेत, उल्लंघन नव्हे.<br>❍ कलम १४ विरुद्ध कलम ३१C:<br>❍ कलम ३१C अंतर्गत काही मार्गदर्शक तत्वांच्या (DPSPs) अंमलबजावणीसाठी बनवलेले कायदे.<br>❍ अशा कायद्यांना खालील आधारावर आव्हान दिले जाऊ शकत नाही:<br>■ कलम १४<br>■ कलम १९ (जेव्हा ३१C लागू होते तेव्हा).<br>❍ थोडक्यात: जिथे कलम ३१C येते, तिथे कलम १४ बाहेर जाते (त्या मर्यादेपर्यंत). |
| **कलम१५ भेदभावाला प्रतिबंध**<br><br>**(नागरिकांसाठी असलेला हक्क)** | **कोणावर बंधनकारक आहे?**<br>■ राज्य संस्था (The State)<br>■ खाजगी व्यक्ती (सार्वजनिक ठिकाणी)<br>**कलम १५(१): भेदभावासाठी प्रतिबंधित आधार**<br>❍ राज्य संस्था कोणत्याही नागरिकाविरुद्ध केवळ खालील आधारांवर भेदभाव करणार नाही:<br>■ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान.<br>**कलम १५(२): सार्वजनिक ठिकाणी प्रवेश**<br>❍ कोणत्याही नागरिकाला खालील ठिकाणी प्रवेश नाकारला जाणार नाही:<br>■ दुकाने, सार्वजनिक उपाहारगृहे, हॉटेल्स, विहिरी, तलाव, रस्ते, स्नानगृहे इत्यादी.<br>❍ हे बंधन राज्य संस्था + खाजगी व्यक्ती या दोघांवरही लागू आहे.<br>❍ हे वैशिष्ट्य कलम १५ ला लागू होण्याच्या बाबतीत 'क्षितिज समांतर' (Horizontal) बनवते (हे एक दुर्मिळ वैशिष्ट्य आहे).<br>**अपवाद (Exceptions)**<br>**कलम १५(३): महिला आणि बालके**<br>❍ राज्य संस्था यांच्यासाठी विशेष तरतुदी करू शकते.<br>❍ यामध्ये समाविष्ट: आरक्षण, संरक्षणात्मक कायदे आणि कल्याणकारी योजना.<br>**कलम १५(४): SC, ST आणि SEBC (सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग)**<br>❍ शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण.<br>❍ यामध्ये समाविष्ट: प्रवेश, शुल्क सवलत, वसतिगृहे आणि शिष्यवृत्ती.<br>**कलम १५(५): खाजगी शैक्षणिक संस्था**<br>❍ खालील ठिकाणी आरक्षणास परवानगी आहे:<br>■ खाजगी विनाअनुदानित (Private unaided) संस्था.<br>■ अपवाद: अल्पसंख्याक संस्था (कलम ३० अंतर्गत).<br>**कलम १५(६): आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS)**<br>❍ १०३ वी घटनादुरुस्ती कायदा, २०१९.<br>❍ १०% पर्यंत आरक्षण.<br>❍ लागू:<br>■ शिक्षण.<br>■ खाजगी विनाअनुदानित संस्था.<br>❍ यामध्ये SC/ST/OBC प्रवर्गाचा समावेश नाही. |

| कलम १६: सार्वजनिक रोजगारात संधीची समानता (Equality of Opportunity in Public Employment) | **कलम १६: सार्वजनिक रोजगारात संधीची समानता (Equality of Opportunity in Public Employment)**<br>○ नागरिक-विशिष्ट अधिकार: हा अधिकार केवळ भारताच्या नागरिकांना उपलब्ध आहे.<br>○ व्याप्ती: हे केवळ राज्य संस्थेच्या (State) नियंत्रणाखालील रोजगार किंवा नियुक्तीला लागू होते.<br>**कलम १६(१): मूलभूत तरतूद**<br>○ सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत सर्व नागरिकांना संधीची समानता असेल.<br>**कलम १६(२): भेदभावासाठी प्रतिबंधित आधार**<br>○ केवळ खालील आधारांवर कोणताही भेदभाव केला जाणार नाही:<br>■ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान, वंशपरंपरा (Descent), निवासस्थान (Residence).<br>○ विशेष टीप: कलम १५ च्या तुलनेत येथे 'वंशपरंपरा' आणि 'निवासस्थान' हे दोन अतिरिक्त आधार देण्यात आले आहेत.<br>**अपवाद (Exceptions)**<br>**कलम १६(३): निवासाची अट**<br>○ संसद विशिष्ट नोकऱ्यांसाठी 'निवासस्थान' ही अट विहित करू शकते.<br>○ लागू: राज्य, केंद्रशासित प्रदेश किंवा स्थानिक प्राधिकरणातील पदे.<br>**कलम १६(४): मागासवर्गीय आरक्षण**<br>○ ज्या वर्गांना सार्वजनिक सेवांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व (Adequate representation) नाही, त्यांच्यासाठी नियुक्ती किंवा पदांमध्ये आरक्षणाची तरतूद.<br>**कलम १६(४A): पदोन्नतीमध्ये आरक्षण**<br>○ अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) साठी पदोन्नतीमध्ये आरक्षण.<br>○ परिणामी ज्येष्ठतेसह (With consequential seniority).<br>**कलम १६(४B): 'कॅरी फॉरवर्ड' (Carry Forward) नियम**<br>○ मागील वर्षांच्या रिक्त जागा (Backlog vacancies) भरताना ५०% आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यास परवानगी.<br>**कलम १६(५): धार्मिक संस्थांमधील पदे**<br>○ धार्मिक किंवा सांप्रदायिक संस्थेशी संबंधित पदांसाठी विशिष्ट धर्माची किंवा संप्रदायाची अट अनिवार्य केली जाऊ शकते.<br>○ कलम १६(६): EWS आरक्षण<br>**१०३ वी घटनादुरुस्ती, २०१९.**<br>○ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% आरक्षण.<br>○ नागरी पदे आणि सेवांसाठी लागू.<br>○ संबंधित महत्त्वाचे खटले (Important Case Laws)<br>○ इंदिरा साहनी खटला (१९९२): एकूण आरक्षण ५०% पेक्षा जास्त नसावे असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.<br>○ एम. नागराज खटला: सर्वोच्च न्यायालयाने SC/ST प्रवर्गासाठी पदोन्नतीमध्ये आरक्षणास परवानगी दिली. |
|---|---|

| | |
|---|---|
| **कलम १७: अस्पृश्यता निवारण (Abolition of Untouchability)** | ❍ अस्पृश्यतेचे उच्चाटन: अस्पृश्यता कोणत्याही स्वरूपात पाळण्यास मनाइ करण्यात आली आहे.<br>❍ शिक्षापात्र गुन्हा: अस्पृश्यतेचे आचरण हा कायद्यानुसार एक शिक्षापात्र गुन्हा आहे.<br>❍ व्याख्या: 'अस्पृश्यता' या शब्दाची व्याख्या संविधानात दिलेली नाही (हे हेतुपुरस्सर करण्यात आले आहे).<br>❍ कोणाविरुद्ध लागू:<br>■ राज्य संस्था (The State)<br>■ खाजगी व्यक्ती (Private individuals)<br>❍ सर्वोच्च न्यायालयाचे मत:<br>■ केवळ सामाजिक बहिष्कार (Social boycott) म्हणजे अस्पृश्यता नव्हे, जोपर्यंत जातीवर आधारित बहिष्कार असल्याचे सिद्ध होत नाही.<br>❍ संबंधित कायदे (Legislation):<br>■ नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ (Protection of Civil Rights Act, 1955)<br>■ पूर्वीचे नाव: अस्पृश्यता (गुन्हे) कायदा, १९५५ [Untouchability (Offences) Act, 1955]. |
| **कलम १८: पदव्यांची समाप्ती (Abolition of Titles)** | **कलम १८(१): राज्य आणि पदव्या**<br>❍ राज्य संस्था कोणत्याही पदव्या प्रदान करणार नाही.<br>❍ अपवाद:<br>■ लष्करी बहुमान (उदा. परमवीर चक्र)<br>■ शैक्षणिक बहुमान (उदा. डॉक्टर, प्रोफेसर)<br>❍ महत्त्वाची टीप: भारतरत्न आणि पद्म पुरस्कार (पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री) या 'पदव्या' नाहीत, त्यामुळे नावामागे किंवा नावापुढे त्यांचा वापर करता येत नाही.<br>**कलम १८(२): भारतीय नागरिक**<br>❍ कोणताही भारतीय नागरिक परकीय देशाकडून कोणतीही पदवी स्वीकारणार नाही.<br>**कलम १८(३): राज्य सेवेतील परकीय व्यक्ती**<br>❍ राज्य संस्थेच्या नियंत्रणाखाली लाभाचे किंवा विश्वासाचे पद धारण करणारी परकीय व्यक्ती:<br>■ राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय परकीय देशाकडून कोणतीही पदवी स्वीकारू शकत नाही.<br>**कलम १८(४): परकीय मानधन किंवा भेटी**<br>❍ राज्य संस्थेच्या अंतर्गत पद धारण करणारी कोणतीही व्यक्ती (नागरिक किंवा परकीय):<br>■ परकीय देशाकडून कोणतीही भेट, मानधन किंवा पद स्वीकारणार नाही.<br>■ राष्ट्रपतींची संमती अनिवार्य आहे.<br>**महत्त्वाचा खटला: बालाजी राघवन खटला (१९९५)**<br>❍ सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय पुरस्कारांची (भारतरत्न आणि पद्म पुरस्कार) घटनात्मक वैधता कायम ठेवली. |

## ■ स्वातंत्र्याचा अधिकार (RIGHT TO FREEDOM) (कलम १९ ते २२)

| | |
|---|---|
| **कलम १९: सहा स्वातंत्र्ये (Six Freedoms)** | ❍ कोणास उपलब्ध: केवळ भारतीय नागरिकांना (परकीय व्यक्ती किंवा कायदेशीर व्यक्तींना हा अधिकार नाही).<br>**१. भाषणाचे आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य (Freedom of speech & expression)**<br>❍ आपले विचार, मते आणि श्रद्धा व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य.<br>**२. शांततापूर्वक व विनाशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य (Freedom to assemble peacefully & without arms)**<br>❍ सभा किंवा मिरवणूक शांततापूर्ण असणे अनिवार्य आहे. |

| | |
|---|---|
| | **३. संस्था, संघटना किंवा सहकारी संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य (Freedom to form associations / unions / co-operative societies)**<br>❍ नकारात्मक अधिकार (Negative right): यामध्ये संप (Strike) करण्याचा किंवा सामूहिक सौदेबाजीचा (Collective bargaining) कोणताही हमी दिलेला अधिकार समाविष्ट नाही.<br>**४. भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य (Freedom of movement throughout India)**<br>**५. भारताच्या कोणत्याही भागात राहण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य (Freedom to reside & settle in any part of India)**<br>❍ अपवाद: अनुसूचित क्षेत्रे (Scheduled Areas), अनुसूचित जमातींचे (ST) संरक्षण आणि वेश्याव्यवसाय (सार्वजनिक नैतिकतेसाठी निर्बंध).<br>**६. कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा करण्याचे स्वातंत्र्य (Freedom to practise any profession / trade / occupation)**<br>**विशेष टीप:**<br>❍ मालमत्तेचा अधिकार: १९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे मालमत्तेचा अधिकार कलम १९ मधून काढून टाकण्यात आला आहे.<br>**वाजवी निर्बंध (Reasonable Restrictions)**<br>❍ राज्य संस्था या स्वातंत्र्यांवर 'वाजवी निर्बंध' लादू शकते.<br>❍ उदाहरण: फौजदारी प्रक्रिया संहितेचे (CrPC) कलम १४४ (अडथळा, जीविताला धोका, आरोग्य किंवा सुरक्षितता राखण्यासाठी). |
| **कलम २०: अपराधांबद्दलच्या दोषासिद्धीबाबत संरक्षण (Protection in Respect of Conviction for Offences)** | ❍ कोणास उपलब्ध: नागरिक + परकीय व्यक्ती + कायदेशीर व्यक्ती (कंपन्या किंवा कॉर्पोरेशन्स).<br>❍ यामध्ये खालील तीन प्रकारची संरक्षणे दिली आहेत:<br>**(अ) कार्योत्तर फौजदारी कायदा नाही (No Ex-Post-Facto Criminal Law)**<br>❍ कोणताही कायदा लागू होण्यापूर्वी केलेल्या कृतीसाठी त्या व्यक्तीला दोषी ठरवता येणार नाही (केवळ कायदा अस्तित्वात असताना केलेल्या उल्लंघनासाठीच शिक्षा होइल).<br>❍ गुन्हा केला त्या वेळी कायद्यात विहित केलेल्या शिक्षेपेक्षा जास्त शिक्षा दिली जाऊ शकत नाही.<br>❍ मर्यादा: हे केवळ फौजदारी (Criminal) कायद्यांना लागू आहे; नागरी (Civil) किंवा कर (Tax) कायद्यांना हे लागू नाही.<br>**(ब) दुहेरी दंड नाही (No Double Jeopardy)**<br>❍ कोणत्याही व्यक्तीवर एकाच अपराधासाठी एकापेक्षा जास्त वेळा खटला चालवला जाणार नाही आणि त्याला शिक्षा दिली जाणार नाही.<br>❍ मर्यादा: हे संरक्षण केवळ न्यायालय किंवा न्यायिक न्यायाधिकरणासमोर (Judicial tribunal) उपलब्ध आहे. विभागीय किंवा प्रशासकीय चौकशीला (Administrative proceedings) हे लागू होत नाही.<br>**(क) स्वतःविरुद्ध साक्ष देण्यास मनाइ (No Self-Incrimination)**<br>❍ कोणत्याही आरोपीला स्वतःविरुद्ध साक्ष देण्यासाठी सक्ती केली जाणार नाही.<br>❍ संरक्षणाची व्याप्ती: मौखिक पुरावे (Oral evidence) आणि दस्तएवजी पुरावे (Documentary evidence).<br>❍ खालील गोष्टींना हे संरक्षण लागू नाही:<br>■ वस्तूंचा सक्तीने पुरवठा करणे (Material objects), अंगठ्याचा ठसा, स्वाक्षरीचा नमुना, रक्ताचे नमुने आणि शरीराचे सक्तीने प्रदर्शन करणे.<br>**व्याप्ती आणि मर्यादा (Scope Limitations):**<br>❍ हे अधिकार केवळ फौजदारी (Criminal) कार्यवाहीसाठी लागू आहेत.<br>❍ नागरी (Civil) कार्यवाहीमध्ये हे संरक्षण उपलब्ध नाही. |

<table>
<tr>
<td>कलम २१: जीवित व वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण (Protection of Life & Personal Liberty)</td>
<td>
❍ तत्व: कायद्याने प्रस्थापित केलेली प्रक्रिया (Procedure established by law) अवलंबल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला त्याचे जीवित किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य यांपासून वंचित केले जाणार नाही.<br>
❍ कोणास उपलब्ध: नागरिक + परकीय व्यक्ती.<br>
■ न्यायालयीन अर्थांतर (Judicial Interpretation)<br>
१. ए. के. गोपालन खटला (१९५०) – संकुचित दृष्टिकोन (Narrow View)<br>
❍ संरक्षण केवळ स्वेच्छाचारी कार्यकारी कृतीविरुद्ध (Arbitrary executive action) उपलब्ध आहे.<br>
❍ स्वेच्छाचारी कायदेमंडळ कृतीला (Arbitrary legislative action) हे लागू नाही.<br>
❍ "कायद्याने प्रस्थापित केलेली प्रक्रिया" = विधीमंडळाने संमत केलेला कोणताही कायदा.<br>
२. मनेका गांधी खटला (१९७८) – व्यापक दृष्टिकोन (Wider View)<br>
❍ कायद्याची प्रक्रिया न्याय्य, रास्त आणि वाजवी (Fair, just, and reasonable) असणे अनिवार्य आहे.<br>
❍ या खटल्याने भारतात 'कायद्याची योग्य प्रक्रिया' (Substantive due process) ही संकल्पना रूढ केली.<br>
❍ "कायद्याने प्रस्थापित केलेली प्रक्रिया" ≈ कायद्याची योग्य प्रक्रिया (Due Process of Law).<br>
❍ कलम १४, १९ आणि २१ यांना एकमेकांशी जोडले (याला 'सुवर्ण त्रिकोण' - Golden Triangle असे म्हटले जाते).<br>
'जीवनाचा अधिकार' याचा अर्थ:<br>
❍ केवळ प्राण्याप्रमाणे जगणे (Animal existence) नव्हे.<br>
❍ यामध्ये मानवी प्रतिष्ठेसह (Human dignity) जगण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.<br>
❍ कायद्याची योग्य प्रक्रिया (Due Process of Law) [अमेरिका (न्यायालयीन सर्वोच्चता)] = कायद्याने प्रस्थापित केलेली प्रक्रिया [ब्रिटन (संसद सार्वभौम आणि श्रेष्ठ आहे)] + प्रक्रिया न्याय्य आणि रास्त (Fair & Just) असणे.
</td>
</tr>
<tr>
<td>कलम २१A: शिक्षणाचा अधिकार (Right to Education)</td>
<td>
❍ समावेश: ८६ व्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे (२००२) संविधानात समाविष्ट करण्यात आले.<br>
❍ तरतूद: मोफत आणि सक्तीचे शिक्षण प्रदान करते.<br>
❍ वयोगट: ६ ते १४ वर्षे.<br>
❍ व्याप्ती: हे केवळ प्राथमिक शिक्षणासाठी (Elementary education) लागू आहे.<br>
  ■ उच्च किंवा व्यावसायिक शिक्षणासाठी (Higher / professional education) लागू नाही.<br>
■ संबंधित तरतुदी (Related Provisions)<br>
शिक्षणाशी संबंधित भारतीय संविधानात त्रिसूत्री आहे:<br>
❍ कलम २१A: मूलभूत अधिकार (Fundamental Right).<br>
❍ कलम ४५: राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे (DPSP) - (बालपणीची देखभाल आणि ६ वर्षांखालील मुलांचे शिक्षण).<br>
❍ कलम ५१A(k): मूलभूत कर्तव्य (Fundamental Duty) - (आपल्या पाल्याला शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हे पालक/पालकांचे कर्तव्य आहे).
</td>
</tr>
<tr>
<td>कलम २२: अटक व स्थानबद्धतेपासून संरक्षण (Protection Against Arrest and Detention)</td>
<td>
  ■ हे कलम दोन प्रकारच्या स्थानबद्धतेमध्ये संरक्षण प्रदान करते:<br>
  ■ १. शिक्षाविषयक स्थानबद्धता (Punitive Detention)<br>
  ■ २. प्रतिबंधात्मक स्थानबद्धता (Preventive Detention)<br>
  ■ प्रतिबंधात्मक स्थानबद्धता – कायदा करण्याचे अधिकार (Preventive Detention – Law Making Power)<br>
❍ समवर्ती अधिकार: संसद आणि राज्य विधिमंडळे या विषयावर समवर्ती (Concurrently) कायदे करू शकतात.<br>
❍ संसदेचे विशेष अधिकार: खालील विषयांच्या संदर्भात कायदे करण्याचा अधिकार केवळ संसदेला आहे:
</td>
</tr>
</table>

- संरक्षण (Defence)
- परराष्ट्र व्यवहार (Foreign affairs)
- भारताची सुरक्षा (Security of India)
- महत्त्वाचे कायदे (Examples of Preventive Detention Laws):

- MISA (१९७१): अंतर्गत सुरक्षा व्यवस्था कायदा (आता रद्द).
- COFEPOSA (१९७४): परकीय चलन संवर्धन आणि तस्करी प्रतिबंधक कायदा.
- NSA (१९८०): राष्ट्रीय सुरक्षा कायदा (रासुका).
- TADA (१९८५): दहशतवादी आणि विघातक कृत्य प्रतिबंधक कायदा (रद्द).
- POTA (२००२): दहशतवाद प्रतिबंधक कायदा (रद्द).
- UAPA (१९६७): बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायदा (सध्या सुरू असलेला).

### 1. शिक्षाविषयक स्थानबद्धता (Punitive Detention)

- केव्हा: गुन्हा केल्यानंतर केली जाणारी कारवाइ.
- प्रक्रिया: न्यायालयात खटला चालवून दोषी ठरवल्यानंतर दिली जाणारी शिक्षा.
- उद्देश: शिक्षा देणे.

**सामान्य अटकेमध्ये (शिक्षाविषयक) मिळणारे अधिकार:**

- अटकेची कारणे जाणून घेण्याचा अधिकार.
- आपल्या पसंतीच्या वकिलाचा सल्ला घेण्याचा आणि स्वतःचा बचाव करण्याचा अधिकार.
- अटक केल्यापासून २४ तासांच्या आत दंडाधिकाऱ्यासमोर (Magistrate) हजर करण्याचा अधिकार.
  - (टीप: यामध्ये प्रवासाचा वेळ आणि सुट्ट्या वगळल्या जातात.)
- दंडाधिकाऱ्यांच्या अधिकाराशिवाय २४ तासांपेक्षा जास्त काळ कोठडीत ठेवता येणार नाही.

**हे अधिकार कोणास उपलब्ध नाहीत?**

- शत्रू परकीय (Enemy aliens) आणि प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेखाली असलेले व्यक्ती.

**अपवाद:**

- १. हे अधिकार केवळ फौजदारी किंवा निम-फौजदारी (Quasi-criminal) प्रकरणांत मिळतात.
- २. न्यायालयाचा आदेश, दिवाणी अटक (Civil arrest), आयकर न भरल्यामुळे झालेली अटक किंवा परकीयांचे हद्दपारीकरण (Deportation) यांमध्ये हे अधिकार लागू होत नाहीत.

### २. प्रतिबंधात्मक स्थानबद्धता (Preventive Detention)

- केव्हा: गुन्हा करण्यापूर्वीच (संशयावरून) केलेली कारवाइ.
- प्रक्रिया: कोणताही खटला न चालवता किंवा दोषसिद्धीशिवाय केलेली स्थानबद्धता.
- उद्देश: भविष्यातील धोका रोखणे.

**प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेअंतर्गत मिळणारी संरक्षणे:**

- सल्लागार मंडळाचे (Advisory Board) पुनरावलोकन:
  - जर स्थानबद्धता ३ महिन्यांपेक्षा जास्त असेल, तर सल्लागार मंडळाची मंजुरी आवश्यक असते.
  - या मंडळामध्ये उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचा समावेश असणे अनिवार्य आहे.
- स्थानबद्धतेची कारणे संबंधित व्यक्तीला (स्थानबद्ध व्यक्तीला) कळवणे आवश्यक आहे.
- स्थानबद्ध व्यक्तीला आपल्या अटकेविरुद्ध प्रत्यावेदन (Representation) करण्याची संधी दिली पाहिजे.
- हेबिअस कॉर्पस (बंदी प्रत्यक्षीकरण): प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या बाबतीत ही रिट लागू होते (दीपक बजाज विरुद्ध महाराष्ट्र शासन खटला).

## ■ शोषणाविरुद्धचा अधिकार (RIGHT AGAINST EXPLOITATION) (कलम २३ आणि २४)

| | |
|---|---|
| **कलम २३: मानवी व्यापार आणि सक्तीच्या श्रमास मनाइ (Prohibition of Traffic in Human Beings & Forced Labour)** | ❍ कोणास उपलब्ध: नागरिक आणि बिगर-नागरीक (परकीय व्यक्ती) अशा दोघांनाही हा अधिकार उपलब्ध आहे.<br>❍ कोणाविरुद्ध लागू: हा अधिकार राज्य संस्था (State) आणि खाजगी व्यक्ती (Private individuals) या दोघांच्याही विरुद्ध बजावता येतो.<br>**कशावर बंदी (प्रतिबंध) आहे?**<br>❍ मानवाचा व्यापार (Traffic in human beings):<br>■ यामध्ये मानवांची खरेदी-विक्री, देवदासी प्रथा आणि गुलामगिरीसारख्या प्रथांचा समावेश होतो.<br>■ अनैतिक व्यापार आणि शोषणाचाही यात समावेश होतो.<br>❍ सक्तीचे श्रम / वेठबिगारी (Forced labour / Begaar):<br>■ खालील माध्यमांतून करून घेतलेले श्रम:<br>♦ शारीरिक बळ (Physical force).<br>♦ कायदेशीर सक्ती (Legal coercion).<br>♦ आर्थिक सक्ती (उदा. गरिबीमुळे किंवा अत्यंत कमी मजुरीवर काम करणे).<br>**अपवाद (Exception):**<br>❍ राज्य संस्था सार्वजनिक कारणांसाठी सक्तीची सेवा लादू शकते.<br>❍ उदाहरण: लष्करी सेवा, समाजसेवा किंवा आपत्कालीन परिस्थितीत सर्वांनी आरोग्य कर्मचारी म्हणून काम करणे (उदा. कोव्हिड-१९ काळ).<br>❍ अट: अशी सेवा लादताना केवळ धर्म, वंश, जात, वर्ग इत्यादींच्या आधारावर भेदभाव करता येणार नाही.<br>**संबंधित कायदे (Related Acts):**<br>❍ वेठबिगारी पद्धत (निर्मूलन) कायदा, १९७६ (Bonded Labour System Abolition Act).<br>❍ किमान वेतन कायदा, १९४८ (Minimum Wages Act).<br>❍ कंत्राटी कामगार कायदा, १९७० (Contract Labour Act).<br>❍ समान वेतन कायदा, १९७६ (Equal Remuneration Act).<br>**सुरजीत रॉय विरुद्ध राजस्थान शासन (SoRJ), १९८३:** या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने असा निकाल दिला की, कैदी त्यांच्या कामासाठी योग्य/न्याय्य मजुरी (Fair wages) मिळण्यास पात्र आहेत. |
| **कलम २४: बालकामगारांना कामावर ठेवण्यास मनाइ (Prohibition of Employment of Children)** | ❍ मुख्य तरतूद: १४ वर्षांखालील मुलांना खालील ठिकाणी कामावर ठेवण्यास मनाइ आहे:<br>■ कारखाने, खाणी किंवा इतर कोणतीही धोकादायक (Hazardous) कामे.<br>❍ काय करण्याची मुभा आहे?<br>❍ मुलांचा अशा कामांमधील रोजगार प्रतिबंधित नाही जे धोकादायक नाहीत (उदा. निरुपद्रवी किंवा साधी कामे).<br>**संबंधित कायदे (Related Acts):**<br>❍ बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) कायदा, १९८६: काही विशिष्ट व्यवसायांमध्ये मुलांच्या रोजगारावर बंदी घालण्यात आली होती.<br>❍ २०१६ ची सुधारणा: या कायद्याचे नाव बदलून 'बाल आणि किशोरवयीन कामगार (प्रतिबंध आणि नियमन) कायदा, १९८६' असे करण्यात आले:<br>■ बालके (१४ वर्षांखालील): आता सर्वच क्षेत्रांतील/व्यवसायांतील रोजगारावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.<br>■ किशोरवयीन (१४ ते १८ वर्षे): यांना केवळ विशिष्ट धोकादायक व्यवसायांमध्ये कामावर ठेवण्यास बंदी आहे. |

## ■ धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार (RIGHT TO FREEDOM OF RELIGION) (कलम २५ ते २८)

| | |
|---|---|
| **कलम २५: सदसद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रसार (Freedom of Conscience and Free Profession, Practice and Propagation of Religion)** | ❍ व्यक्तीचा अधिकार (Right of Individual): हा अधिकार व्यक्तीला वैयक्तिक स्तरावर प्राप्त आहे.<br>❍ कोणास उपलब्ध: नागरिक आणि बिगर-नागरीक (परकीय व्यक्ती) अशा दोघांनाही उपलब्ध.<br>**मुख्य अधिकार (Core Rights):**<br>❍ सदसद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य (Freedom of conscience): आपल्या इश्वराशी किंवा श्रद्धांशी असलेल्या आंतरिक संबंधाचे पूर्ण स्वातंत्र्य.<br>❍ धर्माचे प्रकटीकरण (Right to profess): आपल्या धार्मिक श्रद्धांची जाहीरपणे घोषणा करण्याचा अधिकार.<br>❍ धर्माचे आचरण (Right to practice): धार्मिक पूजा, विधी, समारंभ आणि आपल्या श्रद्धांचे प्रदर्शन करण्याचे स्वातंत्र्य.<br>❍ धर्माचा प्रसार (Right to propagate): आपल्या धार्मिक तत्त्वांचा इतरांना परिचय करून देणे किंवा त्यांचा प्रसार करणे.<br>**व्याप्ती (Coverage):**<br>❍ यामध्ये धार्मिक समजुती (Beliefs), विधी (Rituals) आणि प्रथा (Practices) यांचा समावेश होतो.<br>❍ महत्त्वाचे: यामध्ये दुसऱ्या व्यक्तीचे सक्तीने धर्मांतर (Forced conversion) करण्याच्या अधिकाराचा समावेश नाही.<br>■ **निर्बंध (Restrictions):**<br>**राज्य संस्था खालील कारणांसाठी या अधिकारावर मर्यादा आणू शकते:**<br>❍ १. सार्वजनिक सुव्यवस्था (Public order), नैतिकता (Morality) आणि आरोग्य (Health).<br>❍ २. राज्य संस्था धर्माशी संबंधित असलेल्या एहिक/धर्मनिरपेक्ष (Secular) उपक्रमांचे नियमन करू शकते (उदा. आर्थिक किंवा राजकीय व्यवहार).<br>❍ ३. राज्य संस्था समाजकल्याण आणि सामाजिक सुधारणेसाठी तरतूद करू शकते (उदा. हिंदूंच्या धार्मिक संस्था सर्व वर्गांसाठी खुल्या करणे). |
| **कलम २६: धार्मिक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य (Freedom to Manage Religious Affairs) सामूहिक अधिकार (Collective Right):** | **मिळणारे अधिकार (Rights include):**<br>❍ संस्था स्थापन करणे: धार्मिक आणि धर्मादाय (Charitable) कारणांसाठी संस्था स्थापन करण्याचा आणि त्या चालवण्याचा अधिकार.<br>❍ स्वतःचे व्यवहार पाहणे: धर्माच्या बाबतीत स्वतःच्या व्यवहारांचे व्यवस्थापन करण्याचे स्वातंत्र्य.<br>❍ मालमत्ता संपादन: जंगम (Movable) आणि स्थावर (Immovable) मालमत्ता बाळगण्याचा आणि ती मिळवण्याचा अधिकार.<br>❍ प्रशासन: अशा मालमत्तेचे कायद्यानुसार प्रशासन (Administration) करण्याचा अधिकार.<br>**कोणास लागू: हा अधिकार धार्मिक संप्रदायांना लागू होतो. 'धार्मिक संप्रदाय' मानले जाण्यासाठी खालील अटी आवश्यक आहेत:**<br>❍ विशिष्ट नाव (Distinct name)<br>❍ सामायिक श्रद्धा/विश्वास (Common faith)<br>❍ संघटन (Organisation) |
| **कलम २७: धर्माच्या संवर्धनासाठी कर देण्याबाबत स्वातंत्र्य** | ❍ कोणत्याही विशिष्ट धर्माच्या किंवा धार्मिक संप्रदायाच्या संवर्धनासाठी किंवा देखभालीसाठी कोणताही कर लादला जाणार नाही.<br>❍ हे कलम केवळ कर (Tax) आकारण्यास मनाइ करते, शुल्क (Fee) आकारण्यास नाही. (सेवा पुरवण्यासाठी किंवा सुरक्षा उपायांसाठी शुल्क आकारले जाऊ शकते).<br>❍ गोळा केलेल्या कराचा वापर सर्व धर्मांच्या संवर्धनासाठी किंवा देखभालीसाठी केला जाऊ शकतो.<br>■ उदाहरण: अमरनाथ यात्रेसाठी आकारले जाणारे शुल्क.<br>❍ कोणत्याही धर्माच्या प्रसारासाठी सरकारी खर्च केला जाऊ शकत नाही. |

| | |
|---|---|
| **कलम २८: धार्मिक शिक्षण घेण्याबाबत स्वातंत्र्य (Freedom from Attending Religious Instruction)** | ❍ पूर्णपणे सरकारी निधीवर (Wholly funded by the State) चालणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.<br>**अपवाद (Exceptions)**<br>❍ अशा संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण देण्यास परवानगी आहे ज्या:<br>■ राज्याद्वारे संचलित (Administered) केल्या जातात परंतु,<br>■ ज्यांची स्थापना अशा ट्रस्ट किंवा एंडोमेंट (Trust/Endowment) अंतर्गत झाली आहे ज्यानुसार धार्मिक शिक्षण देणे बंधनकारक आहे. |

## सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार (CULTURAL & EDUCATIONAL RIGHTS) (कलम २९ आणि ३०)

| | |
|---|---|
| **कलम २९: अल्पसंख्याकांच्या हिताचे संरक्षण (Protection of Interests of Minorities)** | **(अ) संस्कृती जतन करण्याचा अधिकार (Right to Conserve Culture)**<br>❍ नागरिकांचा कोणताही गट (केवळ अल्पसंख्याकच नव्हे).<br>■ सर्वोच्च न्यायालय (SC): हे केवळ अल्पसंख्याकांसाठी मर्यादित नाही.<br>■ हा अधिकार बहुसंख्याक + अल्पसंख्याक या दोघांनाही लागू होतो.<br>❍ ज्यांना स्वतःची विशिष्ट भाषा, लिपी किंवा संस्कृती आहे.<br>❍ त्यांना ती जतन करण्याचा अधिकार आहे.<br>❍ हा एक सामूहिक अधिकार (Group right) आहे.<br>**(ब) शैक्षणिक प्रवेशातील संरक्षण (Protection in Educational Admission)**<br>❍ कोणत्याही नागरिकाला खालील ठिकाणी प्रवेश नाकारला जाणार नाही:<br>■ राज्याद्वारे चालवल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्था किंवा,<br>■ राज्याकडून मदत मिळणाऱ्या संस्था.<br>❍ प्रवेश नाकारण्यासाठी केवळ खालील आधार असू शकत नाहीत:<br>■ धर्म, वंश, जात, भाषा.<br>❍ हा एक वैयक्तिक अधिकार (Individual right) आहे. |
| **कलम ३०: शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्यांचे प्रशासन करण्याचा अल्पसंख्याकांचा अधिकार** | ❍ सर्व अल्पसंख्याकांना खालील अधिकार आहेत:<br>■ त्यांच्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापन करणे आणि त्यांचे प्रशासन करणे.<br>**व्याप्ती (Scope):**<br>❍ हा अधिकार केवळ अल्पसंख्याकांनाच उपलब्ध आहे.<br>❍ अल्पसंख्याक = धार्मिक + भाषिक अल्पसंख्याक.<br>**मालमत्ता आणि नुकसान भरपाइ (Property & Compensation):**<br>❍ जर अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेची मालमत्ता सक्तीने संपादित केली गेली तर:<br>❍ राज्याद्वारे निश्चित केलेली नुकसानभरपाइ ही त्यांच्या या अधिकाराचा संकोच करणारी किंवा तो नष्ट करणारी नसावी.<br>❍ हे संरक्षण ४४ व्या घटनादुरुस्तीद्वारे अधिक बळकट करण्यात आले आहे.<br>❍ महत्त्वाची टीप: 'अल्पसंख्याक' (Minority) या शब्दाची संविधानात कुठेही व्याख्या केलेली नाही. |

## ■ RIGHT TO PROPERTY & SAVING OF CERTAIN LAWS

| | |
|---|---|
| **कलम ३१: मालमत्तेच्या अधिकाराची समाप्ती (Abolition of Right to Property)** | ❍ ४४ वी घटनादुरुस्ती कायदा, १९७८:<br>❍ या दुरुस्तीद्वारे कलम १९(१)(f) (मालमत्ता मिळवणे, धारण करणे आणि तिची विल्हेवाट लावणे) रद्द करण्यात आले.<br>❍ कलम ३१ काढून टाकण्यात आले आणि त्यातील मजकूर कलम ३००A मध्ये हलवण्यात आला.<br>**परिणाम (Effect):**<br>❍ मालमत्तेचा अधिकार आता मूलभूत अधिकार राहिलेला नाही.<br>❍ तो आता एक घटनात्मक / कायदेशीर अधिकार आहे.<br>❍ याचे उल्लंघन झाल्यास → कलम ३२ अंतर्गत थेट सर्वोच्च न्यायालयात जाता येत नाही.<br>❍ यासाठी सामान्य न्यायालये किंवा उच्च न्यायालयात (कलम २२६) दाद मागावी लागते.<br>■ **अपवाद / काही कायद्यांचे जतन (Exceptions / Saving of Certain Laws)**<br>**कलम ३१A**<br>❍ खालील क्षेत्रांशी संबंधित कायद्यांचे संरक्षण करते:<br>■ कृषी सुधारणा, उद्योग आणि वाणिज्य.<br>❍ राज्य संस्था खाजगी जमीन संपादित करू शकते.<br>❍ अशा कायद्यांना मूलभूत अधिकारांच्या (कलम १४, १९, ३१) उल्लंघनाच्या आधारावर आव्हान दिले जाऊ शकत नाही.<br>**कलम ३१B**<br>❍ नव्या परिशिष्टात (Ninth Schedule) समाविष्ट केलेल्या कायद्यांना मूलभूत अधिकारांच्या आव्हानापासून संरक्षण मिळते.<br>❍ आय.आर. कोएल्हो खटला (२००७):<br>■ सरसकट संरक्षण (Blanket immunity) मिळणार नाही.<br>■ २४ एप्रिल १९७३ नंतर नव्या परिशिष्टात टाकलेल्या कायद्यांचे पुनरावलोकन केले जाऊ शकते.<br>■ जर हे कायदे 'मूलभूत संरचनेचे' (Basic Structure) उल्लंघन करत असतील, तर ते रद्द केले जाऊ शकतात.<br>**कलम ३१C**<br>❍ मार्गदर्शक तत्त्वांमधील (DPSP) कलम ३९(b) आणि ३९(c) च्या अंमलबजावणीसाठी केलेले कायदे मूलभूत अधिकारांच्या आव्हानापासून मुक्त आहेत.<br>❍ केशवानंद भारती खटला:<br>■ कलम ३१C ची दुसरी तरतूद असंवैधानिक आणि शून्य (Void) घोषित करण्यात आली.<br>■ केलेला कायदा खरोखरच मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करतो की नाही, याचे परीक्षण न्यायालये करू शकतात. |

## ■ घटनात्मक उपायांचा अधिकार (RIGHT TO CONSTITUTIONAL REMEDIES) (कलम ३२)

| कलम ३२ | ■ **स्वरूप आणि महत्त्व (Nature & Importance)**<br>**कलम ३२ हे संविधानाचे 'मूलभूत वैशिष्ट्य' (Basic Feature) आहे.**<br>❍ डॉ. बी.आर. आंबेडकरांनी याला संविधानाचा "हृदय आणि आत्मा" (Heart & Soul) म्हटले आहे.<br>❍ हे कलम स्वतःच एक मूलभूत अधिकार आहे.<br>❍ कलम ३२ ची व्याप्ती (Scope of Article 32)<br>❍ याचा वापर केवळ मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठीच केला जातो.<br>❍ केवळ एखाद्या कायद्याची किंवा कार्यकारी आदेशाची घटनात्मकता तपासण्यासाठी याचा वापर करता येत नाही.<br>❍ मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होणे ही या कलमाचा वापर करण्यासाठी अनिवार्य अट आहे.<br>❍ न्यायालयांचे अधिकार (Power of Courts)<br>**कलम ३२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र 'मूळ' (Original) स्वरूपाचे आहे.**<br>❍ सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार व्यापक आहेत → न्यायालय खालील गोष्टी जारी करू शकते:<br>■ निर्देश (Directions)<br>■ आदेश (Orders)<br>■ प्राधिलेख (Writs)<br>❍ संसद इतर न्यायालयांना (सर्वोच्च न्यायालय वगळता) प्राधिलेख जारी करण्याचे अधिकार देऊ शकते.<br>❍ राष्ट्रीय आणीबाणी दरम्यान:<br>❍ मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयात जाण्याचा अधिकार राष्ट्रपती (पंतप्रधान नव्हे) निलंबित करू शकतात.<br>❍ हे कलम ३५९ अंतर्गत केले जाते.<br>❍ निलंबन केवळ 'उपायांना' (Remedies) लागू होते, स्वतः मूलभूत अधिकारांना नाही.<br>■ (टीप: कलम २० आणि २१ कोणत्याही परिस्थितीत निलंबित करता येत नाहीत). |
|---|---|

## ■ सर्वोच्च न्यायालय विरुद्ध उच्च न्यायालय (प्राधिलेख अधिकारक्षेत्र)

| सर्वोच्च न्यायालय – कलम ३२ | उच्च न्यायालय – कलम २२६ |
|---|---|
| ❍ केवळ मूलभूत अधिकारांसाठीच प्राधिलेख (Writs) जारी करू शकते.<br>❍ विषयाची व्याप्ती संकुचित आहे.<br>❍ प्रादेशिक अधिकारक्षेत्र विस्तीर्ण आहे (संपूर्ण भारतभर).<br>❍ कलम ३२ हा स्वतःच एक मूलभूत अधिकार असल्याने:<br>■ सर्वोच्च न्यायालय प्राधिलेख अधिकारक्षेत्राचा वापर करण्यास नकार देऊ शकत नाही. | ❍ खालील दोन्हीसाठी प्राधिलेख जारी करू शकते:<br>■ मूलभूत अधिकार<br>■ इतर कायदेशीर अधिकार<br>❍ विषयाची व्याप्ती व्यापक आहे.<br>❍ प्रादेशिक अधिकारक्षेत्र केवळ संबंधित राज्यापुरते मर्यादित आहे.<br>❍ प्राधिलेख अधिकारक्षेत्र स्वेच्छाधीन (Discretionary) आहे:<br>■ उच्च न्यायालय प्राधिलेख जारी करण्यास नकार देऊ शकते. |

■ **प्राधिलेख (WRITS) – प्रकार आणि व्याप्ती WRITS – TYPES & SCOPE**

| रिट्स (Writs) | अर्थ आणि उद्देश (Meaning & Purpose) | कोणाविरुद्ध काढले जाते (Issued Against) | कोणाविरुद्ध काढले जात नाही (NOT Issued Against) |
|---|---|---|---|
| **हेबियस कॉर्पस (Habeas Corpus)(बंदी प्रत्यक्षीकरण)** | **अर्थ:**<br>❍ "सदेह उपस्थित करणे" (to have the body)<br>**उद्देश:**<br>❍ ज्या व्यक्तीने दुसऱ्याला डांबून ठेवले आहे, तिला न्यायालयाने त्या डांबून ठेवलेल्या व्यक्तीला न्यायालयासमोर हजर करण्याचा दिलेला आदेश. | ❍ सार्वजनिक प्राधिकरणे (Public authorities)<br>❍ खाजगी व्यक्ती (Private individuals) | ❍ कायदेशीर स्थानबद्धता (Lawful detention)<br>❍ न्यायालयाचा अवमान (Contempt of court)<br>❍ न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाहेरील स्थानबद्धता (Detention outside court's jurisdic-tion)*व्यक्तिगत स्वातंत्र्यासाठीचा सर्वात जलद उपाय |
| **मँडॅमस (Manda-mus)(परमादेश)** | ❍ अर्थ: "आम्ही आज्ञा देतो" (we command)उदेश: सार्वजनिक अधिकारी किंवा संस्थेला त्यांचे कर्तव्य पार पाडण्यासाठी दिलेला आदेश, जे कर्तव्य करण्यास त्यांनी नकार दिला आहे किंवा ते करण्यात ते अपयशी ठरले आहेत. | ❍ सार्वजनिक प्राधिकरण (Public authority)<br>❍ महामंडळ (Corporation)<br>❍ कनिष्ठ न्यायालय (Inferior court)<br>❍ न्यायाधिकरण (Tribunal)<br>❍ सरकार | ❍ खाजगी संस्था (Private body)<br>❍ राष्ट्रपती<br>❍ राज्यपाल<br>❍ उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश (न्यायिक क्षमतेत कार्यरत असताना) |
| **प्रोहिबिशन (Prohibition) (प्रतिषेध)** | ❍ अर्थ: "मज्जाव करणे/थांबवणे" (to forbid)उदेश: कनिष्ठ न्यायालय किंवा न्यायाधिकरणाने आपल्या अधिकारक्षेत्राचे उल्लंघन करू नये म्हणून वरिष्ठ न्यायालयाने दिलेला आदेश. स्वरूप: प्रतिबंधात्मक (अंतिम आदेशापूर्वी). | ❍ न्यायिक प्राधिकरणे (Judi-cial authorities)<br>❍ अर्ध-न्यायिक प्राधिकरणे (Quasi-judicial au-thorities) | ❍ प्रशासकीय प्राधिकरणे<br>❍ विधायी संस्था (Legislative bodies)<br>❍ खाजगी व्यक्ती |
| **सर्शिओरराय (Certiorari) (उत्प्रेषण)** | ❍ अर्थ: "प्रमाणित करणे" किंवा "माहिती देणे" (to be certi-fied / informed)उदेश: वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयाचा आदेश रद्द करते किंवा खटला स्वतःकडे वर्ग करून घेते.स्वरूप: प्रतिबंधात्मक (निर्णयापूर्वी) आणि उपचारात्मक (निर्णयानंतर). | ❍ न्यायिक संस्था<br>❍ अर्ध-न्यायिक संस्था<br>❍ प्रशासकीय संस्था (१९९१ पासून) | ❍ विधायी संस्था<br>❍ खाजगी व्यक्ती किंवा संस्था |
| **कुओ-वॉरंटो (Quo Warranto) (अधिकार पृच्छा)** | ❍ अर्थ: "कोणत्या अधिकाराने?" (by what authority)उदेश: सार्वजनिक पद भूषविणाऱ्या व्यक्तीच्या हक्काच्या कायदेशीरतेची न्यायालय चौकशी करते.कोणी दाखल करावे: कोणतीही संबंधित व्यक्ती (ती व्यक्ती स्वतः पीडित असणे आवश्यक नाही). | ❍ केवळ महत्त्वाचे सार्वजनिक पद (Substantive pub-lic office)<br>❍ पद कायमस्वरूपी असावे<br>❍ पद संविधान किंवा कायद्याद्वारे तयार केलेले असावे | ❍ मंत्री पद (Ministerial office)<br>❍ खाजगी कार्यालय (Private office) |

## ■ कायदेशीर अधिकार (भाग ३ च्या बाहेरील) LEGAL RIGHTS (OUTSIDE PART III)

| कलम (Article) | तपशील |
|---|---|
| कलम २६५ (Article 265)भाग १२ (कर आकारणी) | ❍ कायद्याच्या अधिकाराशिवाय कोणताही कर लादला किंवा वसूल केला जाणार नाही.<br>❍ कार्यकारी आदेश पुरेसे नाहीत → कायदा अनिवार्य आहे.<br>❍ उपाय: सामान्य न्यायालये / उच्च न्यायालय, कलम ३२ अंतर्गत नाही. |
| कलम ३००A (Article 300A)भाग १२ (मालमत्ता) | ❍ कायद्याच्या अधिकाराशिवाय कोणत्याही व्यक्तीला त्याच्या मालमत्तेपासून वंचित केले जाणार नाही.<br>❍ मालमत्तेचा हक्क = कायदेशीर / घटनात्मक हक्क.<br>❍ हा मूलभूत हक्क नाही.<br>❍ कलम ३२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयात थेट दाद मागता येत नाही. |
| कलम ३०१ (Article 301)भाग १३ (व्यापार आणि वाणिज्य) | ❍ संपूर्ण भारतभर व्यापार, वाणिज्य आणि परस्पर व्यवहार मुक्त असतील.<br>❍ संसद/राज्यांद्वारे लादल्या जाणाऱ्या रास्त निर्बंधांच्या अधीन (कलम ३०२-३०४).<br>❍ हा कायदेशीर हक्क आहे, मूलभूत हक्क नाही. |
| कलम ३२६ (Article 326)भाग XV (प्रौढ मताधिकार) | ❍ मतदानाचा हक्क.<br>❍ निवडणुका प्रौढ मताधिकारावर आधारित असतील.<br>❍ मतदानाचा हक्क = वैधानिक (Statutory) / कायदेशीर हक्क.<br>❍ हा मूलभूत हक्क नाही. |

**2013**

93. भारतीय नागरिकांना उपलब्ध असलेल्या घटनात्मक संरक्षणाच्या हक्काच्या खालीलपैकी कोणत्या तरतुदी आहेत ? अचूक उत्तराचा योग्य तो संकेत निवडा.

(a) मूलभूत हक्कांची अंमलबजावणी व्हावी यासाठी नागरीक न्यायालयात दाद मागू शकतात.
(b) मूलभूत हक्कांची अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्वोच्च न्यायालय परमादेश काढू शकते.
(c) संसद दोन तृतीयांश बहुमताने (जे संपूर्ण सभासद संख्येच्या अर्ध्या पेक्षा जास्त असेल), घटनात्मक संरक्षणाचा हक्क निलंबित करु शकते.
(d) सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारांना धक्का न पोचवता इतर न्यायालयांना या हक्कांच्या अंमलबजावणीचे अधिकार संसद देऊ शकते.

(1) (a), (b), (c) (2) (a), (b), (d) (3) (a), (c), (d) (4) (b), (c), (d)

What are the main provisions of constitutional remedies available to Indian citizens under Indian Constitution ? Select the correct answer using the following codes :

(a) The citizens can move the courts for enforcement of their Fundamental Rights.
(b) The Supreme Court can issue necessary writs for enforcement of these rights.
(c) The Parliament can suspend the right to constitutional remedies by two - third majority, which must also be the majority of its total membership.
(d) The parliament can empower the courts, other than the Supreme Court, to exercise powers for enforcement of these rights without adversely affecting the powers of the Supreme Court.

(1) (a), (b), (c) (2) (a), (b), (d) (3) (a), (c), (d) (4) (b), (c), (d)

H — 5 प्रकार. — Art (32) = SC; Art (226) = HC — (b) Art (32) — (d) Art 32(3)

Parliament cannot suspend this right on its own by voting. It can be suspended only during a National Emergency (Article 359) and only by Presidential order, not by a simple or two-thirds majority vote.

71. घटनेच्या कलम 22 अंतर्गत, काही गोष्टींचा अपवाद वगळता प्रतिबंधक स्थानबद्धते अंतर्गत जास्तीत जास्त किती काळ एखाद्या व्यक्तिला स्थानबद्ध केले जाऊ शकते ?

**2014**

(1) 2 महिने (2) 3 महिने (3) 4 महिने (4) 6 महिने

Under Article 22 of the Constitution of India, with the exception of certain provisions stated there in, what is the maximum period for detention of a person under preventive detention ?

(1) 2 months (2) 3 months (3) 4 months (4) 6 months

2021

72. 'शोषणा विरुद्धचा हक्क' च्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(1) मानवी तस्करी आणि वेठबिगारीस प्रतिबंध

(2) कोणत्याही विशिष्ट धर्माचा प्रचार करण्याचा आणि कर भरण्याचे स्वातंत्र्य

(3) अल्पसंख्यांकांच्या हितसंबंधांचे संरक्षण

(4) कायद्यासमोर समानता

Which of the following statement is **correct** with respect to 'Right against exploitation' ?

(1) Prohibition of traffic in human beings and forced labour → Art [23, 24]

(2) Freedom as to payment of taxes and the promotion of any particular religion → Art (27)

(3) Protection of interests of minorities → Art (29, 30)

(4) Equality before law → Art (14)

2022

H 65. खालील विधाने विचारात घ्या :

(a) विभागीय खटल्यासह (Departmental proceedings) कोणत्याही खटल्यात कोणत्याही व्यक्तिस एकाच गुन्हयासाठी एकापेक्षा अधिक वेळा आरोपी केले जाणार नाही व एकापेक्षा अधिक वेळा शिक्षा दिली जाणार नाही.

(b) स्वतःविरुद्ध साक्ष न (self-incrimination) देण्या बाबतचे संरक्षण हे तोंडी आणि कागदोपत्री पुरावे या दोन्ही बाबतीत लागू आहे.

(c) स्वतःविरुद्ध साक्ष न देण्या बाबतचे संरक्षण फौजदारी आणि दिवाणी अशा दोन्हीही खटल्यामध्ये लागू आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (a) बरोबर (2) विधान (b) बरोबर

(3) विधाने (a) आणि (b) बरोबर (4) विधाने (a) आणि (c) बरोबर

Consider the following statements :

(a) No person shall be prosecuted and punished for the same offence more than once, including any departmental proceedings.

(b) The protection against self-incrimination extends to both oral evidence and documentary evidence.

(c) The protection against self-incrimination extends to both criminal and civil proceedings.

**Answer Options :**

(1) Statement (a) is correct (2) Statement (b) is correct

(3) Statements (a) and (b) are correct (4) Statements (a) and (c) are correct

2019

H 32. खालील तरतूदी विचारात घ्या :

अ. भारतीय राज्यघटना अनुच्छेद 21 नुसार कोणत्याही व्यक्तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य 'कायद्याच्या योग्य प्रक्रियेशिवाय' हिरावून घेतले जाणार नाही.

उचित प्रक्रिया.

ब. भारतीय राज्यघटना अनुच्छेद 20 (2) नुसार कोणत्याही व्यक्तिवर एकाच गुन्हयासाठी एकापेक्षा अधिकवेळा खटला चालविला जाणार नाही आणि एकापेक्षा अधिकवेळा शिक्षा दिली जाणार नाही.

क. भारतीय राज्यघटना अनुच्छेद 14 नुसार भारतीय प्रदेशात राज्य कोणत्याही व्यक्तिस कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही.

वरीलपैकी कोणती तरतूद बरोबर नाही ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ (2) ब (3) क (4) वरीलपैकी एकही नाही

Consider the following provisions :

a. According to Article 21 of the Indian Constitution, no person shall be deprived of his life or personal liberty except according to the 'due process of Law'.

Not mentioned at constitution. Rather later interpreted by Supreme court.

b. According to Article 20 (2) of the Indian Constitution, no person shall be prosecuted and punished for the same offence more than once.

c. According to Article 14 of the Indian Constitution, the State shall not deny to any person equality before the law or the equal protection of the laws within the territory of India.

Which of the provisions given above is not correct ?

**Answer Options :**

(1) a (2) b (3) c (4) None of the above

**2018**

**61.** खालीलपैकी कोणती मार्गदर्शक तत्त्वे ही मुळ राज्यघटनेचा भाग ***नव्हती***, परंतू त्यांचा समावेश नंतर घटनादुरूस्तीद्वारे झाला ?

अ. उत्पन्नातील विषमता कमी करणे. → (44th) = 38b.

ब. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन आणि वने व वन्य जीवसृष्टीचे रक्षण करणे. → (42nd) - 48a.

क. समान कामांबद्दल स्त्री पुरूषांना समान वेतन.

ड. समान न्यायाची शाश्वती आणि गरीबांना मोफत कायदेविषयक सहाय्य. — (42nd) = 39A.

ई. सर्व नागरिकांना उपजीविकेची पुरेशी साधने सुरक्षित करणे.

(1) अ, ब आणि क (2) ब, क आणि ड

(3) क, ड आणि ई (4) अ, ब आणि ड

Which of the following Directive Principles did ***not*** form part of the original Constitution and were added through constitutional amendments ?

a. To minimise inequality in income.

b. To protect and improve the environment and to safeguard forests and wildlife.

c. Equal pay for equal work for both men and women.

d. To ensure equal justice and free legal aid to the poor.

e. To secure adequate means of livelihood for all citizens.

(1) a, b and c (2) b, c and d

(3) c, d and e (4) a, b and d

**2020**

**85.** 'राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्य निधीतून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव प्रवेश नाकारला जाणार नाही'. ही तरतूद भारतीय राज्यघटनेच्या खालीलपैकी कोणत्या अनुच्छेदात आहे ?

(1) 30 (2) 16 (3) 28 (4) 29

'No citizen shall be denied admission into any educational institution maintained by the state or receiving aid out of state funds on grounds only of religion, race, caste, language or any of them.' This provision is contained in which of the following articles of the Indian Constitution ?

(1) 30 (2) 16 (3) 28 (4) 29

**2024**

85. कोणते कलम उच्च न्यायालयांना मूलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी निर्देश जारी करण्याचा अधिकार देते ?

(1) कलम 226 (2) कलम 135 (3) कलम 143 (4) कलम 133

Which article empowers the High Courts to issue directions for the enforcement of Fundamental Rights ?

(1) Article 226 (2) Article 135 (3) Article 143 (4) Article 133

CHAPTER

# 09 राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे

## राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे (DIRECTIVE PRINCIPLES OF STATE POLICY - DPSP)



## ■ ज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे वर्गीकरण (CLASSIFICATION OF DPSP)

| समाजवादी तत्वे (SOCIALISTIC DPSP) (आर्थिक आणि सामाजिक न्याय) | गांधीवादी तत्वे (GANDHIAN DPSP)(गांधीवादी विचारसरणीवर आधारित) | उदारमतवादी / बौद्धिक तत्वे (LIBERAL / INTELLECTUAL DPSP) (आधुनिक, उदारमतवादी मूल्ये) |
|---|---|---|
| **कलम ३८ (Article 38)**<br>❍ लोककल्याणासाठी सामाजिक व्यवस्था वाढवणे.<br>❍ उत्पन्न, दर्जा, सुविधा आणि संधींमधील असमानता कमी करणे.<br>**(४४ वी घटनादुरुस्ती)**<br>❍ कलम ३९ (Article 39)<br>❍ (a) सर्वांसाठी उपजीविकेचे साधन<br>❍ (b) संसाधनांचे समान वाटप<br>❍ (c) संपत्तीचे केंद्रीकरण रोखणे<br>❍ (d) स्त्री-पुरुषांना समान कामासाठी समान वेतन<br>❍ (e) कामगारांचे आरोग्य, बाल शोषणास बंदी<br>❍ (f) मुलांचा निकोप विकास (४२ वी घटनादुरुस्ती)<br>**कलम ३९A (Article 39A)**<br>❍ समान न्याय आणि मोफत कायदेशीर मदत (४२ वी घटनादुरुस्ती).<br>❍ कलम ४१ (Article 41)<br>❍ काम, शिक्षण आणि सार्वजनिक मदतीचा अधिकार.<br>**कलम ४२ (Article 42)**<br>❍ कामाच्या ठिकाणी न्याय्य आणि मानवी परिस्थिती आणि मातृत्व सहाय्य.<br>**कलम ४३A (Article 43A)**<br>❍ उद्योगांच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग (४२ वी घटनादुरुस्ती). | **कलम ४० (Article 40)**<br>❍ ग्रामपंचायतींचे संघटन.<br>**कलम ४३ (Article 43)**<br>❍ कुटीर उद्योगांना प्रोत्साहन.<br>**कलम ४३B (Article 43B)**<br>❍ सहकारी संस्था (९७ वी घटनादुरुस्ती, २०११).<br>**कलम ४६ (Article 46)**<br>❍ SC/ST च्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांना प्रोत्साहन देणे.<br>**कलम ४७ (Article 47)**<br>❍ अंमली पदार्थ आणि पेयांवर बंदी.<br>**कलम ४८ (Article 48)**<br>❍ गायी आणि ओढकाम करणाऱ्या जनावरांच्या हत्येस बंदी. | **कलम ४४ (Article 44)**<br>❍ समान नागरी कायदा (Uniform Civil Code).<br>**कलम ४५ (Article 45)**<br>❍ १४ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण.<br>❍ (८६ वी घटनादुरुस्ती, २००२)<br>❍ कलम ४८ (Article 48)<br>❍ कृषी आणि पशुसंवर्धनाचे आयोजन.<br>**कलम ४८A (Article 48A)**<br>❍ वने आणि वन्यजीवांचे संरक्षण (४२ वी घटनादुरुस्ती).<br>**कलम ४९ (Article 49)**<br>❍ राष्ट्रीय महत्त्वाची स्मारके आणि ठिकाणांचे संरक्षण.<br>**कलम ५० (Article 50)**<br>❍ न्यायसंस्थेला कार्यकारी संस्थेपासून वेगळे करणे.<br>**कलम ५१ (Article 51)**<br>❍ आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेचा प्रचार करणे. |

## ■ DPSP – AMENDMENTS

| | |
|---|---|
| **४२ वी घटनादुरुस्ती कायदा, १९७६** | **कलम ३९(f):**<br>❍ मुलांच्या निकोप विकासासाठी संधी सुरक्षित करणे.<br>**कलम ३९A:**<br>❍ गरिबांना समान न्याय आणि मोफत कायदेशीर मदत देणे.<br>**कलम ४३A:**<br>❍ उद्योगांच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग सुनिश्चित करणे.<br>**कलम ४८A:**<br>❍ पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करणे;<br>❍ वने आणि वन्यजीवांचे रक्षण करणे. |

| | |
|---|---|
| **४४ वी घटनादुरुस्ती कायदा, १९७८** | **कलम ३८(२):**<br>❍ राज्याने उत्पन्नातील असमानता कमी करणे.<br>❍ खालील बाबतीतील असमानता दूर करण्यासाठी प्रयत्न करणे:<br>■ दर्जा (Status)<br>■ सुविधा (Facilities)<br>■ संधी (Opportunities).<br>❍ हे नियम व्यक्ती-व्यक्तींमध्ये आणि विविध क्षेत्रांत राहणाऱ्या किंवा विविध व्यवसायांत असलेल्या लोकांच्या गटांमध्येही लागू होतात. |
| **८६ वी घटनादुरुस्ती कायदा, २००२** | **कलम ४५ (सुधारित)**<br>❍ राज्य सर्व मुलांसाठी बालपणीची काळजी आणि शिक्षणाची तरतूद करेल.<br>❍ हे ६ वर्षांखालील सर्व मुलांसाठी लागू असेल. |
| **९७ वी घटनादुरुस्ती कायदा, २०११** | **कलम ४३B (दाखल केलेले):**<br>❍ सहकारी संस्थांना प्रोत्साहन देणे:<br>■ एच्छिक स्थापना (Voluntary formation)<br>■ स्वायत्त कार्यप्रणाली (Autonomous functioning)<br>■ लोकशाही नियंत्रण (Democratic control)<br>■ व्यावसायिक व्यवस्थापन (Professional management). |

## ■ भाग IV च्या बाहेरील मार्गदर्शक तत्वे (DPSP OUTSIDE PART-IV)

| | |
|---|---|
| **कलम ३३५ (भाग XVI)** | सेवा आणि पदांसाठी अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमातींचे (ST) दावे. |
| **कलम ३५०A (भाग XVII)** | मातृभाषेतून शिक्षणाची सोय. |
| **कलम ३५१ (भाग XVII)** | हिंदी भाषेचा विकास आणि प्रसार. |

## ■ मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे (DPSP) यांच्यातील संघर्ष

| | |
|---|---|
| **चंपकम दोराइराजन खटला (१९५१)** | ❍ मूलभूत हक्क > मार्गदर्शक तत्वे (DPSP)<br>❍ मार्गदर्शक तत्वे ही मूलभूत हक्कांना दुय्यम आहेत<br>❍ मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीसाठी संसद मूलभूत हक्कांमध्ये सुधारणा करू शकते |
| **गोलकनाथ खटला (१९६७)** | ❍ मार्गदर्शक तत्वांना लागू करण्यासाठी मूलभूत हक्कांमध्ये सुधारणा करता येणार नाही<br>❍ मूलभूत हक्क हे 'अलौकिक आणि अपरिवर्तनीय' घोषित केले<br>❍ संसदेच्या मूलभूत हक्कांमध्ये सुधारणा करण्याच्या अधिकारावर मर्यादा आणली |
| **२५ वी घटनादुरुस्ती (१९७१)** | ❍ कलम ३१C समाविष्ट केले<br>❍ कलम ३९(b) आणि ३९(c) अंतर्गत मार्गदर्शक तत्वे लागू करणारे कायदे कलम १४ आणि १९ पेक्षा वरचढ ठरतील<br>❍ अशा कायद्यांना न्यायालयात आव्हान देता येणार नाही<br>❍ मार्गदर्शक तत्वांच्या प्राधान्याकडे झुकलेली भूमिका |
| **केशवानंद भारती खटला (१९७३)** | ❍ 'मूलभूत संरचनेचा सिद्धांत' (Basic Structure Doctrine) मांडला<br>❍ कलम ३१C चा दुसरा भाग (न्यायालयीन बंदी) रद्द केला<br>❍ संसद मूलभूत हक्कांमध्ये बदल करू शकते, पण 'मूलभूत संरचनेस' धक्का लावू शकत नाही |
| **४२ वी घटनादुरुस्ती (१९७६)** | ❍ कलम ३१C चा विस्तार सर्व मार्गदर्शक तत्वांपर्यंत केला<br>❍ मार्गदर्शक तत्वे > मूलभूत हक्क असे स्थान दिले<br>❍ मार्गदर्शक तत्वांच्या बाजूने जास्तीत जास्त झुकलेली भूमिका |

| | |
|---|---|
| **मिनर्व्हा मिल्स खटला (१९८०)** | ❍ मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यांच्यातील संतुलन पुनर्संचयित केले<br>❍ घोषित केले की: - मूलभूत हक्क हे मार्गदर्शक तत्वांपेक्षा श्रेष्ठ आहेत - परंतु कलम ३९(b) आणि (c) मधील तत्वे कलम १४ आणि १९ पेक्षा वरचढ ठरू शकतात<br>❍ मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यांच्यातील सुसंवाद म्हणजे 'मूलभूत संरचना' होय |
| **अंतिम घटनात्मक स्थिती (FINAL POSITION)** | ❍ मार्गदर्शक तत्वांपेक्षा मूलभूत हक्क हे श्रेष्ठ (Supreme) आहेत<br>❍ मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीसाठी संसद मूलभूत हक्कांमध्ये सुधारणा करू शकते<br>❍ परंतु संसद संविधानाच्या 'मूलभूत संरचनेस' नष्ट करू शकत नाही<br>❍ कलम ३९(b) आणि (c) यांना कलम १४ आणि १९ वर विशेष संरक्षण प्राप्त आहे |

## ■ मूलभूत हक्क विरुद्ध मार्गदर्शक तत्वे

| मूलभूत हक्क (भाग III) | मार्गदर्शक तत्वे (भाग IV) |
|---|---|
| ❍ नकारार्थी स्वरूप – राज्याला काही गोष्टी करण्यापासून रोखतात. | ❍ होकारार्थी स्वरूप – राज्याला काही गोष्टी करण्यास सांगतात. |
| ❍ न्यायप्रविष्ट – न्यायालयांद्वारे कायदेशीररित्या लागू करण्यायोग्य असतात. | ❍ अन्यायप्रविष्ट – न्यायालयांद्वारे कायदेशीररित्या लागू करण्यायोग्य नसतात. |
| ❍ राजकीय लोकशाही प्रस्थापित करणे हे उद्दिष्ट आहे. | ❍ सामाजिक आणि आर्थिक लोकशाही प्रस्थापित करणे हे उद्दिष्ट आहे. |
| ❍ यांना कायदेशीर मान्यता (Legal Sanctions) असते. | ❍ यांना नैतिक आणि राजकीय मान्यता असते. |
| ❍ वैयक्तिक कल्याणाला चालना देतात – वैयक्तिक आणि व्यक्तिवादी स्वरूपाचे असतात. | ❍ समुदायाच्या कल्याणाला चालना देतात – समाजवादी आणि समुदायवादी स्वरूपाचे असतात. |
| ❍ अंमलबजावणीसाठी कायद्याची गरज नसते; ते आपोआप लागू होतात. | ❍ अंमलबजावणीसाठी कायद्याची आवश्यकता असते. |
| ❍ मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारा कायदा न्यायालये असंवैधानिक आणि अवैध म्हणून घोषित करू शकतात. | ❍ मार्गदर्शक तत्वांच्या उल्लंघनासाठी न्यायालय कायदा रद्द करू शकत नाही; मात्र मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या कायद्याला न्यायालये वैध ठरवू शकतात. |

2015

43. भारतीय राज्य घटनेच्या कुठल्या आर्टिकल नुसार राज्य सरकारांनी वन्य जमातींकडून अन्य लोकांकडे जमीन हस्तांतरण करण्यास प्रतिबंध करण्याचे धोरण स्विकारले ?

(1) आर्टिकल 36 → welfare-(DPSP's)
(2) आर्टिकल 46
(3) आर्टिकल 39
(4) वरीलपैकी एकही नाही

Under the guidelines of which Article of the Indian Constitution have the State Governments accepted the policy of prohibiting the transfer of land from tribals to non-tribals ?

(1) Article 36
(2) Article 46
(3) Article 39
(4) None of the above

2016

E

77. खालीलपैकी कोणते मार्गदर्शक तत्त्व हे समाजवादी तत्त्व *नाही* ?

(1) सर्वांना समान कामाबद्दल समान वेतन

(2) समान न्याय व मोफत कायदेविषयक सहाय्य

(3) समान नागरी कायदा

(4) संपत्ती व उत्पादन साधनाचे केन्द्रीकरण रोखणे

Which one of the following Directive Principles is ***not*** a Socialistic Principle ?

(1) Equal pay for equal work to all

(2) Equal justice and free legal aid

(3) Uniform civil code

(4) Prevention of concentration of wealth and means of production

2022

**68.** खालील विधाने विचारात घेऊन योग्य पर्याय निवडा :

(a) 2011 साली 97 व्या घटनादुरुस्तीद्वारे 'सहकारी संस्था' हा विषय राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आला.

(b) अनुच्छेद 19(1)(c) मध्ये 'सहकारी संस्था' स्थापन करण्याचा अधिकार बहाल करण्यात आला.

(c) लॉर्ड कर्झन यांच्या कारकिर्दीत भारतातील पहिला सहकारी कायदा पारीत केला गेला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (c) बरोबर आहेत

(2) (b) आणि (c) बरोबर आहेत

(3) (a) आणि (b) बरोबर आहेत

(4) तिन्ही विधाने बरोबर आहेत

Consider the following statements and choose the correct option :

(a) The subject, 'Co-operative Societies' has been included in the Constitution of India by the 97th Amendment in 2011.

(b) The right to establish 'Co-operative Societies' is given in Article 19(1)(c).

(c) The first law related to Co-operative Societies in India was passed in the tenure of Lord Curzon.

**Answer Options :**

(1) (a) and (c) are correct

(2) (b) and (c) are correct

(3) (a) and (b) are correct

(4) All the three statements are correct

2022

**56.** "संसदीय लोकशाहीसाठी निर्माण करण्यात आलेल्या राज्यघटनेत मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करणे हे एक नाविन्यपूर्ण वैशिष्ट्य आहे. ही तत्त्वे बंधनकारक स्वरूपाची नाहीत. मात्र सत्तेवर जो कोणी येईल, तो त्याचा मनमानीपणे वापर करू शकणार नाही. त्याला या तत्त्वांचा आदर करावा लागेल. त्यांचा भंग झाल्यास त्यास त्याबद्दल न्यायालयासमोर जाब द्यावा लागणार नाही; परंतु निवडणुकीच्या वेळी मतदारांना निश्चितपणे उत्तर द्यावे लागेल." असे खालीलपैकी कोणी म्हटले आहे ?

(1) पंडीत जवाहरलाल नेहरू

(2) बी.एन. राव

(3) डॉ. बी.आर. आंबेडकर

(4) के.एम. मुन्शी

"Directive Principles is a novel feature in a constitution framed for parliamentary democracy. They have no binding force. But whoever captures power will not be free to do what he likes with it. He will have to respect the Directive Principles. He cannot ignore them. He may not have to answer for their breach in a court of law, but he will certainly have to answer for them before the electorate at election time." Who said this ?

(1) Pandit Jawaharlal Nehru

(2) B.N. Rao

(3) Dr. B.R. Ambedkar

(4) K.M. Munshi

## मूलभूत कर्तव्ये (FUNDAMENTAL DUTIES) (Part IV-A | Art. 51A)

### उगम आणि उत्क्रांती (Origin & Evolution)

- प्रेरणा: यु.एस.एस.आर. (USSR) च्या संविधानावरून प्रेरित (जपानच्या संविधानातही कर्तव्यांचा समावेश आहे).
- स्वर्ण सिंग समिती (1976): या समितीने मूलभूत कर्तव्यांची शिफारस केली.
- 42 वी घटनादुरुस्ती कायदा, 1976: याद्वारे 10 कर्तव्यांचा समावेश करण्यात आला.
- 86 वी घटनादुरुस्ती कायदा, 2002: याद्वारे 11 वे कर्तव्य (बालशिक्षण) जोडण्यात आले.
- वर्मा समिती (1999): मूलभूत कर्तव्यांशी संबंधित कायदेशीर तरतुदींचे परीक्षण केले.

### स्वरूप आणि व्याप्ती (Nature & Scope)

- केवळ नागरिकांना लागू: ही कर्तव्ये केवळ भारतीय नागरिकांसाठी आहेत.
- न्यायप्रविष्ट नाहीत (Non-justiciable): यांच्या अंमलबजावणीसाठी थेट न्यायालयात दाद मागता येत नाही.
- अंमलबजावणीची यंत्रणा: यांच्या अंमलबजावणीसाठी संविधानात कोणतीही विशिष्ट कायदेशीर यंत्रणा दिलेली नाही.
- प्रकार: काही कर्तव्ये नैतिक आहेत, तर काही नागरी आहेत; ही आपोआप लागू होणारी कायदेशीर बंधने नाहीत.

### मूलभूत कर्तव्यांची यादी (कलम 51A)

- १. राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीताचा आदर करणे: संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा मान राखणे.
- २. स्वातंत्र्यलढ्यातील उदात्त आदर्शांचे अनुसरण करणे: ज्या उदात्त आदर्शांनी आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा दिली, त्यांचे जतन आणि अनुसरण करणे.
- ३. देशाची एकात्मता आणि अखंडता राखणे: भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे.
- ४. देशाचे संरक्षण करणे: देशाचे संरक्षण करणे आणि आवाहन केले जाइल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे.
- ५. सलोखा आणि बंधुभाव वाढवणे: धार्मिक, भाषिक आणि प्रादेशिक किंवा विभागीय भेदांच्या पलीकडे जाऊन सर्व भारतीय जनतेमध्ये सामंजस्य व समान बंधुभावाची भावना वाढीस लावणे; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.
- ६. सांस्कृतिक वारशाचे जतन करणे: आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मोल जाणून तो जतन करणे.
- ७. नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण आणि सुधारणा करणे: वने, तलाव, नद्या व वन्यजीव यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करणे, त्यात सुधारणा करणे आणि प्राणीमात्रांबद्दल दयाबुद्धी बाळगणे.
- ८. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे: वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकवृत्ती व सुधारणावाद यांचा विकास करणे.
- ९. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे: सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे आणि हिंसेचा त्याग करणे.
- १०. उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे: राष्ट्र सतत प्रयत्न व सिद्धी यांच्या उच्च स्तराकडे झेपावेल अशा प्रकारे वैयक्तिक व सामूहिक कार्याच्य सर्व क्षेत्रांत उत्कर्षासाठी प्रयत्न करणे.
- ११. मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे: ६ ते १४ वर्षे वयोगटातील आपल्या पाल्याला शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे (पालक किंवा पालकांचे कर्तव्य) — ८६ वी घटनादुरुस्ती, २००२ द्वारे समाविष्ट.

2017

**76.** नागरिकांसाठी खालीलपैकी कोणती कर्तव्ये विहीत करण्यात आली आहेत ?
अ. ग्रामपंचायतीचे संगठन करणे
ब. उत्पन्नातील विषमता कमी करणे
क. देशाचे संरक्षण करणे
ड. लष्करी सेवा बजावणे
ई. समान नागरी कायदा निश्चित करणे
फ. सार्वजनिक निवडणूकांमध्ये मतदान करणे

(1) फक्त अ, ब आणि क (2) फक्त ब, ड आणि ई
(3) फक्त ड, ई आणि फ (4) फक्त क

Which one of the following duties have been prescribed for the citizens ?
a. To organize village panchayats
b. To minimize inequalities in income
c. To defend the country
d. To render military service
e. To secure uniform civil code
f. To vote in public elections

(1) Only a, b and c (2) Only b, d and e
(3) Only d, e and f (4) Only c

2023

**85.** घटनापरिषदेमध्ये विस्तृत चर्चा होऊन पुढील तरतूदीचा समावेश करण्यात आला. खालीलपैकी कोणत्या अनुच्छेदांचा त्यात समावेश होत नाही ?

I. अनुच्छेद 51अ नुसार मूलभूत कर्तव्य
II. अनुच्छेद 368 नुसार घटनादुरुस्ती
III. अनुच्छेद 352 नुसार राष्ट्रीय आणीबाणी
IV. अनुच्छेद 123 नुसार वटहुकूम

(1) फक्त I बरोबर
(2) फक्त II बरोबर
(3) वरीलपैकी सर्व बरोबर
(4) वरीलपैकी कोणतेही बरोबर नाही

After the extensive discussion in the Constituent Assembly, the following provisions was/were included. Which Article does not include ?

I. Fundamental duties under Art. 51A
II. Constitutional Amendment under Art. 368
III. National emergency under Art. 352
IV. Ordinance under Art. 123

(1) Only I correct
(2) Only II correct
(3) All of the above are correct
(4) None of the above are correct

2013

**73.** भारतीय राज्यघटनेत खालीलपैकी कोणते मूलभूत कर्तव्य समाविष्ट नाही ?

(1) विज्ञान वृत्तीचा विकास करणे
(2) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे
(3) मतदान करणे
(4) राज्यघटनेप्रती निष्ठा आणि राज्यघटनेतील आदर्शांचा सन्मान

Which one of the following is not mentioned in the Constitution of India as a fundamental duty ?

(1) To develop the scientific temper.
(2) To safeguard public property.
(3) To cast vote in the election.
(4) To respect the Constitution and its ideals.

CHAPTER

# 10 'संविधानाची मूलभूत संरचना' (Basic Structure of the Constitution)

## EVOLUTION THROUGH CASES

| | |
|---|---|
| **शंकरी प्रसाद खटला (१९५१)** | ❍ पहिल्या घटनादुरुस्तीच्या (१९५१) वैधतेला आव्हान दिले गेले.<br>❍ सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला की:<br>❍ संसदेला मूलभूत हक्कांमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार आहे.<br>❍ कलम १३ मधील "कायदा" या शब्दात सामान्य कायद्यांचा समावेश होतो, घटनादुरुस्तीचा नाही.<br>❍ मूलभूत हक्कांमध्ये सुधारणा केली जाऊ शकते. |
| **गोलकनाथ खटला (१९६७)** | ❍ सर्वोच्च न्यायालयाने असा नियम दिला की:<br>❍ मूलभूत हक्क हे "अलौकिक आणि अपरिवर्तनीय" आहेत.<br>❍ संसद मूलभूत हक्क हिरावून घेऊ शकत नाही किंवा कमी करू शकत नाही.<br>❍ या खटल्याने शंकरी प्रसाद खटल्याचा निर्णय बदलला. |
| **२४ वी घटनादुरुस्ती कायदा, १९७१** | ❍ संसदेला संविधानाच्या कोणत्याही भागात (मूलभूत हक्कांसह) सुधारणा करण्याचा अधिकार स्पष्टपणे दिला.<br>❍ कलम ३६८ अंतर्गत ही सुधारणा करण्यात आली. |
| **केशवानंद भारती खटला (१९७३)** | ❍ गोलकनाथ खटल्याचा निकाल रद्द केला.<br>❍ २४ व्या घटनादुरुस्तीला वैध ठरवले.<br>❍ 'मूलभूत संरचनेचा सिद्धांत' (Doctrine of Basic Structure) मांडला.<br>❍ संसद संविधानात सुधारणा करू शकते, परंतु 'मूलभूत संरचनेस' धक्का लावू शकत नाही. |
| **४२ वी घटनादुरुस्ती कायदा, १९७६** | ❍ कलम ३६८ मध्ये सुधारणा केली.<br>❍ संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकारावरील सर्व मर्यादा काढून टाकण्याचा प्रयत्न केला.<br>❍ असे नमूद केले की घटनादुरुस्तीला न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकत नाही. |
| **मिनर्व्हा मिल्स खटला (१९८०)** | ❍ सर्वोच्च न्यायालयाने ४२ व्या घटनादुरुस्तीचा 'मर्यादा काढून टाकण्याचा' प्रयत्न रद्द केला.<br>❍ असे निकाल दिले की:<br>❍ 'न्यायालयीन पुनर्विलोकन' (Judicial Review) हा मूलभूत संरचनेचा भाग आहे.<br>❍ मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे (DPSP) यांच्यातील संतुलन हा मूलभूत संरचनेचा भाग आहे. |

## 'मूलभूत संरचना' म्हणजे काय? (WHAT IS BASIC STRUCTURE?)

❍ (संविधानात व्याख्या केलेली नाही; न्यायमंडळाद्वारे उत्क्रांत संकल्पना)

**मुख्य घटक (Core Elements):**

1. संविधानाचे सर्वोच्चत्व: संविधान हा देशाचा सर्वोच्च कायदा आहे.
2. सार्वभौम, लोकशाही आणि प्रजासत्ताक स्वरूप: भारतीय राज्यव्यवस्थेचे हे मूळ स्वरूप बदलता येणार नाही.
3. संविधानाचे निधर्मी (Secular) स्वरूप: राज्य कोणत्याही एका धर्माला झुकते माप देणार नाही.
4. अधिकारांचे विभाजन: विधिमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्यातील अधिकारांची विभागणी.
5. संघराज्यात्मक स्वरूप (Federal character): केंद्र आणि राज्यांमधील अधिकारांचे वाटप.

6. राष्ट्राची एकता आणि अखंडता: देशाची एकता टिकवून ठेवणे.
7. कल्याणकारी राज्य: सामाजिक-आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट.
8. न्यायालयीन पुनरावलोकन (Judicial review): संसदेने केलेल्या कायद्यांची घटनात्मकता तपासण्याचा न्यायालयाचा अधिकार.
9. व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा: प्रत्येक नागरिकाचे स्वातंत्र्य आणि सन्मान राखणे.
10. संसदीय प्रणाली: लोकशाहीची संसदीय शासन पद्धती.
11. कायद्याचे राज्य (Rule of law): कोणाही व्यक्तीपेक्षा कायदा श्रेष्ठ असणे.
12. मूलभूत अधिकार: नागरिकांना दिलेले अत्यावश्यक अधिकार.

2014

77. खालीलपैकी कोणत्या खटल्याचा परिणाम म्हणून संसदेने 24 वी घटना दुरुस्ती कायदा संमत केला ?

(1) गोलकनाथ खटला (2) मिनर्व्हा मिल्स खटला
(3) केशवानंद भारती खटला (4) शंकरी प्रसाद खटला

Which one of the following cases prompted the Parliament to enact 24th Constitutional Amendment Act ?

(1) Golaknath case (2) Minerva Mills case
(3) Kesavananda Bharati case (4) Shankari Prasad case

2015

80. भारतीय राज्यघटनेच्या 'मूलभूत चौकटीच्या' तत्त्वातून _______ व्यक्त होते.

(1) राज्यघटनेची काही वैशिष्ट्ये अत्यंत आवश्यक असतात की जी केंव्हाच रद्द करता येत नाहीत
(2) मूलभूत अधिकार संक्षिप्त करता येत नाहीत अथवा हिरावून घेता येत नाहीत
(3) अनुच्छेद 368 मध्ये नमूद केलेल्या घटनादुरुस्तीच्या पद्धती व्यतिरिक्त अन्य मार्गाने राज्यघटनेत बदल करता येवू शकत नाही
(4) सरनाम्यामध्ये बदल केला जावू शकत नाही कारण तो राज्यघटनेचा भाग असत नाही

The 'basic structure' theory of the Constitution of India is implied from

(1) certain features of the Constitution are so essential to it that they cannot be abrogated.
(2) fundamental rights cannot be abridged or taken away.
(3) the Constitution cannot be amended except in accordance with the procedure prescribed in Article 368.
(4) the Preamble cannot be amended for it is not a part of the Constitution.

## 2020

72. खालील विधाने विचारात घ्या आणि **योग्य** पर्याय निवडा.

(a) भारतात, घटना दुरुस्ती विधेयक केवळ राष्ट्रपतींच्या पूर्व-परवानगीने संसदेमध्ये मांडले जावू शकते.
(b) अमेरिकेत प्रत्येक घटना दुरुस्तीस किमान दोन-तृतीयांश घटक राज्यांच्या विधिमंडळाद्वारे मान्यता मिळणे आवश्यक असते.
(c) स्विझर्लंड मध्ये राज्यघटनेमध्ये केलेला बदल सार्वमताचा अवलंब केल्याशिवाय अंमलात येवू शकत नाही.
(d) ऑस्ट्रेलियात, राज्यघटनेमध्ये बदल केवळ दोन्ही सभागृहांनी पूर्ण बहुमताने केलेल्या कायद्याद्वारे करता येतो.

पर्यायी उत्तरे :

(1) (a), (b), (c)
(2) (b), (c), (d)
(3) फक्त (a) आणि (b)
(4) फक्त (c) आणि (d)

Consider the following statements and choose the **correct** code.

(a) In India, a constitutional amendment bill can be introduced in the Parliament only with the prior permission of the President.
(b) In U.S.A., every constitutional amendment must be ratified by at least two-thirds of the state legislature.
(c) In Switzerland, no alteration of the constitution can be effected without resorting to a referendum.
(d) In Australia, the constitution can be altered only by an Act passed by an absolute majority in both houses.

**Answer Options :**

(1) (a), (b), (c)
(2) (b), (c), (d)
(3) Only (a) and (b)
(4) Only (c) and (d)

## 2024

73. 'केशवानंद भारती' खटल्याबाबत खालील विधाने विचारात घ्या :

(A) सदरहू खटला हा भारताचे सरन्यायाधीश अे.एन. रे यांच्या नेतृत्वाखाली 13 न्यायमूर्तींच्या घटनापीठापुढे चालला.
(B) सात विरुद्ध सहा न्यायमूर्तींच्या बहुमताने घटनापीठाने मूलभूत संरचना सिद्धांताची (Basic Structure Doctrine) रूपरेषा दिली.
(C) या खटल्याने 'गोलखनाथ' प्रकरणातील निर्णय बदलला गेला.
(D) सदरहू खटला हा न्यायालयीन सक्रीयतेचे उदाहरण म्हणावे लागेल.

वरीलपैकी कोणती विधाने **बिनचूक** आहे/त ?

(1) (A), (B) आणि (C)
(2) (B), (C) आणि (D)
(3) केवळ (B)
(4) (A), (B), (C) आणि (D)

Consider the following statements regarding 'Kesavanand Bharati' Case :

(A) This case was heard by the Constitution Bench of 13 judges headed by Chief Justice of India A.N. Ray.
(B) In Seven - Six majority, the bench outlined the basic structure doctrine.
(C) This case changed the decision of Golaknath case.
(D) This case seems to be the instance of judicial activism.

Which of the statements given above is/are **correct** ?

(1) (A), (B) and (C)
(2) (B), (C) and (D)
(3) (B) Only
(4) (A), (B), (C) and (D)

## 2018

**57.** **खालीलपैकी कोणत्या प्रकरणात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेत संसदेला बदल करता येणार नाही असा निर्णय दिला ?**

**(1) शंकरी प्रसाद विरूद्ध भारत सरकार**
**(2) गोलकनाथ विरूद्ध पंजाब राज्य**
**(3) केशवानंद भारती विरूद्ध केरळ राज्य**
**(4) मिनर्व्हा मिल्स् लि. विरूद्ध भारत सरकार**

**In which of the following cases did the Supreme Court of India pronounce the verdict that the basic structure of the Constitution cannot be amended by the Parliament ?**

**(1) Shankari Prasad vs Union of India**
**(2) Golaknath vs State of Punjab**
**(3) Kesavananda Bharti vs State of Kerala**
**(4) Minerva Mills Ltd. vs Union of India**

CHAPTER 11

# संविधानाची दुरुस्ती (AMENDMENT OF THE CONSTITUTION)

## संविधानाची दुरुस्ती (AMENDMENT OF THE CONSTITUTION) (कलम ३६८ | भाग XX)

### मुख्य वैशिष्ट्ये (Core Features)

- कलम ३६८: हे संविधानात दुरुस्ती करण्याच्या संसदेच्या अधिकारांशी आणि प्रक्रियेशी संबंधित आहे.
- भारतीय संविधान हे ताठर (Rigid) किंवा लवचिक (Flexible) दोन्हीही नाही → तर ते या दोन्हीचा समन्वय आहे.
- संसद संविधानाच्या "मूलभूत संरचेत" (Basic Structure) बदल करू शकत नाही.
  - → केशवानंद भारती खटला (१९७३).

### Procedure under Article 368:

| | |
|---|---|
| १. मांडणे (Initiation) | विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडले जाऊ शकते.<br>मंत्री किंवा खाजगी सदस्याद्वारे मांडले जाऊ शकते.<br>राष्ट्रपतींच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता नसते. |
| २. संमत करणे (Passing) | विशेष बहुमताने (Special Majority) संमत होणे आवश्यक आहे:<br>सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या ५०% पेक्षा जास्त आणि<br>हजर राहून मतदान करणाऱ्या सदस्यांच्या २/३ पेक्षा जास्त बहुमत. |
| ३. राज्यांची मंजुरी (जिथे आवश्यक असेल) | फेडरल (संघराज्य) तरतुदी → किमान १/२ राज्य विधिमंडळांची मंजुरी आवश्यक असते.<br>साध्या बहुमताने मंजुरी.<br>राज्यांनी संमती देण्यासाठी कोणतीही कालमर्यादा नाही. |
| ४. राष्ट्रपतींची संमती (President's Assent) | २४ व्या घटनादुरुस्ती कायद्याने राष्ट्रपतींची संमती अनिवार्य केली आहे.<br>राष्ट्रपतींनी संमती दिलीच पाहिजे (नकार देण्याचा अधिकार नाही). |

### घटनेत सुधारणा करण्याचे तीन मार्ग THREE WAYS OF AMENDING THE CONSTITUTION

| | |
|---|---|
| A. संसदेचे साधे बहुमत (कलम ३६८ च्या बाहेर) | यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो:<br>नवीन राज्यांची निर्मिती<br>राज्यांची नावे, क्षेत्रफळ किंवा सीमा यामध्ये बदल करणे<br>विधानपरिषदेची निर्मिती किंवा ती रद्द करणे<br>दुसरी अनुसूची<br>नागरिकत्व<br>अधिकृत भाषा<br>५ वी आणि ६ वी अनुसूची<br>सर्वोच्च न्यायालयाला अधिक अधिकारक्षेत्र प्रदान करणे<br>संसदेचे विशेषाधिकार<br>सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या |
| B. संसदेचे विशेष बहुमत(केवळ कलम ३६८ अंतर्गत) | हे खालील बाबतीत लागू होते:<br>■ मूलभूत हक्क<br>■ राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे (DPSP)<br>■ 'A' किंवा 'C' मध्ये न येणाऱ्या इतर सर्व तरतुदी |

| | |
|---|---|
| **C. विशेष बहुमत + राज्यांची मंजुरी (संघराज्यीय तरतुदी)** | ❍ हे संघराज्य संरचेशी संबंधित आहे, जसे की:<br>■ राष्ट्रपतींची निवडणूक<br>■ केंद्र आणि राज्यांच्या कार्यकारी अधिकारांची व्याप्ती<br>■ सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये<br>■ विधायी अधिकारांचे वाटप<br>■ GST परिषद (GST Council)<br>■ सातवी अनुसूची |
| | ■ संसदेत राज्यांचे प्रतिनिधित्व<br>■ खुद्द कलम ३६८ (घटनादुरुस्तीचा अधिकार आणि प्रक्रिया) |

2016

**74.** खालील विधानांपैकी कोणते विधान बरोबर *नाही* ?

अ. घटनादुरुस्ती विधेयक हे एखाद्या मंत्र्याकडून अथवा खाजगी सभासदाकडून मांडले जावू शकते आणि त्यासाठी राष्ट्रपतीच्या पुर्व परवानगीची गरज नसते.

ब. घटनादुरुस्ती विधेयकाला राज्यांनी किती कालावधीमध्ये संमती द्यावी याबाबत त्यांच्यावर बंधन नाही.

(1) फक्त अ

(2) फक्त ब

(3) दोन्ही अ आणि ब

(4) वरीलपैकी एकही नाही

Which one of the following statements is ***not*** correct ?

a. The Amendment bill can be introduced either by a minister or by a private member and does not require prior permission of the President.

b. There is no time limit within which the States should give their consent to the Amendment bill.

(1) Only a

(2) Only b

(3) Both a and b

(4) None of the above

## 2017

**75.** 108 व्या घटनादुरूस्ती विधेयकाबाबत खालील विधाने विचारात घ्या :

अ. ते लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभे मध्ये महिलांसाठी एकतृतीयांश राखीव जागेसंबंधी होते.

ब. राज्यसभेने ते विधेयक 9 मार्च, 2010 रोजी मंजूर केले होते.

क. लोकसभेने विधेयकावर कधीच मतदान केले नाही.

ड. 15 व्या लोकसभेच्या विसर्जनानंतर ते रद्द झाले.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

(1) फक्त अ, ब आणि ड

(2) फक्त ब, क आणि ड

(3) फक्त अ, ब आणि क

(4) अ, ब, क आणि ड

Consider the following statements about the $108^{th}$ Constitutional Amendment Bill :

a. It related to reservation of one-third seats in Lok Sabha and State Legislative Assemblies for women.

b. Rajya Sabha passed the Bill on $9^{th}$ March, 2010.

c. Lok Sabha never voted on the Bill.

d. It was lapsed after the dissolution of the $15^{th}$ Lok Sabha.

Which of the statements given above are correct ?

(1) Only a, b and d

(2) Only b, c and d

(3) Only a, b and c

(4) a, b, c and d

## 2022

**61.** 44वी घटनादुरुस्ती अधिनियम 1978 द्वारे खालीलपैकी कोणत्या तरतूदी करण्यांत आल्या आहेत ?

(a) अखिल भारतीय न्यायिक सेवा निर्माण करण्याबाबत तरतूद करण्यांत आली.

(b) मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला एकदा पुनर्विचारार्थ परत पाठविण्याचा राष्ट्रपतीस अधिकार देण्यांत आला.

(c) राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात अनुच्छेद 20 आणि अनुच्छेद 21 अन्वये हमी दिलेले मूलभूत अधिकार निलंबित करता येणार नाहीत अशी तरतूद करण्यांत आली.

(d) राज्यसूचीतील पाच विषय समवर्ती सुचीत हलविण्यात आले.

पर्यायी उत्तरे :

(1) (a), (b) आणि (c)

(2) (a), (b) आणि (d)

(3) फक्त (c) आणि (d)

(4) फक्त (b) आणि (c)

Which of the following provisions were made by the $44^{th}$ Amendment Act of 1978 ?

(a) Provided for the creation of the All India Judicial Service.

(b) Empowered the President to send back once, the advice of the Cabinet for reconsideration.

(c) Provided that the Fundamental Rights guaranteed by Article 20 and Article 21 cannot be suspended during the National Emergency.

(d) Shifted five subjects from the State list to the Concurrent list.

**Answer Options :**

(1) (a), (b) and (c)

(2) (a), (b) and (d)

(3) Only (c) and (d)

(4) Only (b) and (c)

a. If a person is elected to both the Houses of Parliament, he must intimate within 10 days in which House he desires to serve, otherwise both seats become vacant.

b. If a person is elected to two seats in a House he should exercise his option for one, otherwise both seats become vacant.

c. If a sitting member of one House is also elected to the other House, his seat in the first House becomes vacant.

Which of the above statements is/are ***not*** correct ?

(1) Only a and b (2) Only b and c

(3) Only a (4) Only c

2016 →

Speaker | Chairman

**73.** जर लोकसभेचे सभापती आणि उपसभापती दोघेही उपस्थित नसतील, तर संसदेच्या संयुक्त बैठकीच्या अध्यक्षस्थानी कोण असतात ?

(1) राज्यसभेचे अध्यक्ष

(2) राज्यसभेचे उपाध्यक्ष

(3) लोकसभेचे सर्वात ज्येष्ठ सभासद

(4) राष्ट्रपतींकडून नामनिर्देशित सभासद

Who presides over a joint sitting of the Parliament if neither the Speaker nor the Deputy Speaker of Lok Sabha is available ?

(1) Chairman of Rajya Sabha

(2) Deputy Chairman of Rajya Sabha

(3) Seniormost member of Lok Sabha

(4) A member nominated by the President

50 सह्या + 14 दिवस + Special Majority.

Pleasure नाही तर - Resolution

2021 Speaker

85. लोकसभेच्या अध्यक्षांच्या संदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

(a) राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत ते आपल्या पदावर राहू शकतात.

(b) त्यांच्या निवडीवेळी ते सभागृहाचे सदस्य असणे बंधनकारक नाही. → bcz लोकसभेत Nominated members नाहीत.

(c) ते संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनाचे अध्यक्षस्थान भूषवतात.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) (a) आणि (b) (3) फक्त (c) (4) (b) आणि (c)

Consider the following statements regarding with speaker of Lok Sabha :

(a) He hold office during the pleasure of the President.

(b) He need not be a member of the House at the time of his election.

(c) He Presides over a joint sitting of the two houses of Parliament.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) Only (a) (2) (a) and (b) (3) Only (c) (4) (b) and (c)

Nominated by Speaker.

2022 Speaker

**70.** खालील विधाने विचारात घ्या :

(a) लोकसभेच्या प्रमुखांच्या गटाची (panel of Chairpersons) निवड लोकसभा आपल्या सदस्यांमधून करते.

(b) जेंव्हा लोकसभेच्या अध्यक्षांचे अथवा उपाध्यक्षांचे पद रिक्त असेल तेव्हा लोकसभेच्या प्रमुखांच्या गटातील सदस्य हा अध्यक्षपदी असू शकतो.

(c) अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि लोकसभेच्या प्रमुखांच्या गटातील व्यक्ति यांच्या अनुपस्थितीत राष्ट्रपतीद्वारे नियुक्त केलेल्या सदस्याद्वारे अध्यक्षांची कर्तव्ये पार पाडली जातात.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहे/आहेत ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) आणि (c) (4) वरीलपैकी एकही नाही

Consider the following statements :

(a) A panel of Chairpersons is elected by the Lok Sabha from amongst its members. ✓

(b) A member of the panel of Chairpersons can preside over the Lok Sabha when the office of the Speaker or the Deputy Speaker is vacant. ✓

(c) In absence of the Speaker, the Deputy Speaker and member of the panel of Chairpersons, the Speaker's duties are to be performed by a member appointed by the President. ✓

Which of the statements given above is/are correct ?

(1) Only (a) (2) Only (b) (3) (a) and (c) (4) None of the above

## Speaker - 2020

**73.** लोकसभेच्या सभापतीच्या स्थानासंबंधी खालील विधाने विचारात घ्या.

(a) त्याचे/तिचे वेतन आणि भत्ते भारताच्या संचित निधीवर भारित केले जाते.

(b) त्यास/तिला समान मत विभागणी शिवाय मत देता येत नाही.

(c) त्यास/तिला सभागृहात हजर राहून मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने पारित केलेल्या ठरावाद्वारे पदावरुन दूर करता येते.

(d) त्याचे/तिचे स्थान उप-पंतप्रधानापेक्षा वरचे आहे.

वरील विधानांपैकी कोणती **बरोबर** आहेत ?

(1) (a), (b), (c) (2) (b), (c), (d) (3) (a) आणि (b) (4) वरील सर्व

Consider the following statements regarding the position of the Speaker of Lok Sabha.

(a) His/her salary and allowances are charged on the Consolidated Fund of India.

(b) He/she has no vote except in case of a tie.

(c) He/she can be removed by a resolution passed by a majority of the members present and voting in the house.

(d) He/she has a higher rank than Deputy Prime Minister.

Which of the above statements are **correct** ?

(1) (a), (b), (c) (2) (b), (c), (d) (3) (a) and (b) (4) All above

## 2020

71. मंत्रिमंडळ सचिवालयाच्या (Cabinet Secretariat) संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने **सत्य** आहेत ?

(a) ते इ.स. 1950 मध्ये स्थापन करण्यात आले.

(b) ते पंतप्रधानांच्या मार्गदर्शनाखाली काम करते.

(c) ते रेषा संघटन (Line agency) आहे.

(d) ते केन्द्र सरकारमध्ये मुख्य समन्वयक म्हणून कार्य करते.

पर्यायी उत्तरे :

(1) (a) आणि (b) (2) (a), (b) आणि (c)

(3) (b) आणि (d) (4) (a), (c) आणि (d)

Which of the following statements are **true** about the Cabinet Secretariat ?

(a) It came into existence in 1950.

(b) It operates under the direction of Prime Minister.

(c) It is a Line agency.

(d) It functions as the Chief coordinating agency in the Central Government.

**Answer Options :**

(1) (a) and (b) (2) (a), (b) and (c)

(3) (b) and (d) (4) (a), (c) and (d)

## 2014

**92.** अतारांकित प्रश्नाचे उत्तर किती काळात देण्याची सर्वसाधारणपणे शासनास मुभा असते ?

(1) आठवड्यात (2) पंधरवड्यात

(3) महिन्यात (4) तीन महिन्यात

Within what period is the Government entitled to reply an unstarred question generally ?

(1) Within a week (2) Within fifteen days

(3) Within a month (4) Within three months

2020 Motion → Adjournment motion

74. खालीलपैकी कोणत्या जोड्या योग्य रितीने जुळत **नाहीत** ?

(a) लक्षवेधी सूचना - तातडीच्या, सार्वजनिक दृष्ट्या महत्वाच्या बाबीकडे मंत्र्याचे लक्ष वेधणे

(b) स्थगन प्रस्ताव → UMPI - सभागृह मुदत (वेळ) संपण्यापुर्वी स्थगित करणे.

(c) हक्कभंग प्रस्ताव - सभागृहाची कार्यवाही जेंव्हा कामकाज पद्धतीच्या नियमानुसार चालत नसेल तेंव्हा त्याकडे सभापतीचे लक्ष वेधणे.

(d) हरकतीचा मुद्दा - मंत्र्यांनी दिलेल्या चुकीच्या/अपूर्ण उत्तराकडे सभापतीचे लक्ष वेधणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) (2) (a), (c) (3) (b), (c), (d) (4) (a), (d)

Which of the following pairs are **not correctly** matched ?

(a) Calling attention Motion - To draw attention of the Minister on matters of urgent public importance.

(b) Adjournment Motion - To adjourn the House before the expiry of the time.

(c) Privilege Motion - To draw attention of the Speaker towards when the proceedings of the House do not follow rules of procedure.

(d) Point of Order - To draw attention of the Speaker towards incorrect/incomplete answer by a Minister.

**Answer Options :**

(1) (a), (b) (2) (a), (c) (3) (b), (c), (d) (4) (a), (d)

H

2015 = Motion

72. संसदेबाबत खालील विधाने विचारात घ्या : → facts → एकतर तुम्हाला माहित असेल किंवा नाही.

अ. लक्षवेधी सूचनेची सर्वप्रथम तरतुद सन 1954 मध्ये करण्यांत आली.

ब. लक्षवेधी संबंधी सूचना सदस्याद्वारे लिखित स्वरूपात सकाळी 10.00 पर्यंत द्यावी लागते. 72(3)

क. एका बैठकीसाठी सभासद एकापेक्षा जास्त लक्षवेधी सूचना देवू शकत नाही.

वरीलपैकी कोणते विधान ***चूकीचे*** आहे ?

(1) अ (2) ब

(3) क (4) कोणतेही नाही

Consider the following statements regarding the Parliament :

a. The provision for the Calling Attention Notices was first made in the year 1954.

b. Notices of Calling Attention have to be given by members in writing by 10.00 am.

c. A member can give not more than one Calling Attention Notice for any one sitting.

Which of the above statements is ***not*** correct ?

(1) a (2) b

(3) c (4) None of the above

2019 → Motion

**30.** खालीलपैकी कोणते/ती विधान/ने ***चूकीचे*** आहे/त ?

अ. लोकसभेत अविश्वास ठराव कोणत्या कारणांवर आधारित आहे, हे स्पष्ट करावे लागते.

ब. लोकसभेत अविश्वास ठराव दाखल करुन घेण्यासंबंधीची पद्धती ही लोकसभेच्या नियम 198 मध्ये सांगितली आहे.

क. अविश्वास ठराव एकदा दाखल झाल्यावर तो दाखल करण्यास मंजूरी मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत चर्चेस घेतला गेला पाहिजे.

ड. इटली मध्ये सरकारला संसदेच्या दोन्हीही सभागृहांच्या पाठिंब्या ची गरज असते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ (2) फक्त क (3) ब आणि क (4) अ आणि ड

Which one of the following statements is/are ***not*** correct ?

a. In Lok Sabha, a no-confidence motion has to set out the grounds on which it is based.

b. In the case of a no-confidence motion in Lok Sabha procedures of admissibility have been laid down in Rule 198 of Lok Sabha.

c. A motion of no-confidence once admitted has to be taken up within ten days of the leave being granted.

d. In Italy, the government requires the support of both houses of Parliament.

**Answer Options :**

(1) Only a (2) Only c (3) b and c (4) a and d

2018 → Processes

**63.** शून्य प्रहरा च्या संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने अचूक आहेत ?

अ. संसदीय कार्यपद्धतीमध्ये शून्य प्रहर ही नाविन्यपूर्ण संकल्पना भारतामध्ये उदयास आली.

ब. प्रश्नोत्तराचा तास आणि सभागृहाचे कामकाज यांच्या मधल्या काळाला शून्य प्रहर म्हणतात.

क. ही संकल्पना 1962 पासून प्रत्यक्षात आली.

ड. शून्य प्रहर हे संसद सदस्यांना उपलब्ध असलेले अनौपचारिक स्वरूपाचे माध्यम आहे.

(1) अ, ब आणि क (2) अ, क आणि ड

(3) ब आणि क (4) वरील सर्व

Which of the following statements regarding Zero Hour are correct ?

a. Zero Hour is an Indian innovation in the field of Parliamentary Procedure.

b. The time gap between the question hour and the agenda of house is known as Zero Hour.

c. This device has been in existence since 1962.

d. It is an informal device available to the members of the Parliament.

(1) a, b and c (2) a, c and d

(3) b and c (4) All of the above

H 2023 ↓ proceedings

**83.** लोकसभेच्या 'शून्य प्रहर' (Zero Hour) संदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

अ. प्रश्नोत्तराच्या तासानंतर आणि कागदपत्रे ठेवण्याआधीची वेळ आणि सभागृहात कोणतेही सूचीबद्ध कामकाज सुरू होण्यापूर्वीची वेळ 'शून्य प्रहर' म्हणून ओळखली जाते.

ब. शून्य प्रहर दरम्यान मुद्दे मांडण्यासाठी, सदस्य दररोज सकाळी 8.00 ते 9.30 या वेळेत सभापतीस सूचना देतात.

क. सध्या, शून्य तासादरम्यान प्राधान्य क्रमानुसार दररोज तीस प्रकरणे (मुद्दे) मांडण्याची परवानगी आहे.

ड. शून्य तासाबाबत नियमात कोणतीही तरतूद नसल्याने, कोणत्याही दिवशी किती प्रकरणे मांडता येतील यावर कमाल मर्यादा नाही.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

(1) अ आणि ब (2) अ, ब आणि ड (3) ब, क आणि ड (4) अ आणि ड

Consider the following statements regarding 'Zero Hour' of Lok Sabha :

A. The time immediately following the question hour and laying of papers and before any listed business is taken up in the house has come to be known as the zero hour.

B. For raising matters during the zero hour members has to give notice between 8.00 a.m. to 9.30 a.m. everyday to the Speaker.

C. At present, thirty matters per day as per their priority are allowed to be raised during zero hour.

D. There is no maximum limit on the number of matters that can be raised on any given day as there is no provision in rules about Zero Hour.

Which of the statements given above are correct ?

(1) A and B (2) A, B and D (3) B, C and D (4) A and D

2024 ↓ fund - CFF

74. भारताचा आकस्मिक निधी खालीलपैकी कोणाच्या अधिकाराखाली ठेवण्यात आला आहे ?

(1) भारताचे नियंत्रक आणि महालेखा परिक्षक

(2) भारताचे राष्ट्रपती

(3) भारताची संसद

(4) भारताचे पंतप्रधान

The Contingency Fund of India has been placed at the disposal of which authority among the following ?

(1) Comptroller and Auditor General of India

(2) President of India

(3) Parliament of India

(4) Prime Minister of India

P. cannot = increase the tax. But can reduce or abolish it.
Tax can levied or collected only by authority of law.

2018 Tax

**62.** खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

अ. संसद कर वाढवू शकते.
ब. संसद कर कमी करु शकत नाही.
क. संसद कर रद्द करु शकते.
ड. संसद कर वाढवू शकत नाही.
ई. संसद कर कमी करू शकते.

(1) अ, क आणि ई (2) ब, क आणि ड
(3) क, ड आणि ई (4) क आणि ड

Which of the following statements are correct ?

a. Parliament can increase a tax.
b. Parliament cannot reduce a tax.
c. Parliament can abolish a tax.
d. Parliament cannot increase a tax.
e. Parliament can reduce a tax.

(1) a, c and e (2) b, c and d
(3) c, d and e (4) c and d

62(3)

Bills – 2014

**79.** खालील विधाने पहा :

(a) लोकसभेमध्ये पारित न झालेले, परंतू राज्यसभेत प्रलंबित असलेले विधेयक, लोकसभा विसर्जित झाल्यास व्यपगत होते.

(b) सदने संस्थगित झाल्यास संसदेतील प्रलंबित विधेयके व्यपगत होतात.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) (a) नाही आणि (b) सुद्धा नाही
(3) (a) आणि (b) दोन्ही (4) फक्त (b)

Consider the following statements :

(a) Bill pending in the Rajya Sabha which has not been passed by the Lok Sabha shall lapse on dissolution of the Lok Sabha.

(b) A Bill pending in Parliament shall lapse by reason of Prorogation of the houses.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) Only (a) (2) Neither (a) nor (b)
(3) Both (a) and (b) (4) Only (b)

2020 - Finance. - Bill

**82.** खालीलपैकी कोणते विधान/ने **योग्य** आहे/त?

(a) राज्यघटनेचे अनुच्छेद-111 हे अर्थ विधेयकांच्या (money bills) व्याख्येच्या संदर्भात आहे. ✗

(b) अनुच्छेद-117(3) खाली श्रेणीबद्ध झालेले वित्त विधेयक (financial bill) हे केवळ लोकसभेमध्येच मांडले जावू शकते. ✗

(c) अनुच्छेद-117(1) खाली श्रेणीबद्ध झालेले वित्त विधेयक (financial bill) राज्यसभा असंमत अथवा दुरुस्त करू शकत नाही. ✗

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a)
(2) (b) आणि (c)
(3) वरीलपैकी एकही नाही
(4) फक्त (c)

Which of the following statements is/are **correct** ?

(a) Article-111 of the constitution deals with the definition of money bills.

(b) A bill categorised as financial bill under Article-117(3) can be introduced only in the Lok Sabha.

(c) A bill categorised as financial bill under Article-117(1) cannot be rejected or amended by the Rajya Sabha.

**Answer Options :**

(1) Only (a)
(2) (b) and (c)
(3) None of the above
(4) Only (c)

**62.** खालीलपैकी कोणत्या समित्यांमध्ये संसदेच्या दोन्हीही सभागृहांच्या प्रतिनिधींचा समावेश असतो ?

2022

(a) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या कल्याणासाठी समिती
(b) महिला सबलीकरण समिती
(c) कामकाज सल्लागार समिती
(d) विशेषाधिकार समिती
(e) अंदाज समिती

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) आणि (d)
(2) फक्त (b) आणि (c)
(3) (c), (d) आणि (e)
(4) फक्त (a) आणि (b)

Which of the following committees contains representatives of both the Houses of the Parliament ?

(a) Committee on Welfare of Scheduled Castes and Scheduled Tribes
(b) Committee on Empowerment of Women
(c) Business Advisory Committee
(d) Committee on Privileges
(e) Estimates Committee

**Answer Options :**

(1) (a), (b) and (d)
(2) Only (b) and (c)
(3) (c), (d) and (e)
(4) Only (a) and (b)

2020

**80.** 'विशेषाधिकार समिती' संदर्भात खालीलपैकी कोणते विधान **बरोबर नाही** ?

(1) लोकसभेचा नियम-222 आणि राज्यसभेचा नियम-187 हे विशेषाधिकारासंबंधी आहेत.

(2) लोकसभेत 15 सदस्य असलेली विशेषाधिकार समिती ही सभापती नामनिर्देशित करतात 10

(3) राज्यसभेत उपाध्यक्ष हेच विशेषाधिकार समितीचे प्रमुख असतात ज्या समितीत 15 सदस्य असतात.

(4) वरीलपैकी एकही नाही.

Which one of the following statements about 'Privilege Committee' is **not correct** ?

(1) Rule No. 222 of the Lok Sabha and 187 of the Rajya Sabha governs privilege.

(2) In the Lok Sabha, the Speaker nominates a Committee of Privileges consisting of 15 members.

(3) In the Rajya Sabha, the Deputy Chairperson heads the Committee of Privileges, that consists of 15 members.

(4) None of the above.

## राज्य विधिमंडळ (State Legislature)

### मूलभूत तथ्ये (Basic Facts)

- भारतात २८ राज्ये + ८ केंद्रशासित प्रदेश आहेत.
- केवळ ६ राज्यांमध्ये द्विगृही (Bicameral) विधिमंडळ आहे:
  - आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार.

### विधान परिषद निर्माण करणे / बरखास्त करणे – कलम १६९ (Art. 169)

- संसद एखाद्या राज्याची विधान परिषद निर्माण करू शकते किंवा बरखास्त करू शकते.
- अट: राज्याच्या विधानसभेने तसा ठराव संमत करणे आवश्यक आहे.
- विधानसभेत विशेष बहुमत आवश्यक आहे:
  - एकूण सदस्य संख्येचे बहुमत आणि उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या २/३ बहुमत.
- त्यानंतर संसद साध्या बहुमताने कायदा संमत करते.
- ही घटनादुरुस्ती मानली जात नाही (कलम ३६८ लागू होत नाही).

### राज्य विधिमंडळाची रचना (Composition)

- राज्यपाल + राज्य विधिमंडळ.
- विधिमंडळ खालीलप्रमाणे असू शकते:
  - एकगृही (Unicameral): केवळ विधानसभा.
  - द्विगृही (Bicameral): विधानसभा + विधान परिषद.

| विधानसभा (Vidhan Sabha) | विधान परिषद (Vidhan Parishad) |
|---|---|
| ❍ सदस्य जनतेद्वारे थेट निवडले जातात (प्रौढ मताधिकार).<br>❍ कमाल सदस्य संख्या: ५००.<br>❍ किमान सदस्य संख्या: ६०.<br>❍ अपवाद: अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, गोवा किमान ३०.<br>❍ लोकसंख्येच्या प्रमाणानुसार SC/ST साठी आरक्षण. | ❍ सदस्य अप्रत्यक्षपणे निवडले जातात.<br>❍ कमाल सदस्य संख्या: विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या १/३.<br>❍ किमान सदस्य संख्या: ४०.<br>❍ प्रत्यक्ष सदस्य संख्या संसदेद्वारे निश्चित केली जाते.<br>❍ विधान परिषदेची रचना (Composition): |

| विधानसभा (Vidhan Sabha) | विधान परिषद (Vidhan Parishad) |
|---|---|
| ❍ अँग्लो-इंडियन सदस्य (माहिती):<br>❍ राज्यपाल १ अँग्लो-इंडियन सदस्याचे नामनिर्देशन करू शकत होते (९५ वी घटनादुरुस्ती, २०२० पर्यंत वैध).<br>❍ १०४ व्या घटनादुरुस्तीद्वारे ही तरतूद रद्द करण्यात आली आहे.<br>❍ विधानसभा हे तात्पुरते सभागृह आहे. | ❍ १/३ स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडले जातात.<br>❍ १/१२ पदवीधरांद्वारे निवडले जातात (३ वर्षे पदवी पूर्ण, राज्याचे रहिवासी).<br>❍ १/१२ शिक्षकांद्वारे निवडले जातात (किमान माध्यमिक शाळा, ३ वर्षे अनुभव).<br>❍ १/३ आमदारांद्वारे (MLAs) निवडले जातात (जे स्वतः विधानसभेचे सदस्य नाहीत अशांमधून).<br>❍ १/६ राज्यपालांद्वारे नामनिर्देशित केले जातात.<br>❍ विधान परिषद हे कायमस्वरूपी सभागृह आहे. |

## ■ गणसंख्या (Quorum)

- ❍ नियम: सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या १/१० किंवा १० सदस्य, यापैकी जे जास्त असेल ते.

| विधानसभा (Vidhan Sabha) | विधान परिषद (Vidhan Parishad) |
|---|---|
| ❍ सामान्य कार्यकाळ: सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या पहिल्या बैठकीपासून ५ वर्षे.<br>❍ राज्यपाल ५ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी कधीही विधानसभा विसर्जित करू शकतात.<br>❍ कार्यकाळ वाढवणे: राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात, संसद विधानसभेचा कार्यकाळ वाढवू शकते.<br>■ एका वेळी १ वर्षासाठी कार्यकाळ वाढवता येतो.<br>■ हा विस्तार कितीही काळासाठी असू शकतो, परंतु आणीबाणी संपल्यानंतर तो ६ महिन्यांपेक्षा जास्त असू शकत नाही. | ❍ कायमस्वरूपी सभागृह: याचे विसर्जन होत नाही.<br>❍ दर दोन वर्षांनी १/३ सदस्य निवृत्त होतात.<br>❍ सदस्यांचा कार्यकाळ ६ वर्षे असतो.<br>❍ निवृत्त होणारे सदस्य कितीही वेळा पुनर्निवडणुकीसाठी किंवा नामनिर्देशनासाठी पात्र असतात. |

## ■ पीठासीन अधिकारी (Presiding Officers)

| विधानसभेचे अध्यक्ष (Speaker) | विधान परिषदेचे सभापती (Chairman) |
|---|---|
| ❍ विधानसभेच्या सदस्यांमधूनच त्यांची निवड केली जाते.<br>❍ विधानसभेचे सदस्यत्व रद्द झाल्यास त्यांना पद सोडावे लागते.<br>❍ विधानसभा विसर्जित झाल्यानंतरही ते आपल्या पदावर कायम राहतात.<br>■ नवीन अध्यक्ष पदभार स्वीकारेपर्यंत ते पदावर असतात.<br>❍ पदच्युती (Removal):<br>■ तत्कालीन सर्व सदस्यांच्या बहुमताने ठराव मंजूर करून.<br>■ १४ दिवसांची पूर्वसूचना देणे आवश्यक असते.<br>❍ मतदानाचा अधिकार:<br>■ पहिल्या फेरीत मतदान करण्याचा अधिकार नाही.<br>■ मते समान पडल्यास निर्णायक मत (Casting Vote) देऊ शकतात. | ❍ विधान परिषदेच्या सदस्यांमधूनच त्यांची निवड केली जाते.<br>❍ पदच्युती (Removal):<br>■ तत्कालीन सर्व सदस्यांच्या बहुमताने ठराव मंजूर करून.<br>■ १४ दिवसांची पूर्वसूचना देणे आवश्यक असते.<br>❍ महत्त्वाचा फरक:<br>■ अध्यक्षांकडे असे विशेष अधिकार असतात जे सभापतींकडे नसतात.<br>■ एखादे विधेयक 'धन विधेयक' आहे की नाही, हे ठरवण्याचा अंतिम अधिकार अध्यक्षांकडे असतो. |

| विधानसभेचे उपाध्यक्ष (Deputy Speaker) | विधान परिषदेचे उपसभापती (Deputy Chairman) |
|---|---|
| ❍ विधानसभेच्या सदस्यांमधूनच विधानसभेद्वारे निवडले जातात.<br>❍ पदच्युती (Removal):<br>■ तत्कालीन एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने ठराव मंजूर करून.<br>■ पदच्युतीसाठी १४ दिवसांची पूर्वसूचना देणे आवश्यक असते.<br>❍ जेव्हा अध्यक्षांचे पद रिक्त असते, तेव्हा ते अध्यक्षांची कर्तव्ये पार पाडतात. | ❍ विधान परिषदेच्या सदस्यांमधूनच विधान परिषदेद्वारे निवडले जातात.<br>❍ पदच्युती (Removal):<br>■ तत्कालीन एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने ठराव मंजूर करून.<br>■ पदच्युतीसाठी १४ दिवसांची पूर्वसूचना देणे आवश्यक असते.<br>❍ जेव्हा सभापतींचे पद रिक्त असते, तेव्हा ते सभापतींची कर्तव्ये पार पाडतात.<br>❍ सभापतींच्या अनुपस्थितीत ते सभागृहाचे कामकाज चालवतात (अध्यक्षस्थान भूषवतात). |

| | |
|---|---|
| **राज्य विधिमंडळ – नियम आणि कार्यपद्धती (State Legislature – Rules & Procedure)** | ❍ राज्य विधिमंडळाचे प्रत्येक सभागृह स्वतःचे नियम बनवू शकते:<br>■ कार्यपद्धतीसाठी (Procedure)<br>■ कामकाज संचालनासाठी (Conduct of business)<br>❍ हा अधिकार संविधानाच्या तरतुदींच्या अधीन आहे.<br>❍ राज्य विधिमंडळ लोकसभेच्या नियमांचे पालन करत नाही. |
| **राज्य मंत्रिमंडळ (State Council of Ministers - SCoM)** | **मंत्रिमंडळाशी संबंधित कलमे:**<br>❍ कलम १६३: राज्यपालांना मदत आणि सल्ला देण्यासाठी मंत्रिमंडळ.<br>❍ कलम १६४: मंत्र्यांशी संबंधित इतर तरतुदी (नेमणूक, कार्यकाळ, जबाबदारी).<br>❍ कलम १६६: राज्य सरकारच्या कामकाजाचे संचालन.<br>❍ कलम १६७: राज्यपालांना माहिती पुरवणे ही मुख्यमंत्र्यांची कर्तव्ये. कलम १७७: राज्य विधिमंडळाच्या संदर्भात मंत्र्यांचे अधिकार (बोलणे, कामकाजात भाग घेणे).<br>**उपमुख्यमंत्री (Deputy CM):**<br>❍ संविधानात याचा उल्लेख नाही.<br>**राज्य मंत्रिमंडळाचे वेतन:**<br>❍ राज्याच्या संचित निधीवर (Consolidated Fund of the State) भारित असते. |
| **त्रिशंकू विधानसभा आणि राज्यपालांचे अधिकार (Hung Assembly & Governor's Power)** | ■ **त्रिशंकू विधानसभेच्या स्थितीत राज्यपालांकडून विधानसभेचे विसर्जन:**<br>**१. एस.आर. बोम्मइ खटला (१९९४)**<br>❍ त्रिशंकू विधानसभेत राज्यपालांचा स्वविवेकाधिकार (Discretion) लागू होत नाही.<br>❍ बहुमताची चाचणी सभागृहाच्या पटलावरच (Floor of the House) झाली पाहिजे.<br>❍ वेळ मर्यादा:<br>■ सामान्यतः ४८ तासांच्या आत.<br>■ ती १५ दिवसांपर्यंत वाढवली जाऊ शकते.<br>❍ राज्यपालांची भूमिका:<br>■ राज्यपाल केवळ प्रक्रिया सुरू करणारी प्राधिकरण (Triggering authority) आहेत.<br>■ अंतिम निर्णय विधिमंडळाचा असतो, राज्यपालांचा नाही.<br>**२. रामेश्वर प्रसाद खटला**<br>❍ निवडणुकीनंतर झालेल्या आघाड्या (Post-poll alliances) राज्यपाल थेट नाकारू शकत नाहीत.<br>❍ केवळ घोडेबाजार (Horse-trading) होत असल्याच्या संशयावरून: विधानसभा विसर्जित करणे हा वैध आधार नाही.<br>❍ विसर्जनाचा निर्णय गृहितके किंवा भीतीवर आधारित असू शकत नाही. |

**2019**

**29.** खालील विधाने विचारात घ्या :

अ. नुकताच ओडिशा विधानसभेने विधान परिषद निर्माण करण्याबाबत ठराव मंजूर केला आहे.

ब. सध्या पांच राज्यांना विधान परिषद आहे. (6)

क. केरळ आणि गुजरात मध्ये विधान परिषद निर्माण करण्यासंबंधीचे प्रस्ताव संसदेमध्ये प्रलंबित आहेत.

ड. विधान परिषदेचे $\frac{1}{12}$ सदस्य हे नोंदणीकृत पदवीधरांकडून निवडले जातात.

वरीलपैकी कोणते विधाने बरोबर आहेत ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ, ब आणि क (2) ब आणि क (3) क आणि ड (4) अ आणि ड

Consider the following statements :

a. Odisha Legislative Assembly passed resolution for creation of Legislative Council recently.

b. Currently, five States have Legislative Councils.

c. Proposals to create Legislative Councils in Kerala and Gujarat are pending in Parliament.

d. $\frac{1}{12}$ th members of Legislative Council are elected by registered graduates.

Which of the above statements are correct ?

**Answer Options :**

(1) a, b and c (2) b and c (3) c and d (4) a and d

**2021**

**82.** महाराष्ट्र विधान परिषदेला ________ मध्ये 50 वर्षे पूर्ण झाली.

(1) 1990 (2) 2010 (3) 1987 (4) 2000

1935-चा Act
↳ More powers to State legislatures → ∴ est in 1937.

Maharashtra Legislative Council completed its 50 years of existence in ________.

(1) 1990 (2) 2010 (3) 1987 (4) 2000

**2022**

**59.** भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या कलमानुसार, विधानसभेने तशा आशयाचा ठराव संमत केला असेल, तर विधान परिषद स्थापन करण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार संसदेस दिलेला आहे ?

(1) अनुच्छेद 168 (2) अनुच्छेद 167

(3) अनुच्छेद 166 (4) अनुच्छेद 169

Which Article of the Indian Constitution empowers the Parliament of India to create or abolish Legislative Councils, if the Legislative Assembly of the State passes a resolution to that effect ?

(1) Article 168 (2) Article 167

(3) Article 166 (4) Article 169

**2021**

79. खालील विधाने विचारात घ्या :

(a) विधान परिषद हे स्थायी सभागृह आहे.

(b) राज्यपाल विधानपरिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.

(c) काही नामनिर्देशित सदस्य सोडल्यास विधान परिषदेचे सदस्य अप्रत्यक्ष पद्धतीने निवडले जातात.

वरीलपैकी कोणते/ती विधाने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) आणि (b) (2) (b) आणि (c) (3) (a) आणि (c) (4) वरीलपैकी नाही

Consider the following statements :

(a) Legislative Council is a Permanent Chamber.

(b) The Governor is the ex-officio chairman of Legislative Council.

(c) Except few nominated members the members of Legislative council are indirectly elected.

Which of the statement/s given above is/are **correct** ?

(1) (a) and (b) (2) (b) and (c) (3) (a) and (c) (4) None of above

**2023**

71. खालीलपैकी कोणते विधान अनुच्छेद 164 मध्ये समाविष्ट नाही ?

(1) मुख्यमंत्र्यांची नियुक्ती राज्यपालांद्वारे केली जाईल

(2) मंत्रीमंडळ राज्याच्या विधानसभेला एकत्रितपणे जबाबदार असणार नाही → X

(3) इतर मंत्र्यांची नियुक्ती राज्यपाल मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार करतील

(4) जो मंत्री कोणत्याही सलग सहा महिने कालावधीसाठी राज्याच्या विधीमंडळाचा सदस्य नसेल तो त्या कालावधीच्या समाप्तीनंतर मंत्री राहणार नाही

Which of the following statement is not included in Article 164 ?

(1) The Chief Minister shall be appointed by the Governor

(2) The Council of Ministers shall not be collectively responsible to the State Legislature

(3) The other Minister shall be appointed by the Governor on the advice of the Chief Minister

(4) A Minister who for any period of six consecutive months is not a member of the Legislature of the State shall at the expiration of that period cease to be a minister

CM- 2013

88. एखाद्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना हटवता येऊ शकते जर :

(a) राज्यसभा किंवा विधान परिषदेच्या दोन तृतीयांश सदस्यांनी तसा ठराव केला.

(b) राज्यपालांच्या मते राज्यामध्ये घटनात्मक सरकार व्यवस्था ढासळली आहे. → Art (356)

(c) विधान सभेने अविश्वास ठराव मंजूर केला. → This is the direct and democratic way of removing a CM.

(d) राज्य कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी अविश्वास ठराव मंजूर केला. X

The CM holds office during the pleasure of the Governor, but practically only when they lose majority in the Legislative Assembly. The Rajya Sabha has no role in state matters, and the Legislative Council cannot remove the CM – it's only the Legislative Assembly that can.

In a bicameral state, the Legislative Council (Upper House) cannot pass a no-confidence motion against the CM – only the Legislative Assembly (Lower House) can. The Council's role is advisory and revisory, not executive-controlling.

पर्याय :

(1) (a), (b) (2) (a), (b), (d) (3) (b), (c) (4) (a), (d)

The Chief Minister of a state can be removed if :

(a) a resolution is passed by 2/3rd members of the Legislative Council or the Rajya Sabha. X

(b) in the opinion of the Governor, there is a breakdown of the constitutional machinery in the state.

(c) a no - confidence motion is passed by the Legislative Assembly.

(d) a no - confidence motion is passed by both the houses of State Legislature.

**Codes :**

(1) (a), (b) (2) (a), (b), (d) (3) (b), (c) (4) (a), (d)

2025 34 E21

**74.** अँग्लो-इंडीयन समुदायासाठी तरतुदींबाबत खालीलपैकी अयोग्य विधान/ने ओळखा.

अ. अनुच्छेद 335 हे राज्यांच्या विधान सभांमध्ये अँग्लो-इंडीयन समाजाचे प्रतिनिधित्वाशी निगडीत आहे.

ब. अँग्लो-इंडीयन समाजाच्या लाभाकरीता 31 मार्च, 1948 रोजी संपन्न होणाऱ्या वित्तीय वर्षात शिक्षणाबाबत दिली गेली होती अशी काही अनुदाने असतील तर, तीच अनुदाने संविधानाच्या प्रारंभानंतर पहिल्या तीन वित्तीय वर्षात संघराज्य व प्रत्येक राज्य यांच्याकडून दिली जातील.

क. दर तीन वर्षाच्या अनुवर्ती कालावधीत, लगतपूर्व तीन वर्षाच्या कालावधीतील अनुदानापेक्षा ती दहा टक्क्याने कमी असू शकतील.

(1) फक्त अ

(2) फक्त ब व क

(3) फक्त क

(4) वरीलपैकी सर्व

Identify the incorrect statement/s from the following about provisions for Anglo-Indian Community.

A. Article 335 is related to Representation of the Anglo-Indian Community in the Legislative Assembly.

B. Grants if any, were made for the benefit of the Anglo-Indian Community in respect of education in the financial year ending on the $31^{st}$ March, 1948, the same shall be given for the first three financial years after the commencement of the Constitution.

C. During every succeeding period of three years, the grants may be less 10%, than that, for the immediately preceding period of three years.

(1) Only A

(2) Only B and C

(3) Only C

(4) All of the above

## Articles Related to Parliament and State Legislature

| संसद (भाग V) | राज्य विधिमंडळ (भाग VI) |
|---|---|
| कलम ७९ – संसदेची स्थापना | कलम १६८ – राज्य विधिमंडळाची स्थापना |
| कलम ८० – राज्यसभेची रचना | कलम १६९ – विधान परिषद निर्माण/बरखास्त करणे |
| कलम ८१ – लोकसभेची रचना | कलम १७० – विधानसभेची रचना |
| कलम ८२ – जनगणनेनंतर पुनर्रचना | कलम १७१ – विधान परिषदेची रचना |
| कलम ८३ – संसदेच्या सभागृहांचा कार्यकाळ | कलम १७२ – राज्य विधिमंडळाचा कार्यकाळ |
| कलम ८४ – संसद सदस्यत्वासाठी पात्रता | कलम १७३ – सदस्यांची पात्रता |
| कलम ८५ – संसदेची अधिवेशने, सत्रावसान व विसर्जन | कलम १७४ – अधिवेशने, सत्रावसान व विसर्जन |
| कलम ८६ – राष्ट्रपतींचा अभिभाषण व संदेशाचा अधिकार | कलम १७५ – राज्यपालांचा अभिभाषण व संदेशाचा अधिकार |
| कलम ८७ – राष्ट्रपतींचे विशेष अभिभाषण | कलम १७६ – राज्यपालांचे विशेष अभिभाषण |
| कलम ८८ – मंत्री आणि महान्यायवादी यांचे अधिकार | कलम १७७ – मंत्री आणि महाधिवक्ता यांचे अधिकार |
| संसदेचे अधिकारी (Officers) | राज्य विधिमंडळाचे अधिकारी (Officers) |
| कलम ८९ – राज्यसभेचे सभापती व उपसभापती | कलम १७८ – विधानसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष |
| कलम ९० – उपसभापतींचे पद रिक्त होणे, राजीनामा व पदच्युती | कलम १७९ – अध्यक्ष/उपाध्यक्षांचे पद रिक्त होणे, राजीनामा व पदच्युती |
| कलम ९१ – उपसभापतींनी सभापती म्हणून काम पाहणे | कलम १८० – उपाध्यक्षांनी अध्यक्ष म्हणून काम पाहणे |
| कलम ९२ – पदच्युतीचा ठराव प्रलंबित असताना सभापती/ उपसभापतींनी अध्यक्षस्थान न भूषवणे | कलम १८१ – पदच्युतीचा ठराव प्रलंबित असताना अध्यक्ष/उपाध्यक्षांनी अध्यक्षस्थान न भूषवणे |
| कलम ९३ – लोकसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष | कलम १८२ – विधान परिषदेचे सभापती व उपसभापती |
| कलम ९४ – अध्यक्ष/उपाध्यक्षांचे पद रिक्त होणे, राजीनामा व पदच्युती | कलम १८३ – सभापती/उपसभापतींचे पद रिक्त होणे, राजीनामा व पदच्युती |
| कलम ९५ – उपाध्यक्षांनी अध्यक्ष म्हणून काम पाहणे | कलम १८४ – उपसभापतींनी सभापती म्हणून काम पाहणे |
| कलम ९६ – पदच्युतीचा ठराव प्रलंबित असताना अध्यक्ष/उपाध्यक्षांनी अध्यक्षस्थान न भूषवणे | कलम १८५ – पदच्युतीचा ठराव प्रलंबित असताना सभापती/ उपसभापतींनी अध्यक्षस्थान न भूषवणे |
| कलम ९७ – पीठासीन अधिकाऱ्यांचे वेतन व भत्ते | कलम १८६ – पीठासीन अधिकाऱ्यांचे वेतन व भत्ते |
| कलम ९८ – संसदेचे सचिवालय | कलम १८७ – राज्य विधिमंडळाचे सचिवालय |
| कामकाजाचे संचालन (Conduct of Business) | कामकाजाचे संचालन (Conduct of Business) |
| कलम ९९ – शपथ किंवा प्रतिज्ञा | कलम १८८ – शपथ किंवा प्रतिज्ञा |
| कलम १०० – मतदान आणि गणसंख्या (Quorum) | कलम १८९ – मतदान आणि गणसंख्या (Quorum) |
| अपात्रता (Disqualification) | अपात्रता (Disqualification) |
| कलम १०१ – जागा रिक्त होणे | कलम १९० – जागा रिक्त होणे |
| कलम १०२ – सदस्यत्वासाठी अपात्रता | कलम १९१ – सदस्यत्वासाठी अपात्रता |
| कलम १०३ – अपात्रतेबाबतचा निर्णय | कलम १९२ – अपात्रतेबाबतचा निर्णय |
| कलम १०४ – अपात्र असताना सभागृहात बसणे/मतदान करणे याबद्दल दंड | कलम १९३ – अपात्र असताना सभागृहात बसणे/मतदान करणे याबद्दल दंड |
| विशेषाधिकार (Privileges) | विशेषाधिकार (Privileges) |

| | |
|---|---|
| कलम १०५ – अधिकार, विशेषाधिकार व संरक्षण | कलम १९४ – अधिकार, विशेषाधिकार व संरक्षण |
| कलम १०६ – खासदारांचे वेतन व भत्ते | कलम १९५ – आमदारांचे वेतन व भत्ते |
| कायदेविषयक प्रक्रिया (Legislative Procedure) | कायदेविषयक प्रक्रिया (Legislative Procedure) |
| कलम १०७ – विधेयके मांडणे व पारित करणे | कलम १९६ – विधेयके मांडणे व पारित करणे |
| कलम १०८ – संयुक्त बैठक | कलम १९७ – विधान परिषदेच्या अधिकारांवर निर्बंध |
| कलम १०९ – धन विधेयकांबाबत विशेष प्रक्रिया | कलम १९८ – धन विधेयकांबाबत विशेष प्रक्रिया |
| कलम ११० – धन विधेयकाची व्याख्या | कलम १९९ – धन विधेयकाची व्याख्या |
| कलम १११ – विधेयकांना संमती | कलम २०० – विधेयकांना संमती |
| | कलम २०१ – राष्ट्रपतींच्या विचारासाठी राखीव विधेयके |
| वित्तीय प्रक्रिया (Financial Procedure) | वित्तीय प्रक्रिया (Financial Procedure) |
| कलम ११२ – वार्षिक वित्तीय विवरण (अर्थसंकल्प) | कलम २०२ – वार्षिक वित्तीय विवरण |
| कलम ११३ – अंदाजांबाबतची प्रक्रिया | कलम २०३ – अंदाजांबाबतची प्रक्रिया |
| कलम ११४ – विनियोजन विधेयके | कलम २०४ – विनियोजन विधेयके |
| कलम ११५ – पूरक, अतिरिक्त किंवा जादा अनुदान | कलम २०५ – पूरक, अतिरिक्त किंवा जादा अनुदान |
| कलम ११६ – लेखानुदान, प्रत्ययानुदान व अपवादात्मक अनुदान | कलम २०६ – लेखानुदान, प्रत्ययानुदान |
| कलम ११७ – वित्त विधेयके | कलम २०७ – वित्त विधेयके |
| सर्वसाधारण (General) | सर्वसाधारण (General) |
| कलम ११८ – कार्यपद्धतीचे नियम | कलम २०८ – कार्यपद्धतीचे नियम |
| कलम ११९ – वित्तीय प्रक्रियेचे कायद्याद्वारे नियमन | कलम २०९ – वित्तीय प्रक्रियेचे कायद्याद्वारे नियमन |
| कलम १२० – संसदेतील भाषा | कलम २१० – विधिमंडळातील भाषा |
| कलम १२१ – चर्चेवर निर्बंध | कलम २११ – चर्चेवर निर्बंध |
| कलम १२२ – कामकाजाची चौकशी न्यायालये करणार नाहीत | कलम २१२ – कामकाजाची चौकशी न्यायालये करणार नाहीत |
| अध्यादेश (Ordinance) | अध्यादेश (Ordinance) |
| कलम १२३ – राष्ट्रपतींचा अध्यादेश काढण्याचा अधिकार | कलम २१३ – राज्यपालांचा अध्यादेश काढण्याचा अधिकार |

## PARLIAMENTARY COMMITTEES

### घटनात्मक स्थिती (Constitutional Position)

- संविधानात संसदीय समित्यांचा उल्लेख आहे, परंतु त्यांच्याबद्दल सविस्तर तरतुदी नाहीत अधिक तपशील कामकाजाच्या नियमावलीत (Rules of Procedure) दिले आहेत.
- सल्लागार समित्या (Consultative Committees) संसदीय समित्या.
- लोकसभेच्या सर्व संसदीय समित्यांचे अध्यक्ष लोकसभा अध्यक्षांद्वारे नियुक्त केले जातात.
- मुख्य प्रकार: स्थायी समित्या (Standing Committees) आणि तदर्थ (तात्पुरत्या) समित्या (Ad Hoc Committees).

## ■ संसदीय स्थायी समित्या (Standing Committees)




| | | |
|---|---|---|
| **लोकलेखा समिती (Public Accounts Committee - PAC)** | ❍ उगम: १९२१ (भारत सरकार कायदा, १९१९)<br>❍ सदस्य संख्या: २२ सदस्य १५ लोकसभा + ७ राज्यसभा (प्रमाणशीर प्रतिनिधित्वाद्वारे निवडले जातात)<br>❍ राज्यसभा सदस्य: होय, सहभागी असतात<br>❍ अध्यक्ष: लोकसभा अध्यक्षांद्वारे नियुक्ती केली जाते; १९६७ पासून परंपरेने विरोधी पक्षाचा सदस्य अध्यक्ष असतो<br>❍ मंत्री: मंत्री या समितीचे सदस्य असू शकत नाहीत | **मुख्य कार्ये:**<br>❍ खालील विषयांवरील CAG (कॅग) अहवालांची तपासणी करणे:<br>❍ विनियोजन लेखे (Appropriation Accounts)<br>❍ वित्त लेखे (Finance Accounts)<br>❍ सार्वजनिक उपक्रम (लेखापरीक्षण पैलू)<br>❍ अपव्यय, तोटा, भ्रष्टाचार आणि अतिरिक्त खर्चाची तपासणी करणे<br>❍ CAG द्वारे लेखापरीक्षण केलेल्या स्वायत्त किंवा निम-स्वायत्त संस्थांची तपासणी करणे<br>❍ खर्च झाल्यानंतरची छाननी (Post-facto scrutiny) करणे |
| **अंदाज समिती (Estimates Committee - EC)** | ❍ १९२१ (स्थायी वित्तीय समिती); १९५० – जॉन मथाइ यांच्या शिफारसीनुसार<br>❍ सदस्य संख्या: ३० (केवळ लोकसभेचे सदस्य) – वित्तीय समित्यांपैकी सर्वाधिक सदस्य संख्या<br>❍ राज्यसभा सदस्य: नाही<br>❍ अध्यक्ष: सत्ताधारी पक्षाचा सदस्य असतो | **मुख्य कार्ये:**<br>❍ अर्थसंकल्पातील अंदाजांची (Estimates) तपासणी करणे<br>❍ सार्वजनिक खर्चात काटकसर सुचवणे<br>❍ कार्यक्षमता वाढवण्यासाठी पर्यायी धोरणांची शिफारस करणे<br>❍ संघटना आणि प्रशासकीय सुधारणांसाठी सूचना देणे<br>❍ सतत काटकसर करण्यावर भर देणे |
| **सार्वजनिक उपक्रम समिती (Committee on Public Undertakings - COPU)** | ❍ उगम: १९६४ (कृष्ण मेनन समितीच्या शिफारसीनुसार)<br>❍ सदस्य संख्या: २२<br>❍ १५ लोकसभा + ७ राज्यसभा<br>❍ राज्यसभा सदस्य: होय<br>❍ अध्यक्ष: केवळ लोकसभेतून | **मुख्य कार्ये:**<br>❍ सार्वजनिक उपक्रमांवरील (PSUs) CAG (कॅग) अहवालांची तपासणी करणे.<br>❍ सार्वजनिक उपक्रमांची स्वायत्तता आणि कार्यक्षमतेचे पुनरावलोकन करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | ❍ सार्वजनिक उपक्रमांचे व्यवस्थापन, प्रशासन आणि धोरणांचा अभ्यास करणे.<br>❍ खालील बाबींची तपासणी करत नाही:<br>❍ महत्त्वाचे सरकारी धोरणात्मक विषय.<br>❍ दैनंदिन प्रशासन.<br>❍ न्यायप्रविष्ट (न्यायालयाच्या विचाराधीन) प्रकरणे. |
| **विभागीय स्थायी समित्या (Departmentally Related Standing Committees - DRSC)** | ❍ उगम: १९९३ (नियम समितीच्या शिफारसीनुसार)<br>❍ सदस्य संख्या: ३१<br>❍ २१ लोकसभा + १० राज्यसभा (नामनिर्देशित) राज्यसभा सदस्य: होय<br>❍ अध्यक्ष: लोकसभा अध्यक्ष / राज्यसभा सभापतींद्वारे नियुक्त. | **मुख्य कार्ये:**<br>❍ मंत्रालयांच्या अनुदानाच्या मागण्यांची (Demands for Grants) तपासणी करणे.<br>❍ समितीकडे पाठवलेल्या विधेयकांची छाननी करणे.<br>❍ मंत्रालयांच्या वार्षिक अहवालांची तपासणी करणे.<br>❍ दीर्घकालीन धोरणात्मक कागदपत्रांचा विचार करणे.<br>❍ स्वरूप: सल्लागार आणि शिफारस स्वरूपाचे; निर्णय बंधनकारक नसतात.<br>❍ महत्त्व: कार्यकारिणीवर (Executive) संसदेचे नियंत्रण अधिक मजबूत करते. |
| **चौकशी करणाऱ्या समित्या (Committees to Inquire)** | **१. याचिका समिती (Committee on Petitions):**<br>❍ सदस्य संख्या: लोकसभा: १५ \| राज्यसभा: १०.<br>❍ कार्य: विधेयकांवरील किंवा सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवरील याचिकांची तपासणी करणे.<br>❍ केंद्रसूचीशी संबंधित विषयांवरील निवेदनांचा विचार करते.<br>**२. विशेषाधिकार समिती (Committee of Privileges):**<br>❍ सदस्य संख्या: लोकसभा: १५ \| राज्यसभा: १०.<br>❍ स्वरूप: अर्ध-न्यायालयीन (Semi-judicial).<br>❍ कार्य: संसदीय विशेषाधिकार भंगाच्या प्रकरणांची तपासणी करणे.<br>**३. आचार समिती (Ethics Committee):**<br>❍ स्थापना: राज्यसभा: १९९७ \| लोकसभा: २०००.<br>❍ कार्य: आचारसंहिता (Code of Conduct), शिस्त आणि सभ्यता यांचे पालन सुनिश्चित करणे.<br>❍ स्वतःहून दखल घेऊन (Suo motu) कारवाइ करू शकते. | |
| **छाननी आणि नियंत्रण करणाऱ्या समित्या (Committees to Scrutinise & Control)** | **१. सरकारी आश्वासने समिती (१९५३):**<br>❍ सदस्य संख्या: लोकसभा: १५ \| राज्यसभा: १०.<br>❍ कार्य: सभागृहात मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी झाली आहे याची खात्री करणे.<br>❍ वेळ मर्यादा: ३ महिने (मुदतवाढ मिळू शकते).<br>**२. दुय्यम विधान समिती (१९५३):**<br>❍ कार्य: कार्यकारी मंडळाच्या (Executive) नियम बनवण्याच्या अधिकारांची तपासणी करणे.<br>**३. सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या कागदपत्रांची समिती (१९७५):**<br>❍ कार्य: मंत्र्यांनी सभागृहात ठेवलेल्या कागदपत्रांची तपासणी करणे.<br>❍ टीप: ही समिती वैधानिक अधिसूचना/आदेशांची तपासणी करत नाही (ती तपासणी दुय्यम विधान समिती करते).<br>**४. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती कल्याण समिती:**<br>❍ स्वरूप: संयुक्त समिती (Single Committee).<br>❍ सदस्य संख्या: लोकसभा: २० \| राज्यसभा: १०.<br>❍ कार्य: NCSC आणि NCST अहवालांची तसेच कल्याणाशी संबंधित विषयांची तपासणी करणे. | |

| | |
|---|---|
| | **५. महिला सक्षमीकरण समिती:**<br>❍ स्वरूप: संयुक्त समिती (Single Committee).<br>❍ सदस्य संख्या: लोकसभा: २० \| राज्यसभा: १०.<br>❍ कार्य: राष्ट्रीय महिला आयोगाच्या (NCW) अहवालांची तपासणी करणे आणि महिलांची प्रतिष्ठा, समानता व दर्जा यासाठी उचललेल्या पावलांचे पुनरावलोकन करणे.<br>**६. लाभाचे पद संयुक्त समिती (Joint Committee on Office of Profit):**<br>❍ स्वरूप: संयुक्त समिती (Single Committee).<br>❍ सदस्य संख्या: लोकसभा: १० \| राज्यसभा: ५.<br>❍ कार्य: एखादे पद 'लाभाचे पद' आहे की नाही हे ठरवणे (ज्यामुळे अपात्रता ठरू शकते). |
| **दैनंदिन कामकाजाशी संबंधित समित्या (Committees Related to Day-to-Day Business)** | **१. खाजगी सदस्यांच्या विधेयकांवरील समिती:**<br>❍ केवळ लोकसभेत असते (१५ सदस्य, उपाध्यक्ष हे अध्यक्ष असतात).<br>❍ विधेयकांचे वर्गीकरण करते आणि वेळ निश्चित करते.<br>❍ राज्यसभेत याच्या एवजी 'कामकाज सल्लागार समिती' (Business Advisory Committee) हे काम पाहते.<br>**२. सदस्यांच्या अनुपस्थितीविषयक समिती:**<br>❍ केवळ लोकसभेत असते.<br>❍ राज्यसभेत या प्रकरणाचा निर्णय खुद्द सभागृहाद्वारे घेतला जातो. |
| **गृह-व्यवस्थापन समित्या (House-Keeping Committees)** | **वेतन आणि भत्ते संयुक्त समिती:**<br>❍ सदस्य संख्या: १५ (१० लोकसभा + ५ राज्यसभा).<br>❍ कार्य: खासदार वेतन आणि भत्ते कायदा, १९५४ अंतर्गत नियम तयार करणे.<br>❍ ही समिती आपले अहवाल थेट सभागृहास सादर न करता अध्यक्ष/सभापतींना सादर करते.<br>**इतर समित्या:**<br>❍ ग्रंथालय समिती (Library Committee).<br>❍ सामान्य प्रयोजन समिती (General Purposes Committee).<br>❍ आवास समिती (House Committee). |
| **सल्लागार समित्या (Consultative Committees)** | ❍ या समित्या विविध मंत्रालयांना/विभागांना जोडलेल्या असतात.<br>❍ त्यांची बैठक संसदेच्या अधिवेशनादरम्यान किंवा अधिवेशनाबाहेर (मध्यंतरात) होऊ शकते.<br>❍ संबंधित मंत्री या समितीचे अध्यक्ष असतात.<br>❍ या समित्यांची स्थापना संसदीय कार्य मंत्रालयाद्वारे (Ministry of Parliamentary Affairs) केली जाते.<br>❍ या समित्यांचे सदस्यत्व स्वैच्छिक असते.<br>❍ लोकसभा विसर्जित झाल्यावर या समित्यादेखील बरखास्त होतात. |

## संसदीय मंच (PARLIAMENTARY FORUMS)

### ■ संसदीय मंच म्हणजे काय?

- विशिष्ट विषयांवर लक्ष केंद्रित करून चर्चा करण्यासाठी संसदेचे हे अनौपचारिक व्यासपीठ आहे.
- उद्देश: जागरूकता निर्माण करणे, समन्वय साधणे आणि अनुभवांची देवाणघेवाण करणे; कायदा करणे हा याचा मुख्य उद्देश नाही.
- संसदीय समिती (Parliamentary Committee) विरुद्ध संसदीय मंच (Parliamentary Forum)

| संसदीय समिती | संसदीय मंच |
|---|---|
| ❍ संसदीय समिती (Parliamentary Committee)<br>❍ सदस्य संख्या निश्चित आणि मर्यादित असते.<br>❍ अशा अनेक समित्या आहेत.<br>❍ विभाग किंवा विषयाशी संबंधित (Subject-specific) असते.<br>❍ मंत्रालये किंवा विभागांच्या अंतर्गत कार्य करते.<br>❍ विभागांच्या कामकाजाची छाननी करू शकते. | ❍ संसदीय मंच (Parliamentary Forum)<br>❍ रस असलेल्या सर्व खासदारांसाठी (MPs) सदस्यत्व खुले असते.<br>❍ केवळ ८ मंच (Forums) आहेत.<br>❍ व्यापक आणि विविध क्षेत्रांना स्पर्श करणारे विषय (Cross-cutting themes) असतात.<br>❍ संपूर्ण संसदेद्वारे कार्य चालते.<br>❍ विभागांच्या कामकाजात हस्तक्षेप करत नाही. |

| | |
|---|---|
| **संसदीय मंचाचे अध्यक्ष (President of Parliamentary Forums)** | ❍ सर्व ८ मंचांचे अध्यक्ष: लोकसभा अध्यक्ष (पदसिद्ध).<br>❍ अपवाद (केवळ एक):<br>■ लोकसंख्या आणि सार्वजनिक आरोग्य मंच (Forum on Population & Public Health).<br>■ अध्यक्ष: राज्यसभेचे सभापती. |
| **उपाध्यक्ष (Vice-Chairman)** | ❍ संबंधित मंत्री. तसेच संबंधित विभागीय स्थायी समितीचे (DRSC) अध्यक्ष.<br>❍ हे मंचाचे पदसिद्ध उपाध्यक्ष म्हणून काम पाहतात. |
| **सदस्य (Members)** | 1. एकूण सदस्य: ३१ खासदार (MPs). लोकसभेतून: २१ सदस्य. राज्यसभेतून: १० सदस्य. |
| **एकूण संसदीय मंच = ८ (Total Parliamentary Forums = 8)** | ❍ १. पाणी (Water)<br>❍ २. युवक (Youth)<br>❍ ३. मुले (Children)<br>❍ ४. लोकसंख्या आणि सार्वजनिक आरोग्य (Population & Public Health)<br>❍ ५. जागतिक तापमान वाढ आणि हवामान बदल (Global Warming & Climate Change)<br>❍ ६. आपत्ती व्यवस्थापन (Disaster Management)<br>❍ ७. सहस्रक विकास उद्दिष्टे (Millennium Development Goals - MDGs)<br>❍ ८. कारागीर आणि शिल्पकार (Artisans & Craftsmen) |
| **भारतीय संसदीय गट (INDIAN PARLIAMENTARY GROUP - IPG)** | ■ **भारतीय संसदीय गट (IPG)**<br>❍ स्थापना: १९४९<br>❍ IPG हा खालील संस्थेचा भाग आहे: आंतर-संसदीय संघ (Inter-Parliamentary Union - IPU)<br>❍ IPU सदस्यत्व: सध्या १५३ देश<br>❍ समधर्मी संस्था: राष्ट्रकुल संसदीय संघ (Commonwealth Parliamentary Association - CPA)<br>❍ नेतृत्व (Leadership):<br>■ लोकसभा अध्यक्ष हे भारतीय संसदीय गटाचे (IPG) पदसिद्ध अध्यक्ष असतात.<br>■ लोकसभेचे उपाध्यक्ष आणि राज्यसभेचे उपसभापती हे भारतीय संसदीय गटाचे (IPG) पदसिद्ध उपाध्यक्ष असतात.<br>■ लोकसभेचे सरचिटणीस (Secretary-General) हे भारतीय संसदीय गटाचे पदसिद्ध सरचिटणीस म्हणून काम पाहतात. |
| **संसदेचे सार्वभौमत्व (Sovereignty of Parliament - SoP)** | ❍ ही संकल्पना ब्रिटीश संसदेत प्रामुख्याने दिसून येते.<br>❍ मुख्य वैशिष्ट्ये:<br>■ संसद कोणताही कायदा बनवू शकते, ज्यामध्ये महत्त्वाच्या मूलभूत कायद्यांचा (Substantive law) समावेश होतो.<br>■ घटनात्मक कायदा (Constitutional law) आणि सामान्य कायदा (Ordinary law) यामध्ये कोणताही फरक केला जात नाही.<br>■ संसदेने केलेले कायदे न्यायपालिकेद्वारे अवैध किंवा रद्द ठरवले जाऊ शकत नाहीत. |

CHAPTER
15

# न्यायव्यवस्था (JUDICIARY)

## सर्वोच्च न्यायालय (SUPREME COURT) आणि उच्च न्यायालय (HIGH COURT)

| सर्वोच्च न्यायालय (SUPREME COURT OF INDIA) (भाग V, कलम 124–147) | HIGH COURT (Part VI, Articles 214–231) |
|---|---|
| **1. स्थापना आणि दर्जा (ESTABLISHMENT & STATUS)**<br>❍ उद्घाटन 28 जानेवारी 1950 रोजी झाले.<br>❍ सर्वोच्च अपील संस्था म्हणून ब्रिटिश प्रिव्ही कौन्सिलची जागा घेतली (1950).<br>❍ भारतात एकल, एकात्मिक न्यायिक व्यवस्था आहे (अमेरिकेप्रमाणे दुहेरी नाही).<br>❍ भारत सरकार अधिनियम, 1935 → संघराज्य न्यायालयाच्या संरचनेचा पाया.<br>❍ सर्वोच्च न्यायालय हे भारतातील अंतिम अपील न्यायालय आहे.<br>❍ संविधानाचा संरक्षक/पालक म्हणून कार्य करते.<br>**2. सर्वोच्च न्यायालयाचे आसन (SEAT OF SUPREME COURT) (कलम 130)**<br>❍ संविधानाने दिल्लीला आसन म्हणून घोषित केले आहे.<br>❍ भारताचे सरन्यायाधीश (CJI) इतर ठिकाणे आसन म्हणून नियुक्त करू शकतात.<br>❍ अशा नियुक्तीसाठी राष्ट्रपतींची मंजूरी आवश्यक आहे (येथे संसदेची कोणतीही भूमिका नाही).<br>**3. अधिकारक्षेत्र विरुद्ध संसद (JURISDICTION vs PARLIAMENT)**<br>❍ संसद सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र कमी करू शकत नाही.<br>❍ संसद कायद्याद्वारे सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र वाढवू शकते.<br>❍ घटनात्मक बाबींमध्ये संसदेवर न्यायिक सर्वोच्चता दर्शवते.<br>**4. सर्वोच्च न्यायालयाची रचना (COMPOSITION OF SUPREME COURT)**<br>❍ मूळतः: सरन्यायाधीश (CJI) + 7 न्यायाधीश.<br>❍ 2019 अधिसूचना:<br>■ संख्या 31 वरून → 34 पर्यंत वाढवली.<br>■ सध्याची संख्या = 33 न्यायाधीश + सरन्यायाधीश (CJI).<br>■ संख्या संसदेद्वारे कायद्याने निश्चित केली जाते. | **1. स्थापना आणि रचना (ESTABLISHMENT & STRUCTURE)**<br>❍ उगम (Origin): 1862<br>❍ कलकत्ता (Calcutta), बॉम्बे (Bombay), मद्रास (Madras)<br>❍ 4th HC: अलाहाबाद (Allahabad) (1866)<br>❍ प्रत्येक राज्यासाठी एक उच्च न्यायालय (One HC for each state)<br>❍ 7th घटनादुरुस्ती कायदा, 1956 (Constitutional Amendment Act, 1956):<br>❍ संसद सामायिक उच्च न्यायालय (common HC) स्थापन करू शकते.<br>❍ 2 किंवा अधिक राज्यांसाठी किंवा राज्ये + केंद्रशासित प्रदेश (UT) साठी.<br>❍ सध्याची संख्या (2025): 25 उच्च न्यायालये (High Courts).<br>**2. घटनात्मक दर्जा (CONSTITUTIONAL STATUS)**<br>❍ कलम 214 (Article 214):<br>❍ प्रत्येक राज्यासाठी एक उच्च न्यायालय असेल (There shall be a High Court for each State).<br>❍ उच्च न्यायालय हे आहे:<br>❍ राज्यातील सर्वोच्च न्यायिक प्राधिकरण (The highest judicial authority in the State).<br>❍ केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या अधीन (Subordinate only to the Supreme Court).<br>❍ भारताच्या एकात्मिक न्यायिक प्रणालीचा अविभाज्य भाग (Integral part of India's integrated judicial sys-tem).<br>**3. रचना आणि संख्याबळ (COMPOSITION & STRENGTH)**<br>❍ प्रत्येक HC मध्ये यांचा समावेश असतो:<br>❍ मुख्य न्यायमूर्ती (Chief Justice).<br>❍ इतर न्यायाधीश (Other judges). |

**5. न्यायाधीशांची नियुक्ती (APPOINTMENT OF JUDGES)**

- प्राधिकरण (Authority)
  - न्यायाधीशांची नियुक्ती भारताच्या राष्ट्रपतींद्वारे केली जाते.

**भारताचे सरन्यायाधीश (Chief Justice of India)**

- राष्ट्रपती खालील व्यक्तींशी सल्लामसलत करून नियुक्ती करतात:
  - सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश.
  - उच्च न्यायालयाचे न्यायाधीश (आवश्यक वाटल्यास).

**इतर न्यायाधीश (Other Judges)**

- राष्ट्रपती खालील व्यक्तींशी सल्लामसलत करून नियुक्ती करतात:

**भारताचे सरन्यायाधीश.**

- सर्वोच्च न्यायालय (SC) आणि उच्च न्यायालयाचे (HC) इतर न्यायाधीश (आवश्यकतेनुसार).
- अनिवार्य सल्लामसलत (Mandatory Consultation)
- सरन्यायाधीशांशी (CJI) सल्लामसलत करणे बंधनकारक आहे.
- विशेषतः सरन्यायाधीशांव्यतिरिक्त इतर न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी अनिवार्य.

**6. न्यायाधीश प्रकरणे (न्यायाधीश निवड मंडळ / COLLEGIUM SYSTEM)**

- 1st Judges Case (1982)
  - सल्लामसलत बंधनकारक नाही.
- 2nd Judges Case (1993)
  - सरन्यायाधीशांची (CJI) सल्लामसलत बंधनकारक झाली.
- 3rd Judges Case (1998)
  - न्यायाधीश निवड मंडळ (Collegium system) स्थापित झाले.
- सरन्यायाधीश (CJI) + 4 सर्वात ज्येष्ठ न्यायाधीश.

**7. NJAC (महत्वाचा UPSC मुद्दा / IMPORTANT UPSC POINT)**

- 99 वी घटनादुरुस्ती कायदा, 2015.
- NJAC = सरन्यायाधीश (CJI) + 2 ज्येष्ठ न्यायाधीश + कायदा मंत्री + 2 प्रतिष्ठित व्यक्ती.
- सर्वोच्च न्यायालयाद्वारे (SC) असंवैधानिक आणि अवैध घोषित (2015).
- कारण: न्यायिक स्वातंत्र्याचे उल्लंघन.

**8 सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांसाठी पात्रता (QUALIFICATIONS OF SC JUDGES)**

- भारताचा नागरिक, आणि
- 5 वर्षांसाठी उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, किंवा
- 10 वर्षांसाठी उच्च न्यायालयाचे वकील, किंवा

- संविधानाने संख्याबळ निश्चित केलेले नाही (Constitution does NOT fix strength).
- संख्याबळ राष्ट्रपती ठरवतात (Strength decided by President).
- संसदेची कोणतीही भूमिका नाही (Parliament has no role).

**4. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती (APPOINTMENT OF HC JUDGES)**

- उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती (Chief Justice of HC):
- यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर राष्ट्रपतींनी नियुक्त केलेले:
- CJI (भारताचे सरन्यायाधीश).
- राज्याचे राज्यपाल (Governor of State).
- इतर न्यायाधीश (Other Judges):
- यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर राष्ट्रपतींनी नियुक्त केलेले:
- CJI (भारताचे सरन्यायाधीश).
- उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती (Chief Justice of HC).
- राज्यपाल (Governor).

**5. पात्रता (QUALIFICATIONS (HC))**

- भारताचा नागरिक (Citizen of India).
- एकतर:
- भारतात 10 वर्षे न्यायिक पद धारण केलेले (Judicial office in India for 10 years) किंवा
- 10 वर्षे उच्च न्यायालयाचे वकील (Advocate of HC for 10 years).
- प्रतिष्ठित कायदेपंडितांसाठी (distinguished jurist) कोणतीही तरतूद नाही (No provision for distinguished jurist).

**6. शपथ (OATH)**

- राज्याच्या राज्यपालांसमोर (Before Governor of the State).

**7. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचा कार्यकाळ (TENURE OF HIGH COURT JUDGES)**

- संविधानाने कार्यकाळ निश्चित केलेला नाही (Constitution does NOT fix tenure).
- 62 वर्षे वयापर्यंत पद धारण करतात (Holds office until 62 years of age).

- न्यायाधीश:
- राष्ट्रपतींना पत्र लिहून राजीनामा देऊ शकतात (Resign by writing to the President).

- प्रतिष्ठित न्यायशास्त्रज्ञ (राष्ट्रपतींचे मत).
- संविधानाने किमान वय निश्चित केलेले नाही.

### 9. शपथ (OATH)

- सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश भारताच्या राष्ट्रपतींसमोर शपथ घेतात.

### 10. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचा कार्यकाळ (TENURE OF SC JUDGES)

- कार्यकाळ निश्चित केलेला नाही.
- 65 वर्षांचे होइपर्यंत पद धारण करतात.
- राष्ट्रपतींना पत्र लिहून राजीनामा देऊ शकतात.

### 11. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरून दूर करणे (REMOVAL OF SC JUDGES)

- आधार (Grounds)
- गैरवर्तन (Misbehavior)
| **आरक्षण (Reservation)** | ❍ लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण.<br>❍ अनुसूचित जमाती (STs): किमान 50% जागा.<br>❍ सर्व स्तरांवरील सर्व अध्यक्ष STs साठी आरक्षित.<br>❍ राज्य शासन (State Govt) मध्यवर्ती आणि जिल्हा स्तरांवर प्रतिनिधित्व नसलेल्या जमातींना नामनिर्देशित करू शकते (≤ 1/10th सदस्य). |
| **ग्राम सभेचे अधिकार (Powers of Gram Sabha))** | **अनिवार्य सल्लामसलत**<br>❍ जमिनीचे संपादन.<br>❍ गौण खनिजांसाठी (Minor Minerals) खाण पट्ट्यांची मंजुरी.<br>❍ लिलावाद्वारे लहान खनिजांच्या शोषणासाठी सवलतीची शिफारस.<br>**थेट अधिकार**<br>❍ दारूबंदी लागू करणे.<br>❍ गौण वनोपज उत्पादनांची (MFP) मालकी.<br>❍ जमिनीचे हस्तांतरण रोखणे.<br>**नियंत्रण:**<br>■ गाव बाजार<br>■ सावकारी<br>■ मद्य सेवन |
| **पंचायत सचिव (Panchayat Secretary)** | ❍ In-charge of Panchayat office<br>❍ Woपंचायत कार्यालयाचा प्रभारी.<br>❍ सरपंचाच्या थेट देखरेखीखाली कार्य करतो.<br>❍ तो अर्थसंकल्प (Budget) आणि वार्षिक अहवाल तयार करतो.<br>❍ नोंदी आणि अनुदान-सहाय्यता नोंदणी ठेवतो.<br>❍ कामाच्या ठिकाणांची तपासणी करतो. |

Why? : self Governance → decide their own future
↓
Democratic decentralisation.
+
self Assertion rights.

2018 ↓ 9th भागाचे exception.

**64.** खालील विधाने लक्षात घ्या :

अ. राज्यघटनेच्या नवव्या विभागातील तरतूदी ह्या पाचव्या परिशिष्टात समावेश असलेल्या क्षेत्रांस लागू नाहीत.

ब. पाचव्या परिशिष्टांत समाविष्ट असणाऱ्या क्षेत्रात सात राज्यांचा समावेश होतो. ← सध्या (10) राज्य.

क. 1996 मध्ये संसदेने अश्या क्षेत्रांसाठी PESA कायदा मंजूर केला. → Panchayat extention to schedule areas.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने अचूक आहेत ?

(1) अ आणि ब (2) अ आणि क (3) फक्त अ (4) वरील सर्व




Consider the following statements :

a. The provisions of Part IX of the Constitution relating to the Panchayats are not applicable to the Fifth Schedule Areas.

b. At present seven states have Fifth Schedule Areas.

c. The Parliament has enacted the PESA Act in 1996 for such areas.

Which of the above statements is/are correct ?

(1) a and b (2) a and c (3) Only a (4) All of the above

90. 73व्या घटनेदुरुस्तीनुसार पंचायती संस्थांच्या रचनेबद्दलच्या कोणत्या तरतुदी राज्य सरकारांसाठी ऐच्छिक आहेत ?

(a) 2 - 3 स्तरीय रचना

(b) निश्चित कार्यकाळ

(c) ग्राम सभेची भूमिका व व्याप्ती

(d) जिल्हा नियोजन समिती

(1) (c) व (d) (2) (a) व (b) (3) (b) व (d) (4) (a) व (c)

According to the 73rd Amendment which of the following are optional provisions left to the state governments regarding organisation of Panchayati Institutions ?

(a) 2 - 3 tier structure

(b) Fixed tenure

(c) Role and scope of Gram Sabha

(d) District Planning Committees

(1) (c) and (d) (2) (a) and (b) (3) (b) and (d) (4) (a) and (c)

2017

म्हणजे compulsory ?

82. पंचायतीराज वर 73 व्या घटनादुरूस्तीमध्ये समावेश असलेल्या, खालीलपैकी कोणत्या तरतूदी ह्या ऐच्छिक तरतूदी *नाहीत* ?

अ. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांचे लोकप्रतिनिधी मतदारांद्वारे प्रत्यक्षरीत्या निवडले जातील.

ब. पंचायत राज्य संस्थांना आर्थिक अधिकार देणे, ज्यामध्ये त्यांना कर, जकाती व पथकर लावण्याचा, वसूल करण्याचा आणि वापरण्याचा अधिकार समाविष्ट असेल.

Art 243(H) ↓ Voluntary for States to decide whether to give Panchayats taxation powers.

क. पंचायत राज्य संस्थांची निवडणूक लढविण्यासाठी 21 वर्षे ही किमान वयोमर्यादा असेल.

ड. स्थानिक खासदार व आमदारांना त्यांच्या मतदारसंघात असणाऱ्या पंचायत राज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्व देण्यात यावे.

(1) फक्त अ आणि क (2) फक्त ब आणि क

(3) फक्त ब आणि ड (4) फक्त अ आणि ड

Which of the following are *not* the voluntary provisions of the 73rd Amendment Act on Panchayati Raj ?

a. Direct elections to all seats in Panchayats at the village, intermediate and district level.

b. Granting financial powers to the Panchayats that is authorising them to levy, collect and appropriate taxes, duties, tolls and fees.

c. 21 years to be the minimum age for contesting elections to panchayats.

d. Giving representation to Members of the Parliament and the State Legislature in the Panchayats at different levels falling within their constituencies.

(1) Only a and c (2) Only b and c

(3) Only b and d (4) Only a and d

## नगर पालिका ( भाग IX-A | 12 वे परिशिष्ट )

### ■ 74 वी घटनादुरुस्ती कायदा, 1992

**एतिहासिक पार्श्वभूमी (भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था)**

- मेयो ठराव (Mayo Resolution), 1870 → स्थानिक स्व-शासनाची सुरुवात.
- रिपन ठराव (Ripon Resolution), 1882
  - याला "स्थानिक स्व-शासनाचा मॅग्ना कार्टा" म्हटले जाते.
  - लॉर्ड रिपन = भारतातील स्थानिक स्व-शासनाचे जनक.
- विकेंद्रीकरणावरील शाही आयोग (Royal Commission on Decentralisation), 1908

## घटनात्मक स्थान (Constitutional Position)

- घटनेत भाग IX-A (कलम 243P–243ZG) समाविष्ट केला.
- 12 वे परिशिष्ट (Schedule) जोडले → यात नगरपालिकांच्या 18 कार्यात्मक बाबी (functional items) आहेत.
- उद्दिष्ट: नागरी स्थानिक स्व-शासन आणि लोकशाही विकेंद्रीकरण

## प्रशासकीय नियंत्रण – "3 मंत्रालयांद्वारे हाताळले जाते"

नगर विकास मंत्रालय (MoUD / MoHUA)
  - राज्यांमधील नगरपालिकांशी संबंधित.
  - नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मुख्य मंत्रालय.
- संरक्षण मंत्रालय
  - कँटोन्मेंट बोर्डांशी (CB) संबंधित.
  - कारण कँटोन्मेंट ही संरक्षण आस्थापने आहेत.
- गृह मंत्रालय
  - केंद्रशासित प्रदेशांमधील (UTs) नगरपालिकांशी संबंधित.
  - कारण केंद्रशासित प्रदेशांचा कारभार केंद्राद्वारे चालतो.

## स्थानिक शहरी स्वराज्य संस्थांचे प्रकार (केवळ 3 – घटनात्मक मान्यताप्राप्त)

- नगर पंचायत (Nagar Panchayat)
  - संक्रमण क्षेत्रांसाठी (ग्रामीण → शहरी) (Transitional Areas).
- नगर परिषद (Municipal Council)
  - लहान नागरी क्षेत्रांसाठी (Smaller Urban Areas).
- महानगरपालिका (Municipal Corporation)
  - मोठ्या नागरी क्षेत्रांसाठी (Larger Urban Areas).

**वर्गीकरणाचे निकष (Criteria for classification):**

लोकसंख्या, लोकसंख्या घनता, व्युत्पन्न महसूल, बिगर-शेती कामांमधील रोजगाराची टक्केवारी (राज्यपाल सार्वजनिक अधिसूचनेद्वारे निश्चित करतात.)

| | |
|---|---|
| **रचना आणि निवडणुका** | ○ सर्व सदस्य प्रभागातून थेट निवडले जातात.<br>○ नगरपालिका क्षेत्र प्रभागांमध्ये विभागले जाते.<br>○ प्रभाग समित्या (Ward Committees):<br>■ ज्या ठिकाणी लोकसंख्या 3 लाख पेक्षा जास्त आहे, तेथे अनिवार्य आहे.<br>○ अध्यक्ष/महापौर (Chairperson/Mayor) यांच्या निवडणुकीची पद्धत:<br>■ राज्य विधानमंडळाने निश्चित केल्यानुसार. |
| **प्रतिनिधित्व (एच्छिक – राज्य विधानमंडळ तरतूद करू शकते) (Optional)** | ○ राज्य विधानमंडळ खालील व्यक्तींसाठी प्रतिनिधित्व प्रदान करू शकते<br>■ नगरपालिका प्रशासनात विशेष ज्ञान/अनुभव असलेले व्यक्ती (मतदानाचा अधिकार नाही).<br>■ लोकसभा/राज्य विधानसभा सदस्य.<br>■ राज्यसभा/विधान परिषद सदस्य जे नगरपालिका क्षेत्रात मतदार म्हणून नोंदणीकृत आहेत.<br>■ समित्यांचे अध्यक्ष (प्रभाग समित्या वगळता). |
| **आरक्षणाच्या तरतुदी** | ○ SC/ST जागा → लोकसंख्येच्या प्रमाणात.<br>○ महिला → एकूण जागांच्या (अध्यक्षांसह) किमान 1/3rd (एक-तृतीयांश).<br>○ अध्यक्षांसाठी आरक्षण → राज्य विधानमंडळाने (State Legislature) ठरवल्यानुसार. |

| | |
|---|---|
| **कार्यकाळ** | ❍ प्रत्येक नगरपालिकेसाठी 5 वर्षांचा कार्यकाळ.<br>❍ मुदतीपूर्वी विसर्जित झाल्यास → 6 महिन्यांच्या आत नवीन निवडणुका.<br>❍ पुनर्गठित संस्था फक्त मूळ कार्यकाळाच्या उर्वरित कालावधीसाठी कार्य करते. |
| **वगळलेली क्षेत्रे (नगरपालिका लागू नाहीत)** | ❍ पाचव्या अनुसूची (Fifth Schedule) क्षेत्रे.<br>❍ सहाव्या अनुसूची (Sixth Schedule) क्षेत्रे.<br>❍ दार्जिलिंग गोरखा हिल कौन्सिल (Darjeeling Gorkha Hill Council - DGHC) (प. बंगाल). |
| **नियोजन समित्या (Planning Committees)** | **1. जिल्हा नियोजन समिती (District Planning Committee - DPC) (अनुच्छेद 243ZD)**<br>**उद्दिष्ट:**<br>❍ पंचायती आणि नगरपालिकांच्या योजनांचे एकत्रीकरण.<br>❍ जिल्ह्यासाठी विकास योजनेचा मसुदा तयार करणे.<br>**रचना:**<br>❍ 4/5th सदस्य पंचायती आणि नगरपालिकांच्या निवडून आलेल्या सदस्यांद्वारे निवडले जातात.<br>**अध्यक्ष:**<br>❍ योजना राज्य शासनाकडे (State Government) पाठवतो.<br>❍ तपशील (रचना, निवडणूक इ.) → राज्य विधानमंडळाने (State Legislature) ठरवल्यानुसार.<br>**2. महानगर नियोजन समिती (अनुच्छेद 243ZE)**<br>❍ महानगर क्षेत्रांसाठी लागू.<br>**कार्य:**<br>❍ विकास योजनेचा मसुदा तयार करणे.<br>**रचना:**<br>❍ 2/3rd सदस्य महानगर क्षेत्रातील नगरपालिकांचे निवडून आलेले सदस्य + पंचायत अध्यक्षांद्वारे निवडले जातात. |
| **स्थानिक शासनाची केंद्रीय परिषद (Central Council of Local Government)** | ❍ 1954 मध्ये अनुच्छेद 263 अंतर्गत स्थापन (Article 263)<br>❍ 1958 पर्यंत → ग्रामीण आणि नागरी दोघेही.<br>❍ 1958 नंतर → केवळ नागरी स्थानिक संस्था.<br>❍ अध्यक्ष: गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्री<br>❍ सदस्य: राज्यांचे स्थानिक स्व-शासन मंत्री |

## ■ नागरी शासनाचे प्रकार (गैर-घटनात्मक / वैधानिक)

| | |
|---|---|
| **महानगरपालिका (Municipal Corporation)** | ❍ मोठ्या शहरांसाठी (दिल्ली, मुंबइ, कोलकाता, चेन्नइ, बेंगळुरू, इ.)<br>❍ प्राधिकरणे<br>  ■ परिषद<br>  ■ स्थायी समित्या<br>  ■ आयुक्त<br>❍ महापौर (Mayor):<br>  ■ परिषदेचे प्रमुख<br>  ■ 1 वर्षाच्या नूतनीकरणयोग्य मुदतीसाठी निवडलेले (बहुतांशी)<br>❍ महानगरपालिका आयुक्त:<br>  ■ राज्य शासनाकडून नियुक्त<br>  ■ सामान्यतः IAS अधिकारी |

| | |
|---|---|
| **नगरपालिका (Municipality)** | ❍ शहरे आणि लहान शहरांसाठी.<br>❍ मुख्य महानगरपालिका अधिकारी (CMO) / CEO द्वारे दैनंदिन प्रशासन.<br>❍ राज्य शासनाकडून नियुक्त. |
| **अधिसूचित क्षेत्र समिती (Notified Area Committee)** | ❍ यासाठी:<br>  ■ वेगाने विकसित होणारे औद्योगिक शहर, किंवा<br>  ■ नगरपालिकेसाठी अद्याप पात्र नसलेले क्षेत्र.<br>❍ पूर्णपणे नामनिर्देशित संस्था (Nominated body).<br>❍ सर्व सदस्य + अध्यक्ष → राज्य शासनाकडून नियुक्त. |
| **शहर क्षेत्र समिती (Town Area Committee)** | ❍ लहान शहरांसाठी.<br>❍ अर्ध-नगरपालिका प्राधिकरण (Semi-municipal authority).<br>❍ मर्यादित कार्ये: रस्ते, निचरा, पथदिवे, स्वच्छता.<br>❍ राज्य विधानमंडळाच्या (State Legislature) स्वतंत्र कायद्याने तयार. |
| **कँटोन्मेंट बोर्ड (Cantonment Board)** | ❍ कँटोन्मेंट्स ऍक्ट, 2006 (Central Law) द्वारे शासित.<br>❍ कँटोन्मेंटमधील नागरी क्षेत्रांसाठी.<br>❍ रचना:<br>  ■ अंशतः निवडलेले + अंशतः नामनिर्देशित<br>❍ कार्यकाळ:<br>  ■ निवडलेले सदस्य → 5 वर्षे.<br>  ■ नामनिर्देशित सदस्य → त्यांच्या पदावर असेपर्यंत कार्यरत. |
| **टाऊनशिप (Township)** | ❍ मोठ्या सार्वजनिक उपक्रमांद्वारे (Public Enterprises) स्थापित<br>❍ कर्मचारी आणि कामगारांच्या निवासी क्षेत्रांसाठी.<br>❍ निवडलेले सदस्य नाहीत. |
| **पोर्ट ट्रस्ट (Port Trust)** | ❍ बंदर शहरांमध्ये (मुंबइ, कोलकाता, चेन्नइ, इ.) स्थित.<br>❍ संसदेच्या (Parliament) कायद्याने तयार.<br>❍ कार्ये:<br>  ■ बंदरांचे व्यवस्थापन व संरक्षण.<br>  ■ नागरी सुविधा पुरवणे. |

2021

**81.** भारतीय राज्यघटनेतील 1992 च्या 74 व्या घटनादुरुस्ती कायद्याप्रमाणे शहरी भारतात ________ प्रकारच्या नगरपालिका आहेत.

(1) दोन (2) तीन (3) चार (4) पाच

According to the $74^{th}$ amendment act, 1992 of the Indian Constitution there are ________ types of Municipalities in urban India.

(1) two (2) three (3) four (4) five

2025 32 E21

71. खालीलपैकी कोणत्या घटना दुरुस्ती कायद्याने 'महानगर नियोजन समितीच्या' स्थापनेची तरतूद केली आहे ?

(1) 42 वा घटना दुरुस्ती कायदा

(2) 44 वा घटना दुरुस्ती कायदा

(3) 73 वा घटना दुरुस्ती कायदा

(4) 74 वा घटना दुरुस्ती कायदा

Which of the following Constitution Amendment Acts provided for the formation of the 'Metropolitan Planning Committee'?

(1) 42nd Constitution Amendment Act

(2) 44th Constitution Amendment Act

(3) 73rd Constitution Amendment Act

(4) 74th Constitution Amendment Act

CHAPTER

18

# केंद्रशासित प्रदेश (UNION TERRITORIES)

| केंद्रशासित प्रदेश (UNION TERRITORIES) (भाग VIII \| अनुच्छेद 239–241) | |
|---|---|
| **घटनात्मक आधार** | ❍ घटनेचा भाग VIII केंद्रशासित प्रदेशांशी (UTs) संबंधित आहे<br>❍ अनुच्छेद 239 ते 241 अंतर्गत समाविष्ट आहेत<br>❍ अनुच्छेद 1: भारताच्या क्षेत्रात समाविष्ट आहेत: राज्ये (States)<br>■ केंद्रशासित प्रदेश (UTs)<br>■ भारत सरकारने कोणत्याही वेळी संपादन केलेले प्रदेश. |
| **एतिहासिक पार्श्वभूमी** | ❍ ब्रिटिश राजवटीत, काही क्षेत्रांना "अनुसूचित जिल्हे (Scheduled Districts)" (1874) म्हणून नियुक्त केले होते.<br>❍ नंतर त्यांना मुख्य आयुक्तांचे प्रांत (Chief Commissioner's Provinces) म्हटले गेले.<br>❍ 1956 मध्ये, खालील कायद्यांद्वारे या क्षेत्रांना औपचारिकपणे केंद्रशासित प्रदेश (UTs) म्हणून घोषित केले गेले:<br>■ 7 वी घटनादुरुस्ती कायदा, 1956<br>■ राज्य पुनर्रचना कायदा, 1956 |
| **पूर्वीचे केंद्रशासित प्रदेश (आता राज्ये)** | ❍ खालील प्रदेश पूर्वी केंद्रशासित प्रदेश होते:<br>■ हिमाचल प्रदेश<br>■ मणिपूर<br>■ त्रिपुरा<br>■ मिझोराम<br>■ अरुणाचल प्रदेश<br>■ गोवा |
| **केंद्रशासित प्रदेशांची प्रशासकीय वैशिष्ट्ये** | ❍ सर्व केंद्रशासित प्रदेशांसाठी एकसमान प्रशासन व्यवस्था नाही.<br>❍ प्रत्येक केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासन केंद्राद्वारे थेट चालवले जाते. |
| **कायदेविषयक अधिकार** | ❍ केंद्रशासित प्रदेशांसाठी कायदे करण्याचा सर्वोच्च अधिकार संसदेला आहे.<br>❍ केंद्रशासित प्रदेशात विधानसभा असली तरी, संसद कोणत्याही विषयावर कायदा करू शकते.<br>❍ एखाद्या केंद्रशासित प्रदेशाच्या कायद्याला राष्ट्रपतींची संमती मिळाल्यास, तो तात्पुरता प्रभावी राहतो, परंतु संसद तो नंतर रद्द करू शकते. |
| **राष्ट्रपतींचे नियमन (President's Regulations)** | ❍ राष्ट्रपती काही केंद्रशासित प्रदेशांसाठी नियम (Regulations) बनवू शकतात.<br>❍ हे नियम:<br>■ संसदेच्या कायद्यासारखीच ताकद ठेवतात. संसदेचा कोणताही कायदा रद्द किंवा सुधारित करू शकतात.<br>❍ लागू केंद्रशासित प्रदेश (Applicable UTs):<br>■ अंदमान आणि निकोबार बेटे दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव लक्षद्वीप<br>❍ पुडुचेरी:<br>■ विधानसभा निलंबित (suspended) किंवा विसर्जित (dissolved) असतानाच राष्ट्रपतींचे नियम लागू होतात. |

| | |
|---|---|
| **केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासन** | ❍ केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासन राष्ट्रपतींद्वारे , प्रशासकामार्फत केले जाते.<br>❍ प्रशासकाचे पदनाम असू शकते:<br>■ लेफ्टनंट गव्हर्नर (Lieutenant Governor)<br>■ मुख्य आयुक्त (Chief Commissioner)<br>■ प्रशासक (Administrator)<br>❍ सध्याचे (At present):<br>■ लेफ्टनंट गव्हर्नर (Lieutenant Governor):<br>❍ दिल्ली<br>❍ पुडुचेरी<br>❍ अंदमान आणि निकोबार बेटे<br>❍ जम्मू आणि काश्मीर<br>❍ लडाख<br>■ प्रशासक (Administrator):<br>❍ चंदीगड<br>❍ दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव<br>❍ लक्षद्वीप |
| **विधानसभा असलेले केंद्रशासित प्रदेश** | ❍ केवळ तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये खालील बाबी आहेत:<br>■ विधानसभा<br>■ मंत्री परिषद<br>■ मुख्यमंत्री<br>❍ ते आहेत:<br>■ पुडुचेरी (1963)<br>■ दिल्ली (1992)<br>■ जम्मू आणि काश्मीर (2019) |
| **केंद्रशासित प्रदेशांवर उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र** | ❍ केंद्रशासित प्रदेशांची स्वतंत्र उच्च न्यायालये नसतात.<br>❍ अधिकार क्षेत्र खालीलप्रमाणे नियुक्त केले आहे:<br>■ बॉम्बे उच्च न्यायालय: दादरा आणि नगर हवेली; दमण आणि दीव<br>■ कलकत्ता उच्च न्यायालय: अंदमान आणि निकोबार बेटे<br>■ पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालय: चंदीगड<br>■ केरळ उच्च न्यायालय: लक्षद्वीप<br>■ मद्रास उच्च न्यायालय: पुडुचेरी<br>■ जम्मू आणि काश्मीर उच्च न्यायालय: जम्मू आणि काश्मीर आणि लडाख (Common HC) |

## ■ दिल्लीसाठी विशेष तरतुदी (राष्ट्रीय राजधानी क्षेत्र - NCT)

| | |
|---|---|
| **घटनात्मक दर्जा** | ❍ 69 वी घटनादुरुस्ती कायदा, 1991<br>❍ दिल्लीला राष्ट्रीय राजधानी क्षेत्र (NCT) म्हणून पुनर्नामित केले. |
| **कार्यकारिणी आणि विधिमंडळ (Executive and Legislature)** | ❍ दिल्लीमध्ये<br>■ विधानसभा<br>■ मंत्री परिषद<br>❍ तसेच लेफ्टनंट गव्हर्नर हे प्रशासक आहेत. |

| | |
|---|---|
| मंत्री परिषदेची नियुक्ती (Appointment of Council of Ministers) | ❍ मुख्यमंत्री: राष्ट्रपतींद्वारे नियुक्त.<br>❍ इतर मंत्री: मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपतींद्वारे नियुक्त.<br>❍ मंत्री राष्ट्रपतींच्या इच्छेनुसार पद धारण करतात. |
| मंत्री परिषदेची नियुक्ती (Appointment of Council of Ministers) | ❍ मुख्यमंत्री: राष्ट्रपतींद्वारे नियुक्त.<br>❍ इतर मंत्री: मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपतींद्वारे नियुक्त.<br>❍ मंत्री राष्ट्रपतींच्या इच्छेनुसार पद धारण करतात. |
| अध्यादेश जारी करण्याचा अधिकार (Ordinance-Making Power) | ❍ लेफ्टनंट गव्हर्नर अध्यादेश जारी करू शकतात:<br>■ केवळ राष्ट्रपतींच्या पूर्वपरवानगीने.<br>❍ खालील परिस्थितीत अध्यादेश जारी करू शकत नाहीत:<br>■ विधानसभा विसर्जित (dissolved) किंवा निलंबित (suspended) असताना. |
| दिल्लीमध्ये राष्ट्रपती राजवट (President's Rule in Delhi) | ❍ अनुच्छेद 239AB:<br>■ राष्ट्रपती दिल्लीमध्ये घटनात्मक यंत्रणा निलंबित करू शकतात.<br>■ अनुच्छेद 356 प्रमाणेच, पण दिल्लीसाठी विशिष्ट. |
| लेफ्टनंट गव्हर्नरचे अधिकार | ❍ कार्ये'<br>■ विधानसभेला बोलावणे (Summon)<br>■ विधानसभेची बैठक समाप्त करणे (Prorogue)<br>■ विधानसभा विसर्जित करणे (Dissolve)<br>❍ विधानसभेला संबोधित करतात:<br>■ निवडणुकीनंतरचे पहिले सत्र<br>■ प्रत्येक वर्षाचे पहिले सत्र |
| राष्ट्रपती निवडणुकीतील प्रतिनिधित्व | ❍ 70 वी घटनादुरुस्ती कायदा:<br>❍ दिल्ली विधानसभेचे निवडून आलेले सदस्य राष्ट्रपती निवडणुकीत भाग घेतात. |
| एल्डरमेन (Aldermen) | ❍ LG द्वारे नामनिर्देशित.<br>❍ 10 (मंत्री परिषदेच्या सल्ल्याशिवाय).<br>❍ बैठकांमध्ये मतदान करत नाहीत. |

2017

**74.** राष्ट्रीय राजधानी प्रदेश दिल्ली संबंधी संदर्भ ________ मध्ये सापडतात.

(1) अनुच्छेद 239 A

(2) अनुच्छेद 239 AA

(3) अनुच्छेद 239 AB

(4) अनुच्छेद 239 B

The reference to National Capital Territory of Delhi is found in

(1) Article 239 A

(2) Article 239 AA

(3) Article 239 AB

(4) Article 239 B

2024

82. कोणत्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे दिल्लीला राष्ट्रीय राजधानी क्षेत्र म्हटले गेले ?

(1) 63 वी घटनादुरुस्ती कायदा (2) 69 वी घटनादुरुस्ती कायदा

(3) 91 वी घटनादुरुस्ती कायदा (4) 93 वी घटनादुरुस्ती कायदा

Delhi was called National Capital Territory by which Constitution Amendment Act ?

(1) 63rd Constitutional Amendment Act (2) 69th Constitutional Amendment Act

(3) 91st Constitutional Amendment Act (4) 93rd Constitutional Amendment Act

CHAPTER

19

# अनुसूचित आणि आदिवासी क्षेत्रे

## अनुसूचित आणि आदिवासी क्षेत्रे (SCHEDULED & TRIBAL AREAS) (भाग X | अनुच्छेद 244)

### घटनात्मक तरतूद (Constitutional Provision)

- अनुच्छेद 244 (भाग X) खालीलसाठी विशेष प्रशासन प्रणाली प्रदान करतो:
  - अनुसूचित क्षेत्रे (Scheduled Areas)
  - आदिवासी क्षेत्रे (Tribal Areas)

### पाचवी अनुसूची (FIFTH SCHEDULE) (अनुसूचित क्षेत्रे)

| | |
|---|---|
| **क्षेत्रीय लागूता (Territorial Applicability)** | ❍ पुढील राज्यांव्यतिरिक्त सर्व राज्यांना लागू:<br>■ आसाम<br>■ मेघालय<br>■ त्रिपुरा<br>■ मिझोराम<br>❍ उद्देश: आदिवासी हितांचे संरक्षण, विशेषतः:<br>■ आदिवासी जमीन बिगर-आदिवासींकडे हस्तांतरित करण्यास प्रतिबंध \) |
| **अनुसूचित क्षेत्रांची घोषणा आणि बदल** | ❍ राष्ट्रपती<br>■ अनुसूचित क्षेत्रे घोषित करतात.<br>■ सीमा बदलू शकतात.<br>❍ राज्याच्या राज्यपालांशी सल्लामसलत करून केले जाते. |
| **कार्यकारी अधिकार** | ❍ राज्याचा कार्यकारी अधिकार अनुसूचित क्षेत्रांपर्यंत विस्तारित होतो.<br>❍ राज्यपालांनी प्रशासनाबाबतचा वार्षिक अहवाल राष्ट्रपतींना सादर करणे आवश्यक आहे.<br>❍ केंद्र सरकार राज्याला प्रशासनाबाबत निर्देश देऊ शकते. |
| **आदिवासी सल्लागार परिषद (Tribal Advisory Council - TAC)** | ❍ 20 सदस्य. 3/4th सदस्य राज्य विधानसभेतील आमदार (MLAs) असणे आवश्यक.<br>❍ कार्य: अनुसूचित जमातींच्या कल्याणाशी संबंधित बाबींवर सल्ला देणे.<br>❍ टीप:<br>■ TAC ची स्थापना अनुसूचित क्षेत्र नसलेल्या राज्यातही, राष्ट्रपतींनी निर्देशित केल्यास, केली जाऊ शकते. |

| | |
|---|---|
| **कायद्याची लागूता आणि राज्यपालांचे अधिकार** | ❍ राज्यपाल खालीलसाठी नियम बनवू शकतात<br>■ अनुसूचित क्षेत्रांची शांतता आणि सुशासन<br>❍ असे नियम:<br>■ TAC शी सल्लामसलत केल्यानंतर बनवले जातात.<br>■ त्यांना राष्ट्रपतींची संमती (assent) आवश्यक असते.<br>■ संसदेचा कोणताही कायदा किंवा राज्य विधानमंडळाचा कायदा रद्द किंवा सुधारित) करू शकतात<br>❍ राज्यपाल करू शकतात:<br>■ STs द्वारे किंवा त्यांच्या दरम्यान जमिनीचे हस्तांतरण प्रतिबंधित करणे<br>■ STs शी संबंधित सावकारीचा (money-lending) व्यवसाय नियंत्रित करणे. |

## ■ सहावी अनुसूची (SIXTH SCHEDULE) (आदिवासी क्षेत्रे)

| | |
|---|---|
| **क्षेत्रीय विस्तार** | ❍ इशान्येकडील चार राज्यांना लागू:<br>■ आसाम<br>■ मेघालय<br>■ त्रिपुरा<br>■ मिझोराम |
| **प्रशासनाचा स्वरूप** | ❍ आदिवासी क्षेत्रे स्वायत्त जिल्हे म्हणून संघटित केली जातात.<br>❍ ती राज्याच्या कार्यकारी अधिकाराच्या बाहेर नसतात.<br>❍ परंतु त्यांचे प्रशासन थेट राज्यपालांद्वारे केले जाते. |
| **क्षेत्र व्यवस्थापन** | ❍ राज्यपाल (Governor):<br>■ स्वायत्त जिल्ह्यांचे क्षेत्र वाढवू किंवा कमी करू शकतात,<br>■ स्वायत्त प्रदेश (Autonomous Regions) तयार करू किंवा बदलू शकतात. |
| **जिल्हा आणि प्रादेशिक परिषदा (District & Regional Councils)** | ❍ जिल्हा परिषद (District Council - DC):<br>■ 30 सदस्य (26 निवडलेले + 4 नामनिर्देशित).<br>■ कार्यकाळ: 5 वर्षे.<br>❍ प्रादेशिक परिषद :RC<br>■ ज्या जिल्ह्यांमध्ये विविध जमाती आहेत तेथे तयार केली जाते<br>■ प्रत्येक स्वायत्त प्रदेशाची वेगळी प्रादेशिक परिषद असते. |
| **कायदेविषयक अधिकार (Legislative Powers)** | ❍ DC आणि RC कायदे करू शकतात, परंतु<br>■ राज्यपालांची संमती (assent) अनिवार्य आहे<br>❍ विषय समाविष्ट आहेत: शाळा बाजारपेठा (Markets)<br>■ सावकारी<br>■ बिगर-आदिवासींद्वारे व्यापार |
| **आर्थिक अधिकार (Financial Powers)** | ❍ DC आणि RC करू शकतात:<br>■ जमीन महसूल ठरवणे आणि गोळा करणे.<br>■ विशिष्ट स्थानिक कर लादणे (Impose local taxes).<br>❍ निधी:<br>■ भारताच्या एकत्रित निधीतून (Consolidated Fund of India - CFI) प्राप्त होतो. |

| | |
|---|---|
| **कायद्यांची लागूता (Applicability of Laws)** | ❍ संसदीय (Parliamentary) आणि राज्याचे कायदे आपोआप लागू होत नाहीत.<br>■ लागूता कार्यकारी अधिकारावर अवलंबून असते:<br>❍ आसाम:<br>■ राज्याचे कायदे → राज्यपाल<br>■ केंद्राचे कायदे → राज्यपाल<br>❍ मेघालय, त्रिपुरा, मिझोराम:<br>■ राज्याचे कायदे → राज्यपाल<br>■ केंद्राचे कायदे → राष्ट्रपती |
| **विसर्जन** | ❍ राज्यपाल जिल्हा किंवा प्रादेशिक परिषदा विसर्जित करू शकतात:<br>■ प्रशासकीय बाबींची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या आयोगाच्या अहवालावर आधारित. |

## ■ पाचव्या आणि सहाव्या अनुसूचीमधील मुख्य फरक

| पाचवी अनुसूची (सर्व राज्ये 4 वगळता) | सहावी अनुसूची ( A, Mz, Tr, MG) |
|---|---|
| ❍ राज्यपालांच्या सल्लामसलतीने राष्ट्रपतींद्वारे घोषित.<br>❍ सल्लागार प्रणाली (Advisory system).<br>❍ राज्यपाल प्रभावी, राष्ट्रपतींची संमती अनिवार्य.<br>❍ स्वतंत्र कायदा-करणारी मंडळे नाहीत.<br>❍ मर्यादित आर्थिक अधिकार.<br>❍ CFI मधून निधी नाही.<br>❍ संस्था: TAC. | ❍ घटनेची निर्मिती.<br>❍ स्वायत्त जिल्हे.<br>❍ खरी सत्ता असलेली जिल्हा आणि प्रादेशिक परिषदे<br>❍ परिषदांना कायदे करण्याचा, कर लावण्याचा आणि न्याय देण्याचा अधिकार.<br>❍ उच्च स्तराची स्वायत्तता (Higher degree of autonomy).<br>❍ CFI मधून निधी.<br>❍ संस्था: जिल्हा परिषद, प्रादेशिक परिषद, स्वायत्त जिल्हे. |

## ■ विशेष श्रेणी दर्जा (SPECIAL CATEGORY STATUS)

- सध्या 11 राज्यांना.
- 1969 पासून सुरुवात झाली.
- डी. आर. गाडगीळ समितीने 1969 मध्ये SCS साठी सूत्र (formula) दिले, ज्यात खालील बाबींचा समावेश होता:
  - डोंगराळ भूभाग (Hilly Terrain)
  - कमी लोकसंख्या घनता आणि/किंवा आदिवासी लोकसंख्येचा मोठा वाटा.
  - सीमावर्ती भागातील धोरणात्मक स्थान
  - आर्थिक आणि पायाभूत सुविधांचा मागासलेपणा .
  - राज्याच्या वित्ताचे न-व्यवहार्यता स्वरूप (Non-viable Nature of State Finances).

CHAPTER 20

# सहकारी संस्था

| सहकारी संस्था (COOPERATIVE SOCIETIES)(घटनेचा भाग IX-B) (Part IX-B of the Constitution) | |
|---|---|
| **कायदेशीर क्षमता** | ❍ सहकारी संस्था राज्य सूचीमध्ये आहेत.<br>❍ त्यामुळे, राज्य विधानमंडळाद्वारे तरतुदी केल्या जातात. |
| **संचालक मंडळ** | ❍ संचालकांची संख्या आणि कार्यकाळ: राज्य विधानमंडळाने प्रदान केल्यानुसार.<br>❍ कमाल सदस्यसंख्या:<br>■ २१ संचालक.<br>❍ मंडळातील आरक्षण:<br>■ अनुसूचित जाती/जमातीसाठी १ जागा.<br>■ महिलांसाठी २ जागा.<br>❍ मंडळाचा कार्यकाळ<br>■ ५ वर्षे. |
| **सदस्यांचे सह-सदस्यत्व** | ❍ सह-सदस्यत्व (को-ऑप्शन) साठी तरतूद:<br>■ राज्य विधानमंडळाने प्रदान केल्यानुसार.<br>■ कमाल: २ सह-सदस्य. |
| **निवडणुका** | ❍ निवडणुका आयोजित करणारी संस्था:<br>■ राज्य विधानमंडळाने निश्चित केलेली प्राधिकरण<br>❍ महत्त्वाचे:<br>■ राज्य निवडणूक आयोगाद्वारे (SEC) थेट नाही. |
| **मंडळाचे विसर्जन / निलंबन** | ❍ खालील सहकारी संस्थांमध्ये परवानगी नाही:<br>■ जिथे शासनाचे कोणतेही भागभांडवल (शेअरहोल्डिंग) नाही.<br>■ जिथे शासनाचे कोणतेही कर्ज नाही.<br>■ जिथे शासनाची कोणतीही आर्थिक मदत नाही |
| **लेखापरीक्षण आणि लेखे** | ❍ लेखापरीक्षणाच्या तरतुदी:<br>■ राज्य विधानमंडळाने निश्चित केल्यानुसार.<br>❍ कालमर्यादा:<br>■ आर्थिक वर्ष संपल्यानंतर ६ महिन्यांच्या आत लेखापरीक्षण पूर्ण करणे आवश्यक.<br>❍ लेखापरीक्षण अहवाल:<br>■ शिखर सहकारी संस्थेचा लेखापरीक्षण अहवाल.<br>■ राज्य विधानमंडळासमोर सादर करणे. |
| **विवरणपत्रे** | ❍ विवरणपत्रे (रिटर्न्स) दाखल करणे:<br>■ राज्य शासनाने निश्चित केलेल्या प्राधिकरणाकडे. |
| **बहु-राज्य सहकारी संस्था** | ❍ कायद्याचा वापर:<br>■ राज्य विधानमंडळ > संसद.<br>■ राज्य शासन > भारत सरकार. |

CHAPTER 21

# राजभाषा

| राजभाषा (अनुच्छेद 343–351, भाग XVII) | |
|---|---|
| **संघाची भाषा** | **अनुच्छेद 343**<br>❍ संघाची राजभाषा: देवनागरी लिपीतील हिंदी.<br>❍ अंकांचे स्वरूप: भारतीय अंकांचे आंतरराष्ट्रीय स्वरूप.<br>❍ राजभाषा आयोग: बी. जी. खेर आयोग (1956). |
| **प्रादेशिक / राज्य भाषा** | ❍ राज्य विधानमंडळ राज्याची राजभाषा म्हणून एक किंवा अधिक भाषा स्वीकारू शकते.<br>❍ राज्याने अन्यथा निर्णय घेइपर्यंत इंग्रजी राजभाषा म्हणून चालू राहील<br>❍ निवड 8 व्या अनुसूचीतील भाषांपुरती मर्यादित नाही.<br>**अनुच्छेद 347**<br>❍ राज्याच्या लोकसंख्येतील महत्त्वपूर्ण भागाला एखाद्या भाषेचा वापर हवा असल्याची राष्ट्रपतींची खात्री झाल्यास:<br>❍ त्या भाषेला त्या राज्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अधिकृतपणे मान्यता दिली जाऊ शकते. |
| **न्यायव्यवस्थेची भाषा** | **अनुच्छेद 348**<br>❍ संसद जोपर्यंत अन्यथा तरतूद करत नाही:<br>❍ इंग्रजीचा वापर खालील ठिकाणी केला जाइल:<br>■ सर्वोच्च न्यायालयाचे कामकाज. प्रत्येक उच्च न्यायालयाचे कामकाज<br>■ केंद्र आणि राज्यांची विधेयके, अधिनियम, अध्यादेश, नियम, विनियम, उपनियम. उच्च न्यायालयासाठी अपवाद<br>❍ राज्यपाल, राष्ट्रपतींच्या संमतीने, खालील गोष्टींसाठी अधिकृत करू शकतात:<br>■ उच्च न्यायालयाच्या कामकाजात हिंदी किंवा इतर कोणत्याही राजभाषेचा वापर<br>❍ खालील गोष्टींसाठी परवानगी नाही:<br>■ निर्णय.<br>■ आदेश.<br>❍ (निर्णय/आदेश इंग्रजीतच राहणे आवश्यक आहे.) |
| **कायद्याची भाषा** | **राज्य विधानमंडळ खालील गोष्टींसाठी कोणतीही भाषा विहित करू शकते**<br>❍ विधेयके.<br>❍ अधिनियम.<br>❍ नियम.<br>❍ उपनियम. |
| **विशेष निर्देश (अनुच्छेद 350–351)** | **अनुच्छेद 350**<br>❍ निवेदनांचा हक्क:<br>■ कोणतीही व्यक्ती संघ किंवा राज्यात वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही भाषेत निवेदन सादर करू शकते. |

<table>
<tr><td></td><td>

**अनुच्छेद 350-A**

- मातृभाषेत शिक्षण:
  - प्रत्येक राज्य आणि स्थानिक प्राधिकरण भाषिक अल्पसंख्याकांच्या मुलांसाठी प्राथमिक शिक्षण मातृभाषेत देइल.
  - राष्ट्रपती निर्देश देऊ शकतात (7 वा घटनादुरुस्ती कायदा संदर्भ).

**अनुच्छेद 350-B**

- भाषिक अल्पसंख्याकांसाठी विशेष अधिकारी.
  - राष्ट्रपतींद्वारे नियुक्ती.
  - राष्ट्रपतींना अहवाल सादर करतो.

**अनुच्छेद 351**

- संघाचे कर्तव्य:
  - हिंदीच्या प्रसाराला प्रोत्साहन देणे.
  - तिला संपर्क भाषा (लिंग्वा फ्रँका) म्हणून विकसित करणे.

</td></tr>
<tr><td>राजभाषा विषयक संसदीय समिती</td><td>

**राजभाषा विषयक संसदीय समिती**

  - राजभाषा अधिनियम, 1963 अंतर्गत गठित.

**कार्य:**

  - संघाच्या अधिकृत कामांसाठी हिंदीच्या वापराच्या प्रगतीचा आढावा घेणे.

**रचना:**

- 30 सदस्य:
  - 20 लोकसभेतून.
  - 10 राज्यसभेतून.
- अध्यक्ष:
  - सदस्यांकडून निवडला जातो.
  - परंपरेनुसार केंद्रीय गृहमंत्री.

**सचिवालय:**

  - राजभाषा विभाग, गृह मंत्रालयाचे अधीनस्थ कार्यालय.

</td></tr>
<tr><td>आठव्या अनुसूचीतील भाषा (अनुच्छेद 344–351)</td><td>

- 22 भाषा: आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मीरी, कोंकणी, मैथिली, मल्याळम, मणिपुरी, मराठी, नेपाळी, ओडिया, पंजाबी, संस्कृत, संथाली, सिंधी, तमिळ, तेलगू, उर्दू.
- 8 व्या अनुसूचीचा विस्तार:
  - 21 व्या घटनादुरुस्ती कायद्याने, 1967 मध्ये 'सिंधी' जोडली गेली.
  - 71 व्या घटनादुरुस्ती कायद्याने, 1992 मध्ये 'कोंकणी, मणिपुरी, नेपाळी' जोडली गेली.
  - 92 व्या घटनादुरुस्ती कायद्याने, 2003 मध्ये 'बोडो, डोगरी, मैथिली, संथाली' जोडली गेली.
  - 96 व्या घटनादुरुस्ती कायद्याने, 2011 मध्ये ओरियाचे 'ओडिया' असे नामकरण.
- उद्दिष्टे / फायदे:
  - भाषांच्या विकासासाठी शासकीय समर्थन.
  - साहित्य अकादमीकडून मान्यता.
  - विधानसभा आणि संसद वादविवादात वापरण्याची परवानगी.
  - अखिल भारतीय स्पर्धा परीक्षांमध्ये परवानगी.
  - आरबीआय चलन नोटांच्या मूल्यांकनावर भाषा समाविष्ट करू शकते..

</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| **भारतातील अभिजात भाषा** | **धोरण कालक्रम**<br>❍ 2004 – अभिजात भाषा श्रेणी तयार केली.<br>❍ 2005 – अभिजात भाषांसाठी निकष अधिसूचित केले.<br>❍ 2016 – एकूण अभिजात भाषा = 6.<br>❍ 2024 – आणखी 5 भाषा जोडल्या.<br>**पूर्वीच्या अभिजात भाषा (6)**<br>❍ 1. तमिळ – 2004.<br>❍ 2. संस्कृत – 2005.<br>❍ 3. तेलगू – 2008.<br>❍ 4. कन्नड – 2008.<br>❍ 5. मल्याळम – 2013.<br>❍ 6. ओडिया – 2014.<br>**2024 मध्ये जोडलेल्या भाषा (5)**<br>❍ 1. मराठी.<br>❍ 2. पाली.<br>❍ 3. प्राकृत.<br>❍ 4. आसामी.<br>❍ 5. बंगाली.<br>**एकूण अभिजात भाषा = 11**<br>**अभिजात भाषांसाठी निकष (भारत)**<br>❍ उच्च प्राचीनता: 1500-2000 वर्षांपूर्वीचे सुरुवातीचे ग्रंथ/इतिहास.<br>❍ प्राचीन साहित्य: प्राचीन ग्रंथांचा महत्त्वपूर्ण संग्रह.<br>❍ मूळ ज्ञान परंपरा: स्वदेशी साहित्यिक/ज्ञान ग्रंथ, उधार घेतलेले नाही.<br>❍ वेगळेपण: अभिजात स्वरूप आधुनिक वापरापेक्षा वेगळे असणे.<br>**2024 अद्यतन**<br>❍ ज्ञान ग्रंथांमध्ये आता कविता, शिलालेख आणि एपिग्राफ्ससह गद्याचाही स्पष्टपणे समावेश करण्यात आला आहे. |




65. राज्यघटनेच्या कोणत्या कलमामध्ये हिंदी भाषेचा प्रसार वाढवणे, ती भारताच्या संमिश्र संस्कृतीच्या सर्व घटकांना अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून उपयोगाला येईल अशा रीतीने तिचा विकास करण्याची जबाबदारी केंद्र शासनास दिली आहे ?

(1) कलम 343 (2) कलम 348 (3) कलम 350 (4) कलम 351

Which Article of the Constitution provides that it shall be the duty of the Union to promote the spread of the Hindi language, to develop it so that it may become the 'Lingua Franca' of the composite culture of India ?

(1) Article 343 (2) Article 348 (3) Article 350 (4) Article 351

2023

**74.** संसदीय राज भाषा समितीचा/चे मुख्य उद्देश्य खालीलपैकी कोणता/ते आहे/त ?

अ. संघाच्या (Union) अधिकृत उद्दिष्टांसाठी हिंदी भाषेच्या वापरात झालेल्या प्रगतीचा आढावा घेणे आणि हिंदीचा वापर वाढवण्यासाठी शिफारशी करणे.

ब. नवीन घटक राज्यांच्या भाषिक मागण्यांकडे लक्ष देणे आणि त्या संदर्भात सूचना करणे.

क. धोक्यात आलेल्या भाषा ओळखणे आणि त्यांच्या संरक्षणासाठी शिफारशी करणे.

ड. स्थानिक भाषा शिक्षणाचे परीक्षण करणे आणि त्रि-भाषा सूत्राची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिफारशी करणे.

(1) केवळ अ (2) ब, क आणि ड (3) अ आणि ड (4) वरील सर्व

Which of the following is/are the main objective/s of Committee of Parliament on Official language ?

A. To review the progress made in the use of Hindi for official purposes of the Union and to make recommendations to increase the use of Hindi.

B. Looking into the linguistic demands for new States and make suggestions in that regard.

C. Identify the endangered language and make recommendations to protect and preserve them.

D. Examine the vernacular education and make recommendations for effective implementation of the three languages formula.

(1) A only (2) B, C and D (3) A and D (4) All of the above

Est. under Official language Act - 1963.

CHAPTER 22

# सार्वजानिक सेवा

## सार्वजनिक सेवा – घटनात्मक तरतुदी

| | |
|---|---|
| **अखिल भारतीय सेवा (AIS) अधिनियम, 1951** | ❍ केंद्र सरकारला AIS च्या सेवा अटींसंबंधी नियम बनवण्याचे अधिकार देतो.<br>❍ नियम राज्य सरकारांच्या सल्ल्याने तयार केले जातात.<br>❍ AIS अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही केवळ केंद्र सरकारद्वारेच केली जाऊ शकते. |
| **अनुच्छेद 309 – भरती व सेवा अटी** | ❍ संसद (केंद्रीय पदांसाठी) आणि राज्य विधानमंडळ (राज्य पदांसाठी) खालील गोष्टी नियंत्रित करू शकतात:<br>■ भरती<br>■ सेवा अटी<br>❍ कायदे तयार होइपर्यंत, राष्ट्रपती/राज्यपाल नियम बनवू शकतात.<br>❍ राज्याला नागरिक सेवकांच्या मूलभूत अधिकारांवर वाजवी बंधने (reasonable restrictions) लादण्याची मुभा देतो. |
| **अनुच्छेद 310 – 'खुषीचे तत्त्व' (Doctrine of Pleasure)** | ❍ अनुच्छेद 310 – 'खुषीचे तत्त्व' (Doctrine of Pleasure)<br>❍ नागरिक सेवक खालीलपैकी कोणाच्या 'खुषी'नुसार (pleasure) पद धारण करतात:<br>■ राष्ट्रपती → AIS, केंद्रीय सेवा, संरक्षण सेवा<br>■ राज्यपाल → राज्य नागरी सेवा |
| **अनुच्छेद 311 – मनमानी बडतर्फीविरुद्ध संरक्षण** | **'खुषीच्या तत्त्वावर' दोन बंधने घालतो:**<br>❍ अधिकाऱ्यावरील बंधन (Authority Restriction)<br>■ ज्या अधिकाऱ्याने नियुक्ती केली, त्याच्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या अधिकाऱ्याद्वारे नागरिक सेवकाला बडतर्फ केले जाऊ शकत नाही.<br>❍ कार्यपद्धतीचे संरक्षण (Procedural Safeguard)<br>■ खालील गोष्टींशिवाय बडतर्फ, पदमुक्त (removed), किंवा पदावनत (reduced in rank) केले जाऊ शकत नाही:<br>■ योग्य विभागीय चौकशी (proper departmental inquiry), आणि<br>■ बाजू मांडण्याची वाजवी संधी (right to represent).<br>**महत्त्वाची नोंद:**<br>❍ हे संरक्षण केवळ नागरी आणि राज्य सेवांना लागू आहे.<br>❍ संरक्षण कर्मचाऱ्यांना लागू नाही. |
| **अनुच्छेद 311(2) ला अपवाद** | **चौकशी आणि सुनावणी खालील तीन प्रकरणांमध्ये वगळली जाऊ शकते:**<br>❍ गुन्हेगारी आरोपाखाली दोषी आढळल्यास.<br>❍ चौकशी करणे वाजवीरित्या व्यवहार्य (reasonably practicable) नसल्यास:<br>■ शिस्तभंग प्राधिकरणाचे समाधान (Satisfaction of the disciplinary authority).<br>**राज्याच्या सुरक्षिततेच्या हितासाठी:**<br>❍ राष्ट्रपती किंवा राज्यपालांचे समाधान. |

| | |
|---|---|
| **अनुच्छेद 312 – अखिल भारतीय सेवांची निर्मिती** | ❍ राज्यसभा खालील अटींवर नवीन AIS तयार करू शकते:<br>■ उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या 2/3rd बहुमताने ठराव मंजूर झाल्यास.<br>❍ संसद AIS च्या सेवा अटी नियंत्रित करते.<br>❍ अखिल भारतीय न्यायिक सेवेची (AIJS) तरतूद:<br>■ AIJS शी संबंधित कोणताही कायदा अनुच्छेद 368 अंतर्गत घटनादुरुस्ती मानला जात नाही.<br>■ (42nd घटनादुरुस्ती कायद्याद्वारे समाविष्ट). |
| **नागरिक सेवकांची वैयक्तिक संरक्षण (Personal Immunity)** | ❍ संविधान नागरिक सेवकांना शासकीय करारांसाठी (official contracts) वैयक्तिक संरक्षण प्रदान करते.<br>❍ तथापि, जर करार घटनात्मक तरतुदींनुसार केले नसतील, तर अधिकारी:<br>■ वैयक्तिकरित्या जबाबदार (Personally liable) असतो. |

## विशिष्ट वर्गांसाठी विशेष तरतुदी

| | |
|---|---|
| **अनुच्छेद 341 आणि 342 – SC आणि ST** | ■ राष्ट्रपती प्रत्येक राज्य/केंद्रशासित प्रदेशासाठी अनुसूचित जाती (अनुच्छेद 341) आणि अनुसूचित जमाती (अनुच्छेद 342) निर्दिष्ट करण्यासाठी अधिकृत आहेत.<br>■ एकदा अधिसूचित झाल्यावर, केवळ संसदच:<br>■ सूचीमधून कोणतीही जात/जमात समाविष्ट किंवा वगळू शकते.<br>■ अधिसूचनेनंतर राष्ट्रपती सूचीत बदल करू शकत नाहीत.. |
| **मागासलेले वर्ग – घटनात्मक स्थिती** | ❍ संविधानात 'मागासलेले वर्ग' (Backward Classes) ची एकसमान व्याख्या दिलेली नाही.<br>❍ विविध अनुच्छेद वेगवेगळ्या संदर्भात मागासलेपणा हाताळतात. |
| **संबंधित घटनात्मक अनुच्छेद** | **अनुच्छेद 15**<br>❍ सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांसाठी (SEBCs) विशेष तरतुदी.<br>❍ यात SC आणि ST चाही समावेश आहे.<br>❍ मुख्यतः शिक्षण आणि सामाजिक प्रगतीसाठी लागू.<br>**अनुच्छेद 16**<br>❍ नागरिकांच्या मागासलेल्या वर्गांसाठी सार्वजनिक नोकरीत आरक्षण.<br>❍ सेवांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व यावर लक्ष केंद्रित.<br>**अनुच्छेद 46 (DPSP)**<br>❍ खालील घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितांना प्रोत्साहन देतो:<br>■ SC<br>■ ST<br>■ इतर दुर्बळ विभाग<br>❍ सामाजिक अन्याय आणि शोषणापासून संरक्षण आणि उत्थानाचे उद्दिष्ट.<br>**अनुच्छेद 30**<br>❍ अल्पसंख्यांकांशी (मागासलेल्या वर्गांशी नाही) संबंधित आहे.<br>❍ अल्पसंख्यांकांना शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार देतो.<br>❍ अनेकदा गैरसमज होतो, परंतु ही आरक्षणाची तरतूद नाही. |
| **अनुच्छेद 334 – सनसेट कलम** | ❍ खालील गोष्टींसाठी कालमर्यादा (सनसेट कलम) प्रदान करतो:<br>❍ SC आणि ST साठी जागांचे आरक्षण:<br>■ लोकसभा<br>■ राज्य विधानसभा<br>❍ घटनादुरुस्तीद्वारे हा कालावधी वारंवार वाढवण्यात आला आहे. |

CHAPTER

23

# निवडणुका

| निवडणुका (ELECTIONS) अनुच्छेद 324–329) | |
|---|---|
| **अनुच्छेद 324** | ❍ निवडणुकांचे अधीक्षण, मार्गदर्शन आणि नियंत्रण भारताच्या निवडणूक आयोगामध्ये (ECI) निहित.<br>❍ लोकसभा (LS), राज्यसभा (RS), राज्य विधानमंडळे, राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकांना लागू. |
| **अनुच्छेद 325 – मतदार यादी** | ❍ संसद आणि राज्य विधानमंडळांसाठी एकच मतदार यादी.<br>❍ धर्म, वंश, जात, लिंग या कारणांवरून मतदारांच्या समावेशात कोणताही भेदभाव नाही.<br>❍ जन्मस्थान हे वगळण्याचे कारण नाही |
| **अनुच्छेद 326 – प्रौढ मताधिकार** | ❍ सार्वत्रिक प्रौढ मताधिकार (18+).<br>❍ कायद्याने परवानगी दिलेली अपात्रता: अनिवासी (Non-residence), विकृत मन (Unsound mind), गुन्हा (Crime), भ्रष्ट/अवैध कार्यप्रणाली (Corrupt/illegal practices) (NUCCI). |
| **अनुच्छेद 327 – संसदेचे अधिकार** | ❍ संसद, संसद आणि राज्य विधानमंडळाच्या निवडणुकांशी संबंधित सर्व बाबींवर कायदे करू शकते. |
| **अनुच्छेद 328 – राज्य विधानमंडळाचे अधिकार** | ❍ राज्य विधानमंडळ केवळ संसदेने समाविष्ट न केलेल्या बाबींवरच निवडणुकीचे कायदे करू शकते.<br>❍ म्हणून, हा पूरक (supplementary) अधिकार आहे. |
| **अनुच्छेद 329 – न्यायालयांना प्रतिबंध** | **अनुच्छेद 329 – न्यायालयांना प्रतिबंध**<br>❍ मतदारसंघांच्या सीमा निश्चितीस (Delimitation) न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकत नाही.<br>❍ निवडणूक विवाद केवळ निवडणुका झाल्यानंतर निवडणूक याचिकांद्वारे (election petitions) हाताळले जातात. |
| **भारताचा सीमांकन आयोग** | ❍ घटनात्मक आधार: अनुच्छेद 82.<br>❍ प्रत्येक जनगणनेनंतर संसद सीमांकन अधिनियम (Delimitation Act) लागू करते → केंद्र सरकार आयोग स्थापन करते.<br>❍ सदस्य (3):<br>■ सेवानिवृत्त/सेवा करणारे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश – अध्यक्ष<br>■ मुख्य निवडणूक आयुक्त<br>■ राज्याचे निवडणूक आयुक्त<br>❍ कार्य:<br>■ मतदारसंघांची संख्या आणि सीमा निश्चित करणे.<br>■ SC/ST साठी राखीव जागा ओळखणे (राज्याचे प्रतिनिधित्व बदलू शकत नाही).<br>■ आदेश लोकसभा आणि राज्य विधानसभांना लागू होतात → कोणतेही बदल करण्यास परवानगी नाही (अनुच्छेद 329).<br>❍ आतापर्यंतचे आयोग = (4): 1952, 1962, 1972, 2002.<br>❍ 31 वी घटनादुरुस्ती कायदा (CAA): 6 दशलक्षपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या राज्यांना सीमांकन लागू नाही.<br>❍ जम्मू आणि काश्मीर (J&K): राज्याच्या कायद्यानुसार सीमांकन. |

| | |
|---|---|
| **निवडणूक यंत्रणा** | ❍ प्राधिकरण आणि त्यांचे कार्य:<br>■ CEO (मुख्य निवडणूक अधिकारी): राज्य/केंद्रशासित प्रदेशातील निवडणुकांवर देखरेख करतो.<br>■ DEO (जिल्हा निवडणूक अधिकारी): जिल्हा स्तरावर निवडणूक आयोजित करतो.<br>■ RO (नोंदणी अधिकारी): नामनिर्देशन पत्रांची छाननी, मतमोजणी, निकालाची घोषणा करतो.<br>■ ERO (मतदार नोंदणी अधिकारी): मतदार यादी तयार करतो.<br>■ पीठासीन अधिकारी (Presiding Officer): मतदान केंद्रावर मतदान आयोजित करतो. |
| **निरीक्षक (Observers)** | **निरीक्षक (Observers)**<br>❍ सर्वसाधारण निरीक्षक (General Observers) – एकूण देखरेख.<br>❍ खर्च निरीक्षक (Expenditure Observers) – केंद्र सरकारच्या सेवांमधून.<br>❍ पोलीस निरीक्षक (Police Observers) – IPS अधिकारी.<br>❍ जागरूकता निरीक्षक (Awareness Observers) (2014 पासून) – मतदारांचा सहभाग आणि माध्यम निरीक्षण (Paid News).<br>❍ सूक्ष्म निरीक्षक (Micro-Observers) – केंद्रीय सेवा/PSUs मधून; थेट सर्वसाधारण निरीक्षकांना अहवाल देतात. |
| **स्टार प्रचारक** | ❍ विशिष्ट मतदारसंघांमध्ये प्रचार करण्यासाठी राजकीय पक्षांद्वारे नामनिर्देशित.<br>❍ केवळ नोंदणीकृत पक्षांना परवानगी:<br>■ मान्यताप्राप्त पक्ष: 40<br>■ अमान्यताप्राप्त (नोंदणीकृत) पक्ष: 20 |
| **टपाल मतपत्रिका (Postal Ballot) (कलम 60, RPA 1951)** | **टपाल मतपत्रिका (Postal Ballot) (कलम 60, RPA 1951)**<br>❍ पात्र मतदार:<br>■ राज्याबाहेर सेवा करणारे सशस्त्र दलाचे सदस्य.<br>■ भारताबाहेर सेवा करणारे भारत सरकारचे कर्मचारी.<br>■ वरीलपैकी व्यक्तींचा/व्यक्तींची जोडीदार/जोडीदार (Spouse).<br>■ प्रतिबंधात्मक अटकेत असलेले लोक.<br>■ केंद्रीय सशस्त्र दले (ते प्रॉक्सी मतदान देखील वापरू शकतात). |
| **निवडणूक कायदे** | **RPA, 1950 (लोकप्रतिनिधित्व अधिनियम, 1950):**<br>❍ लोकसभा, राज्य विधानसभा, राज्य परिषदांसाठी जागांचे वाटप (राज्यसभेसाठी नाही).<br>❍ राष्ट्रपतींकडे (ECI च्या सल्ल्यानंतर) सीमांकनाचा अधिकार.<br>❍ लोकसभा आणि राज्य विधानसभांसाठी मतदार यादी.<br>❍ निवडणुकीच्या प्रत्यक्ष आयोजनाशी संबंधित नाही. |

**RPA, 1951 (लोकप्रतिनिधित्व अधिनियम, 1951):**

- खासदार/आमदारांची पात्रता आणि अपात्रता.
- निवडणुकांची अधिसूचना.
- निवडणूक यंत्रणा.
- राजकीय पक्षांची नोंदणी.
- निवडणुकांचे आयोजन.
- निवडणूक विवाद.
- भ्रष्ट कार्यप्रणाली आणि निवडणूक गुन्हे.
- पोटनिवडणुका.
- राज्यसभेच्या सदस्यांचा कार्यकाळ.
- निवडणूक चिन्हे: कलम 29A + निवडणूक चिन्हे आदेश, 1968.



• Electoral Process

① Notification → President = For LS
(अधिसूचना) Gov. = For SLA

Withdrawal
Ⓝ — 7 — ↓ — 2 — Before 15 Days
Scrutiny

② Nominations (नामांकन पत्र)
अनुमोदन by 2 Voters → to RO
From Jail, From out of India
↳ Possible ✓
↓
Because, RT Vote = constitutional right under Art. 326.
(Not FR)

③ Security Deposit (अनामत रक्कम)
Paid to RBI
LS < Open → 25K; SC-ST → 12.5K
SLA < Open → 10K; SC-ST → 5K
($1/6^{th}$) Vote ⊗ → Forfeited (जप्त)

④ Model Code of Conduct
(आचारसंहिता)
By ECI.
Not statutory but Binding ✓

⑤ खर्च तपासणी
अधिकार = EC
Candidate ने written मध्ये सादर करणे = 45 Days
उमेदवाराला → बंधन
पक्षाला → नाही

⑥ EVM
1989 → RPA, 1951 मध्ये बदल करून
First Use → 1992 = केरळ
Whole state → 1999 = Goa
Made by < BEL, Bengaluru; ECI, Hyderabad

⑦ By Elections
उर्वरित पदासाठी
(If expiry → < 1 yr = ⊗)
लो.स. स्व. सं < 6 Months ⊗
Within ⑥ Months.

सुधारणा
① Before 1996
1988 = 21 → 18
1989 = EVM
1993 = Photo (छायाचित्र)

② 1996
राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान
By elections (6 Months)
पगारी रजा
दारू
प्रचार (20-14)

③ 1996 नंतर
अनामत रक्कम
डाकेने मतदान (1999)
2003 = RS = Within state ⊗
↳ गुप्त ✓

④ 2010 पासून
Jail मधून ✓
खर्च मर्यादा ↑ < LS = 70L (मोठे) 54 (लहान राज्य); SLA = 28, 16
VVPAT = 2013 = Nagaland
NOTA = 2013

समित्या: Imp Only.
1974 - तारकुंडे समिती
1990 - दिनेश गोस्वामी
1998 - इंद्रजित गुप्ता
2013 - J. S. वर्मा

CHAPTER 24

# पक्षांतर बंदी कायदा

| पक्षांतर बंदी कायदा ANTI-DEFECTION LAW (10th Schedule) | |
|---|---|
| उगम (Origin) | ❍ 52nd घटनादुरुस्ती कायदा (Constitutional Amendment Act), 1985.<br>❍ 10th अनुसूची समाविष्ट केली.<br>❍ संसद आणि राज्य विधानमंडळांना (State Legislatures) लागू. |
| अपात्रतेची कारणे (Grounds of Dis-qualification) | ❍ स्वेच्छेने राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडणे (यात औपचारिक राजीनाम्याशिवायचे वर्तन समाविष्ट आहे).<br>❍ पक्षाच्या आदेशाविरुद्ध (party whip) मतदान करणे/गैरहजर राहणे (abstains) → जर 15 दिवसांच्या आत पक्षाने माफ (condoned) केले नाही.<br>❍ अपक्ष सदस्य (Independent member) → निवडणुकीनंतर पक्षात सामील झाल्यास.<br>❍ नामनिर्देशित सदस्य (Nominated member) → 6 महिन्यांच्या आत पक्षात सामील होऊ शकतो, अन्यथा अपात्र.<br>**अपवाद (Exceptions):**<br>**विलिनीकरण (Merger):**<br>❍ जर पक्षाच्या 2/3rd सदस्यांनी विलीन होण्यास सहमती दिली.<br>❍ पीठासीन अधिकारी (Presiding Officer - Speaker/Chairman):<br>❍ निवडणुकीनंतर पक्षाचा राजीनामा देऊ शकतो.<br>❍ पद सोडल्यानंतर पुन्हा पक्षात सामील होऊ शकतो. |
| निर्णय घेणारे प्राधिकरण (Decision Making Authority) | ❍ अध्यक्ष (Speaker) / सभापती (Chairman) अपात्रतेचा निर्णय घेतात.<br>❍ संविधानात कोणतीही कालमर्यादा (time limit) नमूद केलेली नाही. |
| न्यायिक पुनरावलोकन (Judicial Review) | **किहोतो होलोहन खटला (Kihoto Hollohan Case) (1993):**<br>❍ अध्यक्ष न्यायाधिकरण (Tribunal) म्हणून कार्य करतात.<br>❍ खालील कारणांवरून निर्णयाचे न्यायिक पुनरावलोकन होऊ शकते:<br>❍ दुर्भाव (Mala fide).<br>❍ विकृती (Perversity).<br>❍ घटनात्मक आदेशाचे उल्लंघन (Violation of constitutional mandate). |
| प्रक्रियेशी संबंधित मुद्दे (Procedure-Related Points) | ❍ अध्यक्षांकडून स्वतःहून (suo motu) कोणतीही कार्यवाही नाही.<br>❍ केवळ सभागृहातील सदस्याच्या तक्रारीवरून.<br>❍ आपोआप अपात्रता (automatic disqualification) नाही.<br>❍ चौकशी (Inquiry) आवश्यक + बाजू मांडण्याची संधी (opportunity to be heard) देणे आवश्यक.<br>❍ विशेषाधिकार समितीकडे (Committee of Privileges) संदर्भित केले जाऊ शकते. |

| | |
|---|---|
| **व्याप्ती मर्यादा (Scope Limitation)** | ❍ केवळ विधानमंडळाच्या (legislature) अंतर्गत वर्तनासाठी लागू.<br>❍ सभागृहाबाहेरील (outside House) कृतींना लागू होत नाही. |
| **राजकीय पक्ष (Political Parties)** | ❍ राजकीय पक्षांना प्रथम घटनात्मक मान्यता.<br>❍ अध्यक्ष नियम तयार करू शकतात → नियमांचे उल्लंघन = विशेषाधिकाराचा भंग (breach of privilege). |
| **अनुच्छेद 361B (91st CAA, 2003)** | ❍ अपात्र सदस्य (Disqualified member):<br>■ कोणतेही वेतन असलेले राजकीय पद (remunerative political office) धारण करू शकत नाही.<br>■ ही बंदी खालीलपैकी लवकर असलेल्या कालावधीपर्यंत राहते:<br>❍ सभागृहाचा कार्यकाळ (term of House) संपेपर्यंत.<br>■ विधानमंडळावर पुन्हा निवडणूक (Re-election to legislature) होइपर्यंत.<br>■ वेतन असलेले राजकीय पद (Remunerative Political Office): (संविधानात परिभाषित)<br>❍ वेतन खालील स्रोतांतून दिले जाते:<br>■ केंद्र/राज्याच्या सार्वजनिक महसुलातून (Public revenue of Union/State), किंवा<br>■ केंद्र/राज्याद्वारे नियंत्रित असलेल्या कोणत्याही संस्थेकडून.<br>❍ अपवाद: भरपाइ भत्ता (Compensatory allowances) अनुमत आहेत. |

CHAPTER 25

# घटनात्मक आणि गैर-घटनात्मक संस्था

<table>
<tr><th>घटनात्मक संस्था</th><th>गैर-घटनात्मक संस्था</th></tr>
<tr><td>
1. भारताचा निवडणूक आयोग – अनुच्छेद 324<br>
2. UPSC – अनुच्छेद 315–323<br>
3. राज्य लोकसेवा आयोग (SPSC) – अनुच्छेद 315–323<br>
4. वित्त आयोग – अनुच्छेद 280<br>
5. अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोग – अनुच्छेद 338<br>
6. अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग – अनुच्छेद 338A<br>
7. मागासवर्गीयांसाठी राष्ट्रीय आयोग – अनुच्छेद 338B (102 व्या घटनादुरुस्ती कायद्यानंतर घटनात्मक दर्जा)<br>
8. भाषिक अल्पसंख्याकांसाठी विशेष अधिकारी – अनुच्छेद 350B<br>
9. भारताचे CAG (नियंत्रक व महालेखापरीक्षक) – अनुच्छेद 148<br>
10. भारताचे ॲटर्नी जनरल – अनुच्छेद 76<br>
11. राज्याचे ॲडव्होकेट जनरल – अनुच्छेद 165<br>
इतर घटनात्मक परिषदा / समित्या:<br>
❍ आंतरराज्य परिषद – अनुच्छेद 263<br>
❍ GST परिषद – अनुच्छेद 279A<br>
❍ जिल्हा नियोजन समिती (DPC) – अनुच्छेद 243ZD<br>
❍ महानगर नियोजन समिती (MPC) – अनुच्छेद 243ZE
</td><td>
■ वैधानिक संस्था<br>
(संसद / राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे निर्मित):<br>
1. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग (NHRC)<br>
2. राज्य मानवाधिकार आयोग<br>
3. केंद्रीय माहिती आयोग (CIC)<br>
4. राज्य माहिती आयोग (SIC)<br>
5. केंद्रीय दक्षता आयोग (CVC)<br>
6. लोकपाल आणि लोकायुक्त<br>
7. केंद्रीय अन्वेषण विभाग (CBI) → दिल्ली विशेष पोलीस आस्थापना अधिनियमाद्वारे वैधानिक आधार, घटनात्मक नाही.<br>
कार्यकारी संस्था (कार्यकारी ठरावाद्वारे निर्मित, कायद्याची आवश्यकता नाही):<br>
1. नियोजन आयोग (आता बरखास्त)<br>
2. नीती आयोग<br>
3. राष्ट्रीय विकास परिषद (NDC)
</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| **भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) (अनुच्छेद १४८–१५१)** | स्वरूप आणि दर्जा: • स्वतंत्र घटनात्मक प्राधिकरण. • भारतीय लेखा आणि लेखा विभागाचे प्रमुख. • सार्वजनिक निधीचे संरक्षक. • केंद्र आणि राज्यांच्या वित्तीय प्रणालीचे लेखापरीक्षण करतो. कार्यकाळ आणि पदावरून काढणे: • कार्यकाळ: ६ वर्षे किंवा ६५ वर्षांपर्यंत, यापैकी जे लवकर असेल ते. • पदावरून काढणे: केवळ सिद्ध गैरवर्तन किंवा असमर्थतेच्या आधारावर. • पदावरून काढण्याची प्रक्रिया: सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरून काढण्याच्या समान. • सेवानिवृत्तीनंतर: केंद्र किंवा राज्यामध्ये पुढील कोणत्याही पदासाठी पात्र नसतो. अहवाल: • ३ लेखापरीक्षण अहवाल सादर करतो: केंद्र, राज्ये आणि सार्वजनिक उपक्रम. • अहवाल राष्ट्रपती/राज्यपालांना सादर केले जातात आणि संसद/राज्य विधानमंडळासमोर ठेवले जातात. • सार्वजनिक लेखा समिती (PAC) द्वारे तपासले जातात. |
| **भारताचे ॲटर्नी जनरल (AGI) (अनुच्छेद ७६)** | दर्जा: • देशाचे सर्वोच्च कायदा अधिकारी. • भारत सरकारचे मुख्य कायदेशीर सल्लागार. नियुक्ती आणि पात्रता: • राष्ट्रपतींद्वारे नियुक्ती. • पात्रता: सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश होण्यास पात्र असावेत. कार्यकाळ: • कार्यकाळ निश्चित नाही. • राष्ट्रपतींच्या मर्जीनुसार पद धारण करतात. अधिकार: • संसदेच्या कोणत्याही सभागृहाच्या किंवा संयुक्त बैठकीच्या कामकाजात बोलण्याचा आणि भाग घेण्याचा अधिकार असतो, परंतु मतदानाचा अधिकार नसतो. |

| | |
|---|---|
| **राज्याचे ॲडव्होकेट जनरल (AG – State) (अनुच्छेद १६५)** | दर्जा: • राज्याचे सर्वोच्च कायदा अधिकारी. नियुक्ती आणि पात्रता: • राज्यपालांद्वारे नियुक्ती. • पात्रता: उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होण्यास पात्र असावेत. |
| **केंद्रीय दक्षता आयोग (CVC)** | कायदेशीर आधार: • CVC अधिनियम, २००३ अंतर्गत वैधानिक संस्था. कार्ये: • भ्रष्टाचार प्रकरणांमध्ये दिल्ली विशेष पोलीस आस्थापना (DSPE - CBI) वर अधीक्षण करणे. • दक्षता बाबींवर केंद्र सरकारला सल्ला देणे. • CBI मधील महत्त्वाच्या नियुक्त्यांसाठी CVC च्या शिफारशी विचारात घेतल्या जातात. |

| | |
|---|---|
